# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि. १०/०१/२००८

**लालबहाद्दुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. १०/०१/२००८

आज गुरूवार दि. १०/०१/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०७ दि. ०४/०१/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहाद्दुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १२) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १३) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १४) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |
| १५) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| १६) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी, व कर्मचारी वर्ग यांचे स्वागत करुन त्यांनी आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी त्यांना विनंती करतो आणि आजच्या सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

मा. पिठासिन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १०/१/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादूर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. ४/१/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे व महत्त्वाच्या वास्तूंचे संरक्षणार्थ ठेका पद्धतीने हत्यारी व बिनहत्यारी सुरक्षारक्षक पुरवठा करणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांकडील पत्रे, मा. आयुक्तांचे अधिकार काढून घेतल्याचे पत्र कुठे आहे? राज्य शासनाने मा. आयुक्तांचे अधिकार काढून घेतले. त्याचे पत्र कुठे आहे ते पहिल्यांदा रेकॉर्डवर आणा. त्याशिवाय मिटींगचा पुढचा एकही विषय उच्चारायचा नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मा. महासभेमध्ये वाचून दाखवले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पटलावर ठेवा, आम्हांला बघू द्या. तुम्ही आहे की नाही ते लिहिणार ना? मला एक सांगा की आयुक्तांचे पत्र वाचन करावे म्हणून कुठे लिहिले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

सदर पत्राचे मा. महासभेमध्ये वाचन झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन्ही पॅरेलल हाउस आहेत. मा. आयुक्तांचे पत्र रेकॉर्डवर आणा आणि ते आम्हांला द्या. तुमचा हा पायंडा चुकीचा आहे. जे जी.आर.वगैरे येतील असे भरमसाट पाच पंचवीस एकत्र देउ नका. आठवडयामध्ये तुमची काय काय पत्र येतात?

**नगरसचिव :-**

मा. महासभेत हे पत्र वाचले. सगळ्यांना झेरॉक्स दिल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. आम्हांला कॉपी द्या.

**नगरसचिव :-**

मा. महासभेमध्ये कॉपी दिली होती. तरी परत देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेचा विषय संपूर्ण निराळा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

मला वाटते् हे पत्र इथेसुध्दा आपण दिलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

नाही दिलेले.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला मिळालेले नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. नगरसचिव साहेब तुम्ही आम्हांला इतिवृत्तांत का देत नाही?

**नगरसचिव :-**

मिटींग ताबडतोब लागल्यामुळे घाई झाली. दुसरे काम चालू आहे.

**नयना म्हात्रे :-**

पुढच्या हप्त्यामध्ये आम्हांला सगळे पाहिजे.

**नगरसचिव :-**

आत्ता दोनच आहेत.

**नयना म्हात्रे :-**

वेळेवर दिले तर बरे होईल. नाहीतर काही वेळेला एकदम गठ्ठा जातो.

**शानू गोहिल :-**

दोन दोन मिटींगचे द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. नगरसचिव साहेब, मा. आयुक्तांचा अधिकार काढल्याचे पत्र त्यानंतर आपण दोन अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले. त्यानंतर तुमच्याकडे काय काय पत्र आली. महापालिकेच्या सचिव कार्यालयात किंवा मा. आयुक्त कार्यालयात कुठलीही जी काही पत्र आली त्याचा आम्हाला सगळा सेट पाहिजे.

**नगरसचिव :-**

मा. महासभेसोबत सगळा सेट पाठवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परत एकदा मा. महासभा लागेल तेव्हा लागेल. आत्ता या ज्या स्टॅण्डींग होतील. समजा, त्याच्यात काही निर्णय घ्यायचे आहेत आणि ते स्टॅण्डींगने घ्यायचे आहेत तर आम्ही काय करणार? तुम्हांला एक पेपरचा सेट... स्टॅण्डींग म्हणजे तुम्ही काउंटच करत नाही असे वाटते.

**नगरसचिव :-**

सगळी परिपत्रके स्टॅण्डींगला देणे शक्य नाही.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅण्डींगला शक्य नाही असे बोलायचे नाही. तुम्ही आम्हांला लेखी द्या. असे चालत नाही. तुम्ही म्हणाल तो नियम आणि कायदा होत नाही. उद्या परिपत्रकाने आम्हांला स्टॅण्डींगला निकाल घ्यायचा आहे किंवा निर्णय द्यायचा आहे किंवा एखाद्या रक्कमेला मान्यता द्यायची आहे, तर? तुम्ही हे कोणत्या आधाराने बोलता की, स्टॅण्डींगला एखादे

पत्र द्यायचे नाही? स्टॅण्डींगला एखादे पत्र द्यायचे नाही हा नियम आहे का? ॲक्टमध्ये कायदा दाखवा आणि बी.पी.एम.सी. सेक्शन दाखवा.

**नगरसचिव :-**

आपण मा. महासभेलाच द्यायचो.

**मिलन म्हात्रे :-**

मला सेक्शन दाखवा आणि मग बोला. सेक्शन नसेल तर आम्हांला द्यावे लागेल. स्टॅण्डींगची सभा महिन्यातून चार वेळा होते आणि मा. महासभा महिन्यातून एक वेळा होते. बारा चोक अठ्ठेचाळीस, वर्षातून याच्या अठ्ठेचाळीस मिटींग होतात तर त्या बारा होतात. सगळ्यात जास्त काम स्टॅण्डींगला होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

अंमलबजावणीच्या कामकाजाला स्टॅण्डींगमध्ये आपण निर्णय घेतो. सभाशास्त्राप्रमाणे शासनाचे पत्र, महापालिकेचे पत्रव्यवहार आपण मा. महासभेला देतो. विषयसुचीमध्ये सुद्धा आपण तशी तरतुद केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठल्या?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

आपण जी मा. महासभेची विषयसुची काढतो.

**मिलन म्हात्रे :-**

ही काय आहे. मी सांगतो, मा. आयुक्तांचे पत्र व कामकाज, समित्यांचे ठराव, इतिवृत्तांत निरंक, समित्यांचे ठराव निरंक परिवहनचे ठराव झाले नाही.

**नगरसचिव :-**

स्टॅण्डींगला जे शिफारस केले...

**मिलन म्हात्रे :-**

मी फक्त हे वाचतो. बाकी आउट ऑफ वे जाउ नका. या पानापुरते बोला. आत्ता आयुक्तांची पत्रे आहेत. ती पत्रे मा. आयुक्तांनाच आली आहेत, तुम्ही जे दोन अधिकारी कार्यमुक्त केले ते तुम्हांला बनवलेले नाही.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सा़े. ) :-**

आत्ता जे विषय आणि गोषवारा दिला आहे. ती आयुक्तांकडील पत्र आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांकडील पत्रे म्हणजे कोणती?  तुम्ही वाटल्यास उपविधी परत एकदा वाचा. त्या उपविधीमध्ये जो फॉरमॅट आहे तो याच्यात कुठेतरी ड्रॉप केला आहे. या विषयपत्रिकेचा फॉरमॅट उपविधीमध्ये नाही.

**नगरसचिव :-**

उपविधीमध्ये आपला स्टॅण्डींगचा फॉरमॅट हाच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅण्डींगचा फॉरमॅट नाही. उपविधीचा फॉरमॅट बोला. स्टॅण्डींगचा फॉरमॅट तुम्ही सुधारता. चार लाईन तुम्ही गाळता. मी तुम्हांला सांगतो, उपविधी मागवा आणि त्याचा फॉरमॅट रेकॉर्डवर घ्या. तुम्ही काय वाटेल ते कराल? आमच्या सभासदांकडून तुम्ही सगळी पत्र दडवून ठेवता आणि तुम्हांला ते कारणच मिळते. इकडे रेकॉर्डला जर पत्रच आले नाही मग सगळे होणारच. उद्या शासनाने सांगितले की तुमच्या बजेटमध्ये ही प्रोव्हिजन करा आणि हा संपूर्ण कार्यक्रम तुम्ही राबवा. ते पत्र आम्हांल स्टॅण्डींगला कळायला नको? आयुक्तांचे पत्र म्हणजे काय? आयुक्तांना अडचणीचे आहे ते पत्र आयुक्त देणारच नाही. ते पत्र तिकडे केराच्या टोपलीमध्ये पडले आहे. उपविधीमध्ये जो फॉरमॅट आहे, त्यानुसार आले पाहिजे. हा फॉरमॅट डिस्टर्ब करायला तुम्हांलाही कोणाला अधिकार नाही.

**नगरसचिव :-**

उपविधीचा जो फॉरमॅट आहे तो मी वाचनू दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

उपविधी कुठे आहे? सुरुवातीपासून वाचा.

**नगरसचिव :-**

पहिला अ प्रश्न इकडे प्रश्न येणार नाही. मागील सर्व सभेचे इतिवृत्तात किंवा मागील सभेनंतरच्या कोणत्याही विशेष सभेचे किंवा सभांचे कार्यवृत्तांत नंतर सर्व निवडणूका.

**मिलन म्हात्रे :-**

ही नाहीत.

**नगरसचिव :-**

सर्व नियुक्त्या.

**मिलन म्हात्रे :-**

पण निवडणुका निरंक असे लिहा. तुम्हांला हे ड्रॉप करायचे कोणी सांगितले. जे नाही ते निरकं लिहा.

**नगरसचिव :-**

मध्यप्रश्न.

**मिलन म्हात्रे :-**

निरंक लिहा.

**नगरसचिव :-**

विनंती अर्ज.

**मिलन म्हात्रे :-**

तो विनंती अर्ज याच्यात नसणार? असला असता. मला सांगा, मा. सभापती आहेत. एखादा महत्त्वाचा विषय आहे. आम्हांला चार नगरसेवकांना वाटते की, सभागृहामध्ये अन्य महापालिकेला, आयुक्तांना पत्रव्यवहार करुन एखादा विषय मा. महासभेपुढे आला नाही. तर आमच्या चार स्थायी समितीच्या सदस्यांना हक्क आहे की सभागृहात मा. सभापतींना विनंती अर्ज करुन महापालिकेची मा. महासभा कॉल करायची मग तुम्ही तो का ड्रॉप केला?

**नगरसचिव :-**

हा आपण मा. महासभेसाठी वापरतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तिकडे परत उडी मारु नका. ह्याला तुम्ही महासभेचे लिहिले आहे का? त्याच्यात वर काय लिहिले आहे? पूर्ण टायटल वाचा.

**नगरसचिव :-**

कामकाज व क्रम.

**मिलन म्हात्रे :-**

कुठले कामकाज?

**नगरसचिव :-**

महापालिका सचिवांकडून कामाच्या बाबी पुढील प्रमाणे लावण्यांत येतील. याच्यासाठी तो फॉरमॅट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्याच्यामध्ये असे लिहिले आहे का की, परिवहन नाही, स्थायी समिती नाही, शिक्षण समिती नाही. प्रत्येक समितीला हा फॉरमॅट आहे. तुमची विषयपत्रिका ही अशीच बनणार. आत्ता मा. शिक्षण समितीला मा. महासभेचा ठराव जाणार नाही का? मा. स्थायी समितीला ठराव जाणार नाही का? मा. शिक्षण समितीला एखादा निर्णय घ्यायचा आहे की, दहा लाख खर्च करायचे आहेत. मा. स्थायी समिती त्या ठरावाला जी मंजूरी देईल. तो ठराव मा. शिक्षण समितीला जाणार. मा. शिक्षण समिती त्या ठरावावर ॲक्ट करणार. म्हणजे याच्यात तुम्ही डिस्टर्ब करुन चालत नाही. त्याच्यामध्ये विनंती अर्ज पाहिजे. पुढे वाचा.

**नगरसचिव :-**

स्थायी समिती, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव. शिक्षण मंडळाची पत्रे. आयुक्तांकडील पत्रे व कामकाज. शासनाकडील किंवा शासकीय अधिका-यांकडील पत्रे.

**मिलन म्हात्रे :-**

मग हे कोण दाखवणार? मी पहिलेच बोललो की हे तुम्ही तुमच्या सोयीकरिती मॉडीफायच केले. हे पुढच्या मिटींगपासून चालणार नाही. मा. सभापती साहेब, आम्हांला याच्यावर रुलिंग पाहिजे.

**नगरसचिव :-**

समित्यांचे किंवा उपसमित्यांचे अहवाल.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्याच्यात सगळे आले पाहिजे.

**नगरसचिव :-**

हे मा. महासभेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कोण म्हणते? वर लिहिले आहे फक्त मा. महासभा?

**नगरसचिव :-**

हे समित्यांचे अहवाल असतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही निरक लिहा. वर कुठे लिहिले आहे का की, हा फॉरमॅट फक्त मा. महासभेपुरता वापरावा, असे लिहिले आहे का सांगा. मी वाचलेले आहे. मला माहिती आहे. कुठेतरी शिस्त आणा. प्रत्येकवेळेला आम्ही सभागृहामध्ये भांडणचं करत राहायची का?

**नगरसचिव :-**

प्रस्तावाच्या नोटीसा.

**मिलन म्हात्रे :-**

मला पुढची सगळी माहिती आहे. मला एवढेच माहिती अहे की जो फॉरमॅट दिला आहे तो तुम्ही डिस्टर्ब करायचा नाही. सगळ्या समित्यांना अशीच विषयपत्रिका गेली पाहिजे. इव्हन प्रभाग समित्यांनासुद्धा तुम्ही चालवाल ते चालणार नाही. सभागृहाने जे नियम बनवले आहेत, ते चालणार. मा. सभापती साहेब, मला याच्यावर रुलिंग पाहिजे याच्यात जे केले आहे. त्यानुसार पुढच्या मिटींगपासून तुमची विषयपत्रिका आली पाहिजे. आपल्याला रुलिंग असे पाहिजे की, सभागृहात पाठवलेली ही जी विषयपत्रिका आहे. याच्यात सोयीस्करपणे बदल करण्यांत आलेले आहेत. असे न करता उपविधीमध्ये आपल्याला जो विषयपत्रिकेचा फॉरमॅट दिला आहे. त्यानुसार पुढच्या सर्व समित्यांना तो फॉरमॅट लागू होईल.

**मा. सभापती :-**

याच्यापुढे मा. स्थायी समिती सभेला सचिवांनी उपविधी प्राप्त कराव्यात.

**मिलन म्हात्रे :-**

ते नाही. आपल्या बायलॉजमध्ये जो फॉरमॅट दिला आहे. त्यानुसार विषयपत्रिका आली पाहिजे.

**मा. सभापती :-**

बायलॉजमध्ये जो फॉरमॅट दिला आहे त्यानूसार विषयपत्रिका आली पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. २८ बरोबर आहे. प्रकरण क्र. २८ च्या अगोदर तुम्ही सोयीस्करपणे जे मुद्दे गाळले. ती पत्रे कुठे आहेत?

**नगरसचिव :-**

पत्राची झेरॉक्स देतो.

**मिलन म्हात्रे :-**

पुढची.

**नगरसचिव :-**

अधिकार प्रदान केल्याचे आणि अधिकार काढल्याचे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले, त्याचे काय? साहेब सगळे पाहिजे. त्यानंतर आपण एक ठराव विखंडीत करायला मंत्रालयामध्ये पाठवला होता. माझ्याकडे आत्ता पत्र आहे. पाहिजे तर मी दाखवतो. तुम्ही ते कधी सभागृहाला दाखवले का?

**नगरसचिव :-**

सचिवांकडून विखंडीत केले जात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सचिवांकडून नाही. मा. आयुक्तांनी शासनाला जे पत्र पाठवले. त्याच्या बजेटवर ८० लाखाचा सेट बॅक बसणार आहे. ते पत्र तुम्ही कधी रेकॉर्डवर आणले का? तुम्हांला ते आवश्यक वाटले नाही? आत्ता बजेटच्या ज्या मॅरेथॉन बैठका होणार त्याच्यामध्ये त्या ८० लाखाचे काय करायचे? ते डेफिसेशन आहे. तो ठराव विखंडीत झाला की नाही. तुम्ही शासनाला पत्र पाठवले? पुढच्या आठवडयापासून आपल्याला बजेटला बसावे लागेल. पाणी खात्यालाही त्याचे काही वाटले नाही. तेही गप्प आहेत. आमच्या मा. सदस्यांना तुम्ही काही कळवलेच नाही तर आम्हांला कळणार कसे? त्या आर.टी.आय. च्या अधिकारातसुद्धा दहा वेळा चकरा माराव्या लागतात. सगळे अधिकारी, अठ्ठावीस दिवस गप्प असतात आणि दोन दिवस राहिले की, धावपळ करतात आणि आमच्याकडून मुदत वाढवून घेतात तेव्हा काही ना काही कळते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब मा. सदस्य, श्री. मिलन म्हात्रे, साहेब जे बोलतात. मी स्वतः गटनेता म्हणून परिवहन, वृक्ष प्राधिकरण सर्वांना पत्र दिले की, तुमची जी सभा होणार आहे. त्या सभेची टिपणी झालेली चर्चा याची प्रत आम्हांला पाठवा. कोणी पाठवत नाही. लेखी पत्र देउन सुद्धा गटनेता म्हणून बाकीच्या सदस्यांना तुम्ही पाठवू नका. मा. स्थायी समितीमध्ये जी गोष्ट आली पाहिजे ती पण येत नाही. आज चौथी सभा आहे. एका इतिवृत्तांताला स्टॅडींगचा मा. महासभेचे फार लांब कट होतो.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला मा. सभापतींनी तुम्हांला रुलिंग दिलेले आहे. की प्रत्येक सभेचे इतिवृत्तांत पाहिजे.

**नगरसचिव :-**

मागचे वेळेला दोन झाले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब प्रश्न तो नाही. आपण नियमाचे बोलू या. आजच्या मिटींगला एकही इतिवृत्तांत नाही. ते का दिले नाही?

**नगरसचिव :-**

याच्यानंतर जे इतिवृत्तांत आहे ते ७० ते ८० पानांचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शंभर पानांचे असू द्या. नियम असा आहे आहे की, या मिटींगला इतिवृत्तांला मंजूरी दिल्याशिवाय मिटींग सुरु होत नाही. हे तुम्हांलाही माहिती आहे.

**नगरसचिव :-**

मिनिटस्‌चा विषय असा आहे की, शक्यतो लवकर करा अशी त्याच्यात सुचना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नॉर्मस्‌ असे आहेत की जी मागची मिटींग झाली त्याच्या इतिवृत्तांताला पहिली मंजूरी आणि मग पुढचे कामकाज सभाशास्त्र हे बोलते.

**मा. सभापती :-**

याच्यापुढे प्रत्येक मिटींगला तुमच्यापुढे इतिवृत्तांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या या सगळ्यामुळे बरीचशी कामे अडकून पडतात. तुमच्या कर्मचाऱ्यांच्या हिताची कामे असतात ती पटापट होतात. कारण ते इतिवृत्तांत पटकन लागतात. त्या मिटींगमध्ये जे ठराव झाले ते दोन तीन आठवडे लोंबकळले. ते काम होणारच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी अवगत करु इच्छितो. कामकाजामध्ये जर कंटीन्यूएशन आले, लगेच मा. महासभा, लगेच मा. स्थायी समिती लगेच इतर समित्या, तर एखाद्या समितीचे कामकाज पुढच्या सभेत येउ शकते. आपण म्हणाल्याप्रमाणे मागच्या सभेचे इतिवृत्त पुढच्या सभेत येणे अपेक्षित आहे मागचे इतिवृत्त ८० पानाचे आहे ते पुढच्या सभेत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण ठाणे टी.एम.सी. ला काम करुन आलात. ठाण्याच्या मा. महासभेचे विषय किती असतात आणि मा. स्थायी समितीचे विषय किती असतात? तुम्हांला चांगले माहिती आहे. सांगा नाहीतर मी सांगतो. आणि तेवढयाचे सगळे ते लोक करुन देतात. आपल्याकडे काही वाईट गोष्टींचे पायंडे पडत चालले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ते द्यायला पाहिजे आणि अडचण असेल तर पुढच्या सभेत द्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता या मा. महासभेचे पाच पाच इतिवृत्तांत आम्ही मंजूर करायचे. सहा महिन्यापूर्वी मी काय बोललो ते मला कसे कळणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी जे सर्व संबंधित उपसमित्यांना पत्र दिलेले आहे. ते टिप्पणी का देत नाही?

**मिलन म्हात्रे :-**

परिवहन आणि शिक्षण समिती आहेत त्यांना आर्थिक काही पाहिजे असेल तर मा. महासभा आणि मा. स्थायी समितीकडे येणार नंतर ते सांगणार की आमचा आणि महापालिकेचा काही संबंध नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

परिवहन, वृक्षप्राधिकरण आणि शिक्षण मंडळात जे कामकाज मा. स्थायी समितीला किंवा मा. महासभेला शिफारस होतात. त्याची कॉपी आपण या प्रोसिडींगमध्ये देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फक्त ठरावाची कॉपी देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तो ठराव आपल्याकडे चर्चेला येतो.

**मिलन म्हात्रे :-**

थोडा डिफरन्स सांगतो. उद्या परिवहनच्या मा. सभापतींनी ठरवले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

इतर समितीच्या कामकाजाचे ठराव दिले जातात. प्रोसिडींग जात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रोसिडींग हा विषय निराळा आहे. तुम्ही त्यांचे ठराव तरी आणा. आत्ता एक उदाहरण देतो. समजा मी एक्स.वाय.झेड. सभापती आहे किंवा कोणीतरी आहे. त्याने ठरवले की आपण दहा रुपयाचे तिकिट पाच रुपये करावे आणि त्याने ते केले. उद्या त्याचा पाच करोडचा लॉस झाला. ते परत तुमचे अनुदान मागायला मा. महासभेपुढे येतात. मा. स्थायी समितीला आम्हांला त्याची तरतुद करावी लागते. उद्या जर त्या परिवहन समितींच्या मा. सभापतींनी चुकीचा ठराव केला. तर त्याच्यावर कार्यवाही म्हणा किंवा तो ठराव विखंडीत करण्यासाठी आम्हांला काहीच कार्यवाही

करता येत नाही. आणि दरवेळेला उठसुट दोन तीन करोडचा लॉस दाखवत चालले आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, गाडया उभ्या असतात, बिले निघतात. तुम्हांला मी तारीख, वार, वेळ, नंबर सगळे देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या परिवहनाला विचारा की माझे पत्र आहे की नाही? शिक्षणाला आहे की नाही?

**नगरसचिव :-**

स्टॅन्डीग मिटींग जर आपली आज झाली. तर आजच अजेंडा काढावा लागतो. आज मिटींग झाली तर पुढच्या आठवड्याचा अजेंडा आजच काढावा लागतो. आजचे मिनिट्स लगेच पुढच्या वेळेला देणे शक्य नाही. मला एका मिटींगचा गॅप पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या प्रोसेडींगमध्ये मा. सभापतींनी काय-काय रुलिंग दिली. ती एका पानावर स्पष्टपणे देत जा.

**नगरसचिव :-**

जे अधिकारी बसतात त्यांनी नोटींग करुन लगेच त्याच्यावर कार्यवाही करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आजच्या सभेला महत्वाची काय रुलिंग झाली? आत्ता ते मा. सभापती समोर बसले आहेत. आपल्याकडे किती मोठ्या खातेदाराने हाउस टॅक्सचे पैसे भरलेले नाहीत. पाणीपट्टीची बिले भरलेली नाहीत. त्यांनी सांगितले की, पुढच्या मिटींगला तुम्ही आणा. माहिती अजून आलेली नाही. त्यांच्या रुलिंगचा काय उपयोग आहे, काहीच नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याला घरपट्टीचे आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती आले? फिगर काय? तुमच्याकडे लेखी आहे. आम्हाला तर काहीच आलेले नाही.

**मा. सभापती :-**

चार दिवसामध्ये दिड कोटी आपण वसुल केले.

**प्रशांत पालांडे :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब, मा. स्थायी समितीची सभा महिन्यातून चार वेळा घ्यावी असा नियम आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

तसा नियम आहे. चार नाही सहासुध्दा घेउ शकतो.

**प्रशांत पालांडे :-**

महिन्यातून दोन घेउ शकतो का?

**मिलन म्हात्रे :-**

चार पाहिजेच. आठवड्याला एक झालीच पाहिजे आणि मा. महासभा २० तारखेपर्यंत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, रुलिंग का आना चाहिए। मा. महासभेमध्ये रुलिंग होतात त्याचे पण नाही. इकडे रुलिंग झाली. आत्ता सचिव साहेब सांगितात की, माझ्याकडे त्या डिपार्टमेन्टने दिले नाही. तर मी काय करु? म्हणजे हे बोलून चालणार नाही. जी रुलिंग झाली. त्या सभेमध्ये ही रुलिंग झाली, त्याच्यावर मी हे काम केलेले आहे किंवा ही अडचण आली. त्याच्यात आम्ही वेळ घालवायचा का? त्यावेळी ते इतिवृत्तांत येईल त्यावेळी त्याच्यामध्ये गोंधळ घालण्यापेक्षा आत्ता दिले तर काय बिघडते. आम्ही इतिवृत्तांतामध्ये ते घेणारच. मग तोच विषय झाला. प्रभाग समिती क्र. २ मध्ये श्री. मोरे साहेब होते. त्यांनी त्या पध्दतीने दिले होते की, या सहा रुलिंगचे हे काम झाले आहे. हे अडचणीचे आहे आणि संबंधित खात्यामध्ये कळवले आहे. त्या रुलिंगचे आम्हाला माहित पडेल. नाहीतर इतिवृत्तांत वाचताना परत दोन तास जाणार.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्ही जे काही बोलतो ते प्रशासनाला आणि सगळ्यांनाच बरे आहे आणि त्याने वाद कमी होतो. आत्ता बघा शहरामध्ये मेन रोडला तीन-चार ठिकाणी झाकणे नाहीत आणि त्याच्या खाली आठ-दहा फुटाचे डक आहेत. इंदिरा मार्केटला एम.टी.एम.एल. चे झाकण पंधरा दिवस झाले, अख्ख्याच्या अख्खा माणूस आत जाईल. बी.एम.सी.मध्ये असे मेनहोल उघडे राहून एक माणूस पडून मेला आणि एक अर्धा हॅन्डीकॅप झाला. त्याचा कंबरेतून काटा तुटला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जी काही रुलिंग होते त्याची यादी करायची.

**नगरसचिव :-**

साहेब, ही आमची जबाबादारी नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही असे बोलू नका. रुलिंग कोणावर होते?

**नगरसचिव :-**

रुलिंग त्या त्या डिपार्टमेन्टवर होते.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीचा कंट्रोल कोण करते? मा. सभापतींनी दिलेले रुलिंग पहिल्यांदा तुमच्याकडे येते. ठराव कोणाकडे येतो, सचिवांकडे. सचिव डिपार्टमेन्टला पाठवतात. रुलिंग तुमच्याकडे येणार. तुमच्या डिपार्टमेन्टला मा. सभापतींची रुलिंग अपडेट पाहिजे. आणि त्याची कॉपी तुम्ही त्या डिपार्टमेन्टला पाठवायची आहे.

**नगरसचिव :-**

साहेब, रुलिंग त्यांनी लिहून घ्यायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती त्या अधिकाऱ्याला रुलिंग करत नसतो. तो सभागृहाला करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

संबंधित विभागात लक्षात ठेवा आणि दुसऱ्या दिवशी सचिवांना पाठवा की, माझ्या रुलिंगचे मी हे केले.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल तसे नसते. तुमचे रुलिंग झाले. त्याचे इम्लिमेन्टेशन ते प्रशासनाच्यावतीने बाजुला बसले आहेत. ते प्रशासनाचे कॅप्टन आहेत. त्यांनी आणि सचिवांनी ती रुलिंगची लिस्ट तयार करायची आणि सचिवांनी आणि त्यांनी मिळून ती प्रत्येक डिपार्टमेन्टला पाठवायचे ते त्यांचे काम संपले. उद्या आम्ही तुम्हाला विचारणार नाही की, तुम्ही रुलिंगबद्दल काय केले? तुम्ही पाठवले, विषय संपला, आत्ता ती रुलिंग ज्या मिटींगला होतात. सेम डे तुम्ही ती रुलिंग त्या डिपार्टमेन्टला पाठवायची ती अधिकाऱ्याने कळवले नाही कळवले. उद्या दहा करोडची वसुली करायची आहे. तो अधिकारी कशाला कळवेल की, मी दहाच्या ऐवजी एकच करोड जमा केले आहेत. मा. सभापती साहेब, जी रुलिंग देतात ती तुम्हाला दोघांना बंधनकारक आहे. ती तुम्ही डिपार्टमेन्टला पाठवायची. आणि डिपार्टमेन्टने नंतर रिप्लाय काय दिला. तो तुमचा इंटरनल भाग आहे. आम्ही बोलणार नाही. आम्ही पुढच्या वेळेला बघू. समजा रुलिंग झाले की, नेक्स्ट मिटींगला ही ५० हजाराची वसुली करायची आणि त्यांनी केली नाही. साहेब, तुमचे दोघांचे काम संपले. त्या डिपार्टमेन्टचा जो कोणी हेड असेल त्याचे काम आहे. ५० हजार का केले नाहीत? दिरंगाई का झाली? हे त्याचे काम आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

श्री. हरेश पाटील साहेब, तुम्हाला काही अडचण असेल तर सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, कसलीही अडचण नसते. जो तो आपल्या सोयीने करतो. आत्ता ही विषयपत्रिका बदलायला काय अडचण होती?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इतिवृत्तांताच्या वेळी डबल वेळ द्यायला नाही पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

उलट लवकर होईल. गेल्या मिटींगची दहा रुलिंग आहेत. त्या रुलिंगवर निर्णय झाला. विषय संपला. तुमची कार्यवाही झाली तर आम्ही कशाला वाद घालू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेब, आपल्याकडून सभा कामकाजामध्ये जे रुलिंग होतात. त्याची प्रशासन नोंद घेउन कार्यवाहीसाठी विभाग प्रमुखाला देण्याची व्यवस्था केली जाईल आणि पुढच्या सभेपासून त्यांचा निश्चित आढावा घेता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आणि एका पानामध्ये सेपरेट रुलिंग, डिपार्टमेन्ट रुलिंग म्हणजे काम तेवढे सुटसुटीत होईल त्यांना काय कळणार की, मागच्या दहा मिटींगमध्ये काय रुलिंग दिल्या.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेपासून झालेल्या सर्व निर्णयाचा खुलासा देण्यांस सर्व अधिकाऱ्यांनी सभेसमोर आणावे अशी मी त्यांना नम्र विनंती करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, पाणी पुरवठा विभागाचे शहाड टेमघरचे पत्र आले आहे. २० टक्के पाणी कपात. त्याबद्दल तुम्ही थोडेसे बोला. याचे डिसीजन झाले आहे की नाही? तुम्ही आपली बाजु काय मांडली?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. या संदर्भातील निर्णय, म्हणजे मिटींगसाठी आपल्याला बोलवलेले नव्हते. आणि निर्णय झाला आहे किंवा नाही. हे पत्र म्हणजे त्यांच्या इरीगेशन डिपार्टमेन्टला बैठक झाली. हे स्टेमच्या कार्यकारी अभियंत्याने आपल्याला कळवलेले आहे. पण ॲक्च्युअल पाणी कपात अजून झालेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. परंतु, त्यांनी आपल्याला पत्र पाठवलेले. मी सर्व सदस्यांनी पत्राची कॉपी दिलेली आहे. तर ॲक्च्युअल पाणी कपात अजूनपर्यंत चालू झालेली नाही. काल जो होता तो शट डाउन होता. म्हणजे स्टेमची जी कामे होती, व्हॉल्वची कामे होती, एम.एस.ई.बी. ची कामे होती. त्यासाठी हा शटडाउन होता. परंतु, तुम्हाला २० टक्के पाणी कपात लागू

करण्यात आलेली आहे. असे लेखी पत्र आपल्याकडे आजच्या तारखेपर्यंत नाही. हे पत्र आले ही शक्यता आहे. तिकडे बैठक झाली. त्या बैठकीला आपल्याला बोलावलेले नव्हते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मागच्या वर्तमानपत्रामध्ये एक हफ्त्यापासून या बातम्या येत होत्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे पत्र आल्यानंतर आपल्या पालिकेतर्फे तुम्ही काय मुव्हमेन्ट केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ही पाणी कपात जी आहे. ती फक्त आपल्या एका महापालिकेसाठी नाही. ज्या प्राधिकरण पाणी उचलतात त्या सर्वांसाठी आहे. त्याचे कारण असे दिलेले आहे. घटना पाणी तंटा लवाद नॅशनल लेव्हलला, स्टेट लेव्हलला आहे. त्या धरणामध्ये पाणी उपलब्ध आहे. पण जास्तीचे पाणी उपसा कसा येत नाही. असे वरच्या लेव्हलला निर्बंध आहेत. आणि ते धोरणात्मक निर्णय आहेत. त्याची अगाउ सुचना सर्व प्राधिकरणाला त्यांनी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आजच्या पेपरला उल्हास नदीची बातमी आहे. ती बातमी आपल्या पी.आर.अे. सेक्शनने कापून ठेवली आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

आजच्या लोकसत्ताला बातमी आहे. तो अग्रलेख आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महाराष्ट्र टाईम्सला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, २० टक्के पाणी कपात झालीच तर आपले काय प्रोव्हीजन आहे? आपल्याला पत्र आले आहे. त्यांनी आपल्याला कळवले आहे की, पाणी कपात होणार आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

होण्याची शक्यता आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

शक्यता आहे. म्हणजे कधी नाकारता येणार नाही. आणि शक्यता झाली मग?

**शिवाजी बारकुंड :-**

हे सर्वांनाच लागू आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याचे चॅलेंजेस तयार होण्यासाठी हे दिलेले आहे. तुम्हाला अवगत केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचे पण कर्तव्य आहे की, ते पत्र आल्यानंतर जी गर्व्हनिंग बॉडी आहे आणि हा डिसीजन ज्यांनी घेतलेला आहे. त्यांना ॲटलीस्ट तुम्ही कळवा की, तुम्ही असा निर्णय घेतला आहे. आणि विदाउट आमच्या इंटीमेशनने हा निर्णय घेतलेला आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, स्टेमचे गर्व्हनींग कमिटीचे अध्यक्ष हे ठाणे महापौर साहेब असतात. त्यांच्या लेव्हलने पत्रव्यवहार चालला आहे असा पत्रात पण उल्लेख केलेला आहे. आणि हे पत्र आपल्याला आठ तारखेला आलेले आहे. काल ९ तारीख होती. आजची १० तारीख आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही मा. आयुक्तांच्या सहीने पत्र द्या आणि सांगा की, हे डिसीजन आम्हाला मान्य नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण पत्र द्या की, आम्हाला हा डिसीजन मान्य नाही. आमच्या इकडे पाणी कपात करु नये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, आपल्या मिरा भाईंदर हद्दीमध्ये जे पॉप्युलेशन वाढते. जी लोकसंख्या आहे आणि आपल्याला जे पाणी मिळते हे दोन्ही मॅच होउ शकत नाही म्हणून आपल्याला पाण्याची गरज आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ही मिरा भाईंदरची वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती आपले जे अधिकारी तिथे होते. त्यांनी तिथे कल्पना मांडलेली आहे की, मिरा भाईंदरसाठी पाण्याचा एकच सोर्स आहे. तर तिकडे फार प्रॉब्लेमॅटीक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे करु नये. परंतु, अद्याप निर्णय म्हणजे आपल्याकडे फायनल पत्र नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ह्या सभागृहाची भावना लक्षात घेउन, पाणी कपातीपासून आपल्याला मुक्त ठेवावे असे पत्र पाठवा.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या सहीने पत्र पाठवून देउ.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. गणेश देवल नगरला पाच वर्षापासून एक इंचाचा नळ असाच ठोकलेला. आपल्या नगरपालिकेला आत्ता माहिती पडले म्हणून तो नळ कापला देखील. आत्ता त्या लोकांनी पाच वर्षे फुकट पाणी वापरले. म्हणजे ते चोरीचे कनेक्शन होते म्हणून ते कापले. तर त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहात? तो कोणी लावला? लावयला कोणी सांगितला?

**शरद पाटील :-**

तो सेपरेट होता की, स्टॅन्डपोस्टसारखा कंम्बाईन होता.

**नयना म्हात्रे :-**

स्टॅन्डपोस्टसारखा नव्हता. तो पाच जणांनी चोरुन नळ घेतलेला.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार पूर्वीच्या चार नंबर वॉर्डमध्ये १०० टक्के स्टॅन्डपोस्ट कट केलेले आहेत. हे मला एवढे बरोबर माहिती आहे. मोतीनगरपासून थेट रेल्वे स्टेशनपर्यंत जेवढे स्टॅन्डपोस्ट होते, चोरीचे कनेक्शन मला माहिती नाही. आणि जेवढी चोरीची कनेक्शन होती त्याचा सर्व्हे झाला. आणि ती चोरीची कनेक्शनसुध्दा बंद करुन त्याची पॅनल्टी घेतली गेली.

**नयना म्हात्रे :-**

काल श्री. नानेगांवकरांना सांगितले की, तो नळ कापला. त्याच्यावर कार्यवाही करा. तर त्यांनी असे उत्तर दिले की, आत्ता कापला मग कशाला कार्यवाही करायची? असे कसे चालेल? त्या लोकांनी पाच वर्षापर्यंत चोरीला नळ लावला. स्टॅन्डपोस्ट असता तर गोष्टच वेगळी होती.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कालपण मा. महासभेमध्ये स्टॅन्डपोस्ट द्या म्हणून चर्चा झाली. एकीकडे असे पत्र येते की, २० टक्के पाणी कपात होणार आहे किंवा पाण्याचा उपव्यय चालला आहे. आदिवासींचा विषय काढला त्यावेळेस मी असे म्हंटले की, तुम्ही त्यांचे दाखले बघा. त्यांचा उत्पन्नाचा दाखला बघा. एखादा आदिवासी पैसे भरु शकत नाही. मग त्याचा उत्पन्नाचा दाखला आणायला सांगा. त्यांचे आदिवासी दाखले आणायला सांगा. आणि मग तुम्ही त्यांच्याबद्दल धोरण ठरवा. आपल्याकडे कोणत्याही पध्दतीचे धोरण नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला जो ठराव झाला, कालच्या मा. महासभेमध्ये मा. स्थायी समितीचा उल्लेख झाला तो इंडीव्हीज्युअल ठराव नाही. ग्रुप कनेक्शनचाच ठराव पास झालेला आहे. पण त्या ठरावाचा दुरुपयोग करुन प्रत्येकाला खाजगी जागेमध्ये नळ दिलेले आहेत. आमच्या विभागामध्ये झोपडपट्टीवाले सरकारी जागेवर अतिक्रमण आहे म्हणून तुम्ही त्यांना तुम्ही ग्रुप कनेक्शन दिले आणि पेणकरपाडा या भागामध्ये लोकांनी सरकारी जागेवर चाळी ठोकल्या. म्हणून त्यांना रुम मागे अर्धा इंचाचे कनेक्शन. हा दुजाभाव महापालिकेने का करायचा? सरकारी जागेवर झाले ते अतिक्रमण मग त्याला कायदा, नियम सगळा सारखा. ती कनेक्शन कोणती सिंगल दिली आहेत? त्याचा ठराव आहे की बघा. आणि त्याच्यावर कार्यवाही करा. म्हणजे आमच्याकडे ठरावानुसार कार्यवाही पाच किंवा दहा लोकांनी एक कनेक्शन घ्यायचे. ऐपत असूनसुध्दा सिंगल कनेक्शन घ्यायचे नाही आणि बाकी ठिकाणी सरकारी जागेवर चाळी ठोकल्या आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

मॅडमनी जे आत्ता विचारले आहे. त्याची माहिती घेउन मी सांगतो.

**मा. सभापती :-**

माझ्याकडे तक्रार आहे की, तीन-चार अनधिकृत कनेक्शन आहेत. आणि जे अनधिकृत आहेत. त्यांना पोलिस स्टेशनमध्ये नेउन, त्यांचे पैसे वसुल करुन, चोरीचे कनेक्शन घेतले म्हणून त्यांना अटक करावी हे मी तुम्हाला सांगतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे व महत्वाच्या वास्तुचे संरक्षणार्थ ठेका पध्दतीने हत्यारी व बिनहत्यारी सुरक्षारक्षक पुरवठा करणेबाबत.

**एस. ए. खान :-**

प्रकरण क्र. २८ .....

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ठराव नंतर वाचा. ठरावात काही मॉडीफिकेशन करायचे आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण इथे चर्चा करु इथे आपण ठरवा.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये सगळीकडे तेच चालले आहे. पहिला ठराव वाचून घ्यायचा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आत्ता सभागृहामध्ये ठराव कोण वाचते? आम्ही वाचतो की ते वाचतात?

**मिलन म्हात्रे :-**

आपली पध्दत आहे. सचिवांना सांगावे लागले की, विषयपत्रिका कशी घ्यायची. हे आपले दुर्दैव आहे. मा. सभापती साहेब, पहिला विषयावर चर्चा करा. थोडा विषय गांभिर्याने घ्या. मागच्या वेळेला शहरामध्ये अफवा उठली होती की, पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये एक माणूस पडला आणि त्याचे प्रेत फुगले आणि कुजले. त्यापासून आपण सर्व पाण्याच्या टाकीवर रक्षक नेमले. आज कुठल्याही पाण्याच्या टाकीवर वॉचमेन नाहीत. मला आठवते, आपली वॉचमेनची पहिली सुरुवात तिकडूनच झाली. पाण्याच्या टाकीकडे जो वॉचमेन असतो. तो वॉचमन दिसत नाही. त्या पाण्याच्या टाक्यांना फाटकपण नाही. महिन्याभरापूर्वी एक सरपंचाची पाण्याच्या टाकीवर जाउन शोले टाईप हंगामा केला की, मी जीव देणार. याचा काहीतरी बोध घ्या. आपण ही मशिनरी, एवढा लाखो रुपये खर्च करतो. शाळांमध्ये तुमचे वॉचमेन काय करतात ते जरा सांगा. त्यांचे ड्रेस नसतात. त्यांना तुम्ही जे टोपी, शिटी, काठी देता ते कधी जाउन कोणी बघते का? आपण खर्च करतो याला माझा विरोध नाही.

**मा. सभापती :-**

माझा सांगायचा उद्देश तोच आहे की, मा. महासभेत आपल्याला सहा वाजतात. इकडेसुध्दा तीन वाजतात. त्याच्यासाठी लवकरात लवकर ठराव करायचे असतात. तेव्हा कुठला विषय कुठे जातो त्याला चर्चा करण्यांचा अर्थ काय?

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावरच बोलतो. प्रश्न टाईम वेस्ट करायचा नाही. जो आपला पैसा आपण खर्च करतो तो कुठे जातो.

**मा. सभापती :-**

आपल्या नगरपालिकेचे किती कर्मचारी आहेत? तुम्ही दर दिवशी तसेच बोलता की, लिपीक काम करत नाही, संगणक चालक काम करत नाही. मग त्यांच्यावर किती दबाव आणायचा.

**मिलन म्हात्रे :-**

मग ही सभा कशासाठी घेता. सभा बंद करा. त्रासच नको. जर सभा घेतली तर विषयावर रितसर चर्चा झाली पाहिजे. जे काम होत नाही ते झाले पाहिजे. तर सभा घ्या नाहीतर घेउ नका. हा ठराव नुसता वाचू नका. याच्यात आमच्या काही सुचना आहेत त्या घ्या. मी हे जे बालतो ते कॉमेन्ट्स करत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गेल्या वेळी आपण सांगितले होते की, आमच्या सुचना घ्या. तेव्हा श्री. एस. ए. खान साहेबांनी ठराव वाचला होता.

(सभागृहात गोंधळ)

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्यांचे व्हिजन क्लिअर आहे. त्यांची अपेक्षा अशी आहे की, विषयानुरुप चर्चा व्हावी.

**मिलन म्हात्रे :-**

तेच करतो. या सभागृहामध्ये जो सदस्य येतो. त्याला सुचना मांडण्याचा अधिकार आहे. तुम्ही ठराव मांडायची घाई करु नका. आणि जर मांडला तर त्याला मी तुमच्या बरोबर असूनसुध्दा विरोध करेन.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

विषय वाचन होते. त्याच्यानंतर चर्चा होते आणि नंतर ठराव वाचला जातो. अगोदर ठराव वाचला जात नाही हे मीपण तुम्हाला सांगतो. आम्ही पूर्वीपासून बोलतो. ही पध्दत चुकीची लावली आहे. पूर्वी ते करत होते. आत्ता तुम्ही करता. काही फरक पडत नाही. मी बोलतो. माझ्या सुचना तुम्हाला घ्यायच्या नसतील तर मा. सभापतींना अधिकार आहे. आमच्या ज्या सुचना आहेत त्या ऐकून घ्या.

**शरद पाटील :-**

जे योग्य आहे ते योग्य करा.

**तुळशिदास म्हात्रे :-**

सगळ्यांच्या मताने असे ठरवा की, पहिल्यांदा ठराव वाचायचा की चर्चा करायची?

**मिलन म्हात्रे :-**

एक लक्षात घ्या. तुमचे ठराव टाईप होउन येतात आणि मग त्याच्यामध्ये ज्या सुचना असतात .....

**मा. सभापती :-**

आम्ही सुचना नमुद करुन घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

त्या सुचना नंतर घेतल्या जात नाहीत.

**मा. सभापती :-**

घेतल्या नाहीत तर मला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

काय सांगणार? तुमच्या रुलिंगचे काय होते ते सांगा. या मिटींगला बसताना तुम्ही हे डिक्लेअर केले का की, मागच्या वेळेला या रुलिंग होत्या आणि त्याचे पालन झाले. ही काय इकडे मजा आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

या रुलिंगसाठी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल साहेबांनी मुद्दा मांडला.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला कोणाला वेळ नसेल तर मिटींग लावत जाउ नका. आणि जर लावायची असेल तर प्रत्येक विषयावर चर्चा झाली पाहिजे. या सिक्युरिटीवर चर्चा आहे. एका वॉचमनने मुलीवर बलात्कार केला. ही चर्चा कोण करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

कोणी बलात्कार केला?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला हे हे माहित नाही का? आपले दोन वॉचमन जेलमध्ये बंद आहेत. तुम्हाला काय माहित आहे. त्या वॉचमनने त्या मुलीला चौपाटीवर तीन वेळा आणले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सफाई कर्मचाऱ्याने केले त्याच्यावर कारवाई केली.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मुख्यालय आहात. तुम्हाला सगळे माहित पाहिजे. आम्हाला जे कळते ते तुम्हाला माहित नाही. ह्या बातम्या पेपरला आल्या आहेत. याच्यावर कोण चर्चा करणार? आम्ही सायलेंटली घेतो याचा अर्थ असा नाही. शंभर माहिती आहेत तेव्हा आम्ही दोन बोलतो. तुमच्या सिक्युरिटीचा वॉचमेन आज जेलमध्ये आहे. सभागृहामध्ये ही चर्चा कोण करणार? एखादा मर्डर केला तर? काही चालले आहे काय? हे चालणार नाही. ह्या विषयावर आमच्या ज्या सुचना आहेत, त्या ऐकून घ्या. ह्या तुमच्या चांगल्याकरिता नसेल तर मिटींग बंद करा. आम्ही घरी चाललो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुमचा दुसरा मुद्दा असा होता की, ठरावात ज्या सुचना मॉडीफाय होतात त्या घेतल्या जात नाहीत. असा कुठलाही ठराव ......

**मिलन म्हात्रे :-**

शंभर दाखवतो. साहेब, मी सात वर्षे नगरसेवक आहे. माझ्याकडे ठराव आहेत. मी तुम्हाला दाखवू का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

कोणताही ठराव वाचन होउन आपण इथे फायनल केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी माझे सफरींग बोलतो. मा. महापौरांनीसुध्दा याच्यात रुलिंग ॲड करा. मी कोर्टबाजी केलेला माणूस आहे. मला माहित आहे की, ठरावामध्ये माझी सुचना काय आहे आणि तुम्ही काय टाकणार आहात. तुम्ही मला काय सांगता? तुमच्या ठरावात काय येते आणि काय नाही ते आम्हाला माहित आहे. उगाच चॅलेंज करु नका. आजही त्या वॉचमेन लोकांचा ड्रेस बरोबर नसतो. त्याच्यात व्हिसल नसते. काठ्या वगैरे काही देत नाहीत. कधी ड्रेसवर नसतात. या सुचना लिहून घ्या. आत्ता जी क्रिमीनल केस झाली त्याचा जिम्मेदार कोण आहे? ते घडले तेव्हा बंदरवाडी येथे तो ड्युटीवर होता. आणि ते दोन वॉचमेन आमच्या इकडे चौपाटीवर असताना त्यांनी तो प्रकार दोन वेळा केला. पोलिसांनी पकडलेले आहे. ही कामे करण्याकरीता उद्या मुख्यालयामध्ये आणून कोणाला काहीतरी करतील आणि सुट्टीच्या दिवशी या मुख्यालयामध्ये तुम्ही महिला काय करायला ठेवता? ती ऑर्डर कोणी दिली? ह्या मुख्यालयात कोणी नसते. आपल्याकडे दोन महिला, कोणीही पुरुष माणूस नसतो. सिक्युरिटी बाहेर असते. आणि या महिला आपल्याकडे फुकट बसलेल्या असतात. ही ऑर्डर कोणी काढली? उद्या त्या महिलांबरोबर काहीतरी झाले. तर जिम्मेदार कोण? श्री. खतगांवकर साहेब, पहिल्यांदा तुमचे स्टेटमेन्ट होईल.

**मा. सभापती :-**

कुठल्या महिला.

**मिलन म्हात्रे :-**

मी हेच तर बोलतो की, चर्चा होउ द्या. ज्या दिवशी महापालिका बंद असते. लेडीज सिक्युरिटी कशासाठी? काय गरज आहे? त्या सिव्हील ड्रेसवर बसतात. आपल्याकडे बाहेर पाच सिक्युरिटी गार्ड आहेत. सिक्युरिटी नाही अशातला भाग नाही, प्लस दोन.

**मा. सभापती :-**

सिव्हीलमध्ये असतात त्यांना ड्रेस घालायला सांगा.

**एस. ए. खान :-**

त्यांना ड्रेस घालायला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सुट्टीच्या दिवशी महिला ठेवायच्या नाहीत, पुरुष बसवा. पाच आहेत मग कशाला दोन वाढवता? सुट्टीच्या दिवशी या कॅम्पसमध्ये कोणी नसते. त्याकरिता ज्या माहिला विदाउट युनिफॉर्म बसतात त्या आपण बंद केल्या पाहिजे. त्याच्यानंतर आपले सिक्युरिटी गार्ड नेमके किती आहेत? त्याचा हा विषय आला. तुम्ही कालपर्यंतचा रेकॉर्ड बघितला का? आपल्या सिक्युरिटीची ही एजन्सी कामाला लागल्यापासून तुमच्या गार्डनमध्ये भरपुर नुकसान झालेले आहे. तुम्हाला माहिती आहे, आपल्याकडे ब्रिजखाली आपण सिक्युरिटी गार्ड ठेवला आहे. तुमच्या गॅईटीच्या तीन गाड्या आहेत. त्या चालत नाहीत म्हणून साईडला ठेवल्या आहेत. ४० हजार रुपयांचा एक पंप असे तुमचे तीन पंप चोरीला गेले. १ लाख २० हजार, त्याची वसुली कोण करणार? तुमचे दोन-दोन सिक्युरिटी गार्ड तिकडे बसतात. तुम्ही जेवढे स्क्रॅब आणता तेवढे सगळे ते लोक विकतात.

**मा. सभापती :-**

भांडारपाल हे खरे आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी सांगावे की, गाडीचे पंप कुठे गेले? माझ्याकडे गाडीला पंप असलेले फोटो आहेत. कारण मीच गाड्या उचलून तिकडे ठेवल्या आणि त्यावेळेला फोटो काढून घेतले. मला माहिती होते.

**मा. सभापती :-**

याचा अधिकारी कोण आहे. चोरीला गेले हे नक्की आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

१ लाख २० हजार, मी रक्कम सांगतो. बाजारमुल्य काढून आणले आहेत. ते तिन्ही पंप चांगले होते आणि गाडीच्या मागचे ते तीन पंप चोरीला गेले आहेत. ब्रिजच्या खाली परिवहनचे वॉचमेन आहेत, आपले वॉचमेन आहेत. तरी तीन मशिन गेल्या. भगतसिंग उद्यानामध्ये फाउन्टेनचा ऑटोमॅटीक स्विच आहे. त्याची किंमत जवळ जवळ साडेतीन हजाराच्या वर आहे. श्री. खतगांवकर साहेब, लॉक ॲन्ड किमध्ये ती वस्तु आतमध्ये असते. म्हणजे एल. ॲन्ड की बोर्डने ते पॅनल उघडले जाते. आतली चार हजाराची वस्तु चोरीला गेली. त्या तिकडच्यांनी तक्रार केलेली आहे. सिक्युरिटी गार्डवाल्यांचे काहीच काम नाही. त्या आतले कितीतरी कलर एक-एक लीटरचे पाच-सहा डब्बे चोरीला गेले. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, त्या स्पॉटवर चोरी झाली तर तुम्ही त्या सिक्युरिटीवर रिकव्हरी का लावत नाही? आज १ लाख २० हजाराची रक्कम चोरीला गेले हे खायचे काम नाही. आणि त्या आपल्या गाड्या आत्ता बाद झाल्या. त्या गाड्या आपल्याला थोडेसे रिपेरिंग करुन कामाला येत होत्या. तर त्याचे पंम्पच नाहीत. अशा प्रकारची जर सिक्युरिटी कुठली? मी कोणत्या कंपनीबद्दल बोलत नाही. सिक्युरिटीचा अर्थ असा आहे की, आमची जी काही चलाचल प्रॉपर्टी आहे ती व्यवस्थित राहिली पाहिजे. त्याच्यानंतर गार्डनमध्ये तुमचे दोन-दोन गार्ड आहेत. गार्डनचे लॅम्प तोडतात, रात्री जाउन लोक दारु पितात, तिकड जुगार खेळतात. सगळे धंदे चालतात. नसेल तर मी तुम्हाला रात्री फिरवतो चला. बत्त्या तोडल्या जातात. आपल्या इकडची सगळी नासधूस केली जाते. खेळणी तोडली जातात. सिक्युरिटीचे काही काम आहे की नाही? एक लॅम्प लावायला आपल्याला अडीच-तीन हजार, साडेतीन-चार हजार खर्च आहे. सर्व बत्त्या दगड मारुन तोडफोड करुन, तुमच्या इथली गार्डन तुम्ही जाउन बघा. मी जाउन आलो. ह्या रिकव्हरीचे काय? ज्या गार्डनला ज्या दिवशी वस्तु तुटते-फुटते, पहिले सिक्युरिटीवाल्यांकडे द्या की, तुम्ही ही पाच हजाराची रिकव्हरी पाहिजे. त्याशिवाय हे वठणीवर येणार नाहीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब जे बोलतात त्याच्यामध्ये तथ्य आहे. पण त्याच्यामध्ये आणखीन एक गोष्ट अशी आहे की, वन खात्याने किमान हफ्त्यामध्ये जाउन त्या गार्डनमध्ये बघायला पाहिजे की, तुटले आहे. मी पैसे भरतो. हे काम तिकडच्या गार्डनचा जो रखवालदार आहे. ज्या प्रभाग अधिका-याच्या अंडरमध्ये ते येते. त्याने त्या ठिकाणी गेले पाहिजे. आणि त्या गार्डनमध्ये काय वस्तु आहेत त्याची नोंद घेतली पाहिजे. वृक्षप्राधिकरणामध्ये असताना मी तिकडे बोललो होतो की, गार्ड लावा की, या गार्डनमध्ये ही वस्तु आहे. १० लॅम्प, ४ खेलणी याचा बोर्ड लावा. हा या एजन्सीचा रखवालदार त्याचा नंबर हे लावा. उद्या कुठल्या नगारीकाला तक्रार करायची असेल तर तो करेल. पण कोणीच बघत नाही. श्री. म्हात्रे साहेब जे बोलतात ही गोष्ट कोणाला सांगितली पाहिजे. त्या प्रभाग अधिका-याने तिकडे जाउन त्या गार्डनमध्ये काय चोरी झाले आहे, काय तुटले आहे त्याचा रिपोर्ट करुन संबंधीत विभागाला दिले पाहिजे की, या सैनिक किंवा या गुरुजी कन्स्ट्रक्शनचा रखवालदार या गार्डनमध्ये आहे. याच्या हेड ऑफ याचे नुकसान झालेले आहे. त्याच्याकडून वसूल करावे व ताबडतोब पंचनामा करावा. पण इकडे कोणीही जात नाही. म्हणून ते बोलले त्याच्यामध्ये पण तथ्य आहे. पण त्याच्यावर ज्याचे लक्ष असले पाहिजे तोच लक्ष घालत नाही. वन खात्याच्या वन खाते जात नाही. पाण्याच्या टाकीवर नाही. तर पाणी विभागाचे अधिकारी आहेत. प्रत्येक क्षेत्रावर अधिकारी आहेत. चार-चार आणि आठ-आठ विभाग अधिकारी आहेत. मग ते काय करतात? त्याचे काम आहे. त्यांनी करायला पाहिजे की, ह्या विभागामध्ये या टाकीचे झाकण चोरीला गेले आहे. सैनिक किंवा गुरुजी कन्स्ट्रक्शनचे कोण असतील त्यांच्याकडून याची एवढी किंमत वसुल करावी. पंचनामा करावा. कोणीही अधिकारी करत नाही. उद्या सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी विषय काढला आणि खरोखरच ते सिध्द झाले की, साईबाबा उद्यानामध्ये दोन खेळणी तोडलेली आहेत.

त्याची रिपोर्टींग त्या प्रभाग अधिका-याने जर केली नाही. तर त्याचे पैसे प्रभाग अधिका-यांकडून वसुल करा अशी तुम्ही सुचना करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, काशिमिरा स्मशानभुमीमध्ये आपण जो सिक्युरिटी गार्ड ठेवलेला आहे. तो सिक्युरिटी गार्ड तिथे पान विक्री करतो. त्याचा वेगळा व्यवयाय चालू आहे. तलावाजवळ जे उद्यान आहे. त्याची सगळी खेळणी तुटलेली आहे. आणि चरस, गांजा पिणारी मुले तिथे चोवीस तास बसलेली असतात. त्यांना कोणीही उठवत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर स्मशानभुमीचा वॉचमेनने रात्री दहा वाजता गेटला टाळे मारले आहे आणि झोपला आहे. म्हणजे रात्रभर कोणी मरायचे नाही आणि कोणाला जाळायचे नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी सिक्युरिटी गार्डच्या ड्रेसबाबत, त्यांच्याकडे असलेल्या साहित्याबाबत ......

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पुढे आणखीन येते आहे. आत्ता तुम्ही हे हत्याराचे दिले आहे. हत्यारी रक्षकांचे लायसन्स तुम्ही चेक केले आहेत का? हे आत्ता दिलेले आहे की गुरुजी कन्स्ट्रक्शन हत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रती आठ तासाचा दर संख्या किती आहे? दोन आहे तीन आहे, सात आहे, आठ आहे? माझ्या माहितीनुसार आठ आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सात आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे इकडे दिलेले नाही. त्याचे लायसन्स तुम्ही चेक केले का? तुमचा जो कोणी अधिकारी आहे. आमच्याकडे याचा अहवाल नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

याच्यापूर्वी आपली अशीच चर्चा झाली होती. हत्यारी सुरक्षा रक्षकांची संख्या खूप मोठी होती. आणि जो लायसन्सचा इश्यू होता. तो विचारात घेउन संबंधित पोलिस विभागाकडून त्याची दुरुस्ती करुन जे ऑथोराईज आहेत अशा फक्त सात लोकांना आपण कामावर घेतले. मा. स्थायी समितीचेच धोरण निश्चित झाले होते. सर्वांना कमी केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मला त्याची काही हरकत नाही. ते जे कोण सात आहेत. त्यांची नावं-गावं, लायसन्सचा नंबर आम्हांला माहिती करुन द्याल की नाही? उद्या आम्ही सातला मंजूरी देउ तुम्ही ज्यांना सिलेक्ट कराल ते बाजूला राहतील. भलताच कोणीतरी आणून उभा करेल. गुरुजी कन्स्ट्रक्शनवाला हा ठराव घेवून उभा राहिल की, मला यात सात लोकांची मान्यता आहे. माहिती पडले की, त्याचे यु.पी. चे लायसन्स आहे. महाराष्ट्राचे लायसन्स नाही. ज्या माणसाला आम्ही नावानुसार देउ. त्यातील एक उद्या मा. महापौरांच्या बंगल्यावर असणार आहे, कमिशनरच्या बंगल्यावर असणार आहे. उद्या इन केस ईश्वर न करो, काही घडले ह्या सगळ्या ज्या चौकशी होताना हा ठराव पुढे रिफ्लेक्ट होईल. ही सात माणसे कोण आहेत? त्यांचे लासयन्स कुठचे आहे? आम्हांला काही कळले पाहिजे की नाही?

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्यांच्या घरचा ॲड्रेस वगैरे सगळे द्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हत्यारी पोलिस कार्ड, लायसन्स, त्याचे फोटो संबंधित पोलिस स्टेशनला प्रिझर्व असतात.

**मिलन म्हात्रे :-**

पण आम्हांला याच्यात काहीच दिलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रशासन त्याची दक्षता घेते.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने दक्षता घेतली. मागच्या वेळेला हे हत्यारी भरले आणि त्यांची लायसन्स यु.पी.ची होती. त्यावेळेला आम्ही असेच सदस्य होतो आणि अधिका-यांनी सभागृहात असेच प्लेन ठराव पाठवून दिले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही हे रुलिंग करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपण या ठिकाणी जे सर्व मुद्दे मांडलेले आहेत. ते प्रशासनाशी आणि महापालिकेशी निगडीत आहेत, उपयुक्त आहेत. ज्या विभागाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात आहेत आणि तिथे महापालिकेच्या मालमत्तेचे नुकसान होते. त्याची रितसर वसूली संबंधित एजन्सी कडून करण्याची कार्यवाही करण्यांस संबंधित विभाग अधिका-यांना सुचित करण्यांत येते. गार्डन, पाणी खात्याचे अधिकारी, सामान्य प्रशासनाचे अधिकारी, बगिचे प्रभाग कार्यालये, शाळा, स्मशानभूमी सर्व

विभाग प्रमुखांनी त्याच्यावर गर्व्हनिंग करणे अपेक्षित आहे आणि त्यांच्या काही तक्रारी असतील त्या कार्यवाहीसाठी आणाव्या. या सर्व सुचना विचारात घेउन कार्यवाही केली जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपल्याला किती सुरक्षा रक्षक आवश्यक आहेत, याची माहिती याच्यामध्ये दिलेली नाही. आणि साधारणपणे याच्या पूर्वीचे दर किती होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे साहेब, बिना हत्यारी २९०, हत्यारी ०६.

**प्रशांत पालांडे :-**

आपण हे नवीन सांगतो की रिन्यू करतो?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हे आपल्याला वार्षिक लागतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण हे जे लम्पसम्प देतो. त्यापेक्षा आपण शहराचे चार भाग केले, जसे आपले चार वॉर्ड आहेत. आपले महापालिकेचे वॉर्ड आहेत. आपले वॉर्ड अध्यक्ष बसत आहेत. त्या वॉर्ड अध्यक्षांकडे किती आहेत. ती संख्या आपल्याला पाहिजे. म्हणजे त्या त्या माणसाने त्याचा कंट्रोल ठेवायचा. त्याच्यावर वॉर्ड ऑफीसरलासुद्धा काहीतरी जिम्मेदारी द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपल्याला वॉर्डवाईजसुद्धा त्याचे वर्गीकरण काढता येईल. आपल्याकडे सध्या एकत्रित आहे ते विभागवाईज करुन त्या विभागाला देता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळे कोष्टक करुन आम्हांला पुढच्या मिटींगला द्या म्हणजे कळेल.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब आत्ता जे रेटस आहेत. हे किती किती परसेंट वाढले्ले आहेत की, साधारणपणे गेल्यावर्षी एवढेच आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव आम्ही पास करतो. याच्यात बजेटमध्ये काय तरतुद आहे? त्याच्यापैकी या प्रस्तावाला वार्षिक खर्च किती येणार? काही दिलेले नाही. ठरावामध्ये पहिल्यांदा तुमच्या लाईनमध्ये आले पाहिजे की, बजेटमध्ये एवढी तरतुद आहे. त्यानंतर याला वार्षिक खर्च एवढा येणार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही हे द्यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

बजेटची तरतुद नाही आत्ता इकडे वीस लाख नसतील आणि चाळीस लाख खर्च करतील. आपल्याकडे आत्ता किती आहे? आणि या निविदेचा अपेक्षित खर्च किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मागच्यावेळैस हत्यारी सुरक्षा रक्षकाचे मंथली दर होते, ५,५०३/- सध्या ज्या निविदा आलेल्या आहेत. त्याच्यात सर्वात कमीचे दर आहेत, ५,५२०/- आणि विना हत्यारीचे होते. ४,४०२/-आणि सध्याचे प्रस्तावित दर आहेत. ४,४४०/- प्रति माह. आणि याच्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद आहे. येणाऱ्या बजेटमध्ये ह्या वार्षिक निविदा आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ती त्यांनी दिड कोटीची तरतुद सांगितली. आणि आत्ता अपेक्षित खर्च किती आहे? त्या दिड कोटीपैकी आम्ही किती लाखाला मंजूरी देतो?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

साहेब आपण एका महिन्याला साधारण आपण तेरा लाखाच्या जवळपास खर्च करतो आणि दिड कोटीची वार्षिक तरतुद आहे ती याला पूर्ण होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हा अधिकारी कोण आहे त्याला जरा उभा करा. त्याने किती वर्षे काम केले? हे असे विषय मेहेरबानी करुन आणत जाउ नका. आत्ता ह्या एवढ्या मोठ्या मिसचिफमुळे आपण गेले दोन महिने आपण सफर करतो. आपल्याला आपल्याकडून दोन अधिकारी कार्यमुक्त करावे लागले. त्याच्यात त्यांनी निदान दहा कोटीचा फिगर तरी टाकला होता. याच्यात काहीच टाकलेले नाही. मा. आयुक्तांना टिपणी सादर करणारा हा अधिकारी कोण आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या वार्षिक निविदा आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

जरी वार्षिक निविदा असल्या तरी याला आम्ही ५० लाखाला मंजूरी द्यायची?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

साहेब, दुरुस्ती केली.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला फिगर सांगा. प्रकरण क्र. २८ वर सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहेब जो ठराव करतील त्याच्यामध्ये आम्हाला ती फिगर टाकायचा आहे. वार्षिक करा, त्रैवार्षिक करा, सहामाहीक करा, तिमाहीक करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

वार्षिक तरतुद दिड कोटी. त्याच्यातून हे खर्च करणे अपेक्षित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दिड कोटी पैकी आत्ता आम्ही कितीला मंजूरी देणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

दिड कोटीला.

**मिलन म्हात्रे :-**

दिड कोटीला कशी काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

ह्या वार्षिक निविदा आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

वार्षिक निविदा बरोबर आहे. पण मला सांगा की, तुम्ही यानुसार तुमचे कॅल्क्युलेशन केले का? की, दोनशे माणसांचा लेबर वर्षाला ५० लाख होते. आत्ता ५० लाख जर होत असेल तर आम्ही दिड कोटीला मंजुरी कशाला द्यायची?

**बालाजी खतगांवकर (बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मी तुम्हाला यापूर्वी सुध्दा सांगितले. तुम्ही ऐकलं नाही. महिन्याला साधारणतः १३ लाखाचे दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साधारणतः असे नाही. आम्हाला ठरावात फिगर टाकायची आहे. ह्या ठरावामध्ये फिगर येईल की, बजेटची १०० टक्के रक्कम खर्ची असे होत नाही. तुमचा फिगर द्या की, हत्यारीचे वार्षिक ऐवढे होतात. बिनहत्यारीचे वार्षिक एवढे होतात. त्याला आम्ही आत्ता मंजुरी देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फिगर द्यायला हरकत काय आहे? कारण आपल्याकडे संख्या आहे, रेट आहे. मग फिगर देवून टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, आपण जे सण, उत्सव साजरे करतो. धक्क्यावर चौपटीवर गणपती विर्सजन, नवरात्री विर्सजन, इथेपण सिक्युरिटी गार्ड लागतात. त्याचे काही एस्टीमेंट आहे का? कारण तुम्ही समजा आत्ता एस्टीमेन्टेशन केले की, तुम्हाला एवढे लागतील आणि समजा उद्या आपल्याला आणखीन सिक्युरिटी गार्ड लागतील आणि आपण त्यांना जर ऑर्डर दिली आणि मग त्याचे कॅल्क्युलेशन तुम्ही कसे करणार? मग तुम्ही तसा खुलासा करा की, आपण हे एस्टीमेट करु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यामध्येसुध्दा तरतुद करा की, २५ स्टॅन्डबाय ठेवा. त्यावेळेला तुम्ही त्यांना कार्यादेश द्याल की, आज गणेश विर्सजन आहे. एक ते दहा तारखेपर्यंत तुमचे २५ निरनिराळ्या ठिकाणी लागतील. त्याचा सेपरेट कार्यादेश असेल. त्याची सेपरेटी अमाउंट ठेवा. तुम्ही ते सेपरेट देता म्हणून दिड कोटीला मंजूरी देउन चालणार नाही. तशी आम्ही देणार नाही. आम्हाला फिगर पाहिजे. तुम्ही हत्यारीची संख्या आणि व्हॅल्युएशन दिले. म्हणजे इज इक्वल टू बारा महिने. त्याची फिगर आम्हाला पाहिजे. तुम्ही १७० ची फिगर दिली. तुम्ही एक्सेस २५ ठेवा. की, प्रासंगिक जे सण असतात, त्याला लागणारा कर्मचारी वर्ग याच्यासाठी एक अमाउंट रिझर्व्ह ठेवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

ही अपेक्षित २९६ हत्यारी व विना हत्यारीची जी संख्या दिलेली आहे. तर २९६ चे सुध्दा मंथली बिल होत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो. हा प्रस्ताव आम्ही कन्सिडरपण नाही केला पाहिजे. कारण तुम्ही जे २९० बोलता ते कुठे लावता? त्यांच्या संख्या आणि ठिकाणे नाहीत. उद्या शाळेला तुम्ही दोन सिक्युरिटी देणार आणि चार लिहणार. मुख्यालयाला चार लावणार आणि बारा लिहणार. कोण बघायला गेले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

असे नसते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, झाले आहे. हे तुमचे सिक्युरिटी गार्ड आहेत. रात्रीचे इकडे चार-चार गनवाले जेव्हा उभे रहायचे. तेव्हा एक जण जागा रहायचा आणि तीन जण झोपायचे. फायर ब्रिगेडला तुमचा हत्यारी गार्ड आहे. तो इथे गन ठेवायचा

आणि तिथे ड्युटीला जायचा. त्याला तिकडून इकडे पाठवले. ह्या सगळ्या घटना घडलेल्या आहेत. आम्हाला फार वाईट अनुभव आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

याच्यापुढे मस्टरसुध्दा आम्हाला स्टॅन्डींग कमिटीकडून पास करुन घ्यावे लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

करा. चांगली गोष्ट आहे. त्यात वाईट काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तुम्ही म्हणता तेवढे अपेक्षित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग काहीच अपेक्षित नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्याच्यासाठी प्रशासन तुम्हीच नेमलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासन नेमले आहे. अधिकारी काम करत नाहीत. तुमच्या डी.एम.सी. चे ते काम आहे. ज्याच्याकडे फायर ब्रिगेड आहे. तिकडे हत्यारी का ठेवला आहे? पाण्याची टाकी होती म्हणून तुम्हीच अपॉईन्ट केला. त्या माणसाने जर हत्याराचा पगार घेतला नाही बोलायचे नाही. पगार त्याच्याच करिता होतो. आमचा पै-पै खर्च त्याच्याच करीता होतो. त्या माणसाला बंदुकीचे काम दिलेले आहे. त्याने तिकडे बंदुक घेवून उभे रहायचे. ती बंदुक इकडे मुख्यालयात आणि त्याने तिकडे ड्युटी करायची. बंदुक इकडे ठेवायची आणि कॅशवाल्याबरोबर बँकेत जायचे. हे कुठच्या नियमात बसते. तुमची कॅश जाते, त्याच्याबरोबर बंदुक पाहिजे. उद्या काही फायरींग झाले. तर तुमचे पंचनामे होतील. तुमच्या सुरक्षा रक्षकाकडे बंदुक नाही. हे आमचे काम नाही. हे प्रशासनाचे काम आहे. पण ज्यावेळेला प्रशासन करत नाही. त्यावेळेला आम्हाला इंटरफेअर करावे लागते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ह्याच्यामध्ये हत्यारींची संख्या सहा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा वार्षिक खर्च सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हत्यारी सुरक्षा रक्षक सहा आहेत. बिना हत्यारी २९० आहेत. असे २९६ सुरक्षा रक्षक वार्षिक, पर मन्थ अपेक्षित आहेत. हत्यारीचे प्रस्तावित दर ५,५२०/- प्रति महिना आहेत. बिना हत्यारीचे दर ४,४४०/-। प्रति महिना आहेत. एकूण वार्षिक खर्च अपेक्षित आहे, दिड कोटी रुपये. पहिल्या आठ महिन्यांसाठी १ कोटी १८ लाख अपेक्षित आहेत आणि चार महिन्यांसाठी ३२ लाख अपेक्षित आहेत. ह्यामध्ये सन्मा. सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे ज्यावेळेस आपल्याकडे सामुहिक कार्यक्रम असतात, सार्वजनिक कार्यक्रम असतात. गणपती विर्सजन आहे. लॉ ॲन्ड ऑर्डरचे विषय तयार होतात. त्यावेळेस जास्तीचे सुरक्षा रक्षक नेमले जातात. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे यांचे मंथली मस्टर मेन्टेन केले जातात आणि याचे वर्गीकरण सर्व विभागवाइज करुन त्याला त्या विभाग अधिका-याकडे नियंत्रण दिले जाईल आणि त्यांना उपस्थिती हजेरी पटावरुन त्यांचे मासिक वेतन त्या ठेकेदाराला अदा केले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

पण आत्ता आम्ही फिगरला किती मंजुरी दद्यायची? दिड कोटीला मंजुरी मिळणार नाही. तुम्ही कॅल्सी द्या आणि आम्हाला फिगर द्या. आकड्यात पाहिजे. कॅल्सीवर मारा आणि फिगर सांगा. एकदा दिड करोडला मंजुरी दिली तर तुम्ही बोलू शकत नाही. जो काही खर्च असेल ती फिगर तुम्ही लिहा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्याच्यापेक्षा जास्तीचे लागत असेल तर आम्हाला आपल्यापुढे ठेवावे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मग जास्तीचे घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

जास्तीची कशाला घ्यायची? जी लागते तीच आम्ही .......

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कुठलीही घेउ नका. तुमची अंदाजित रक्कम आहे. बजेटमध्ये दिड करोडची तरतुद आहे. म्हणजे दिड करोड संपवायचे नाहीत. मग तुम्हाला जो काही खर्च करायचा त्याचा फिगर ठरावात येउ द्या.

**मा. सभापती :-**

ठरावात कसा येणार?

**मिलन म्हात्रे :-**

कॅल्सीवर काढतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रत्येकाची तरतुद वेगळी आणि ॲक्चुअल खर्च वेगळा. जसा खर्च होईल तसे फिगर पडतात.

**मिलन म्हात्रे :-**

पण उद्या तुम्ही खर्च वाढवाल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तसा वाढवता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

शेवटी त्या ठरावात काय झाले? तुमच्याकडे तरतुद नसताना तुम्ही दहा करोडचे विषय आणले. तुम्ही एक काम करा तुम्हाला जी रक्कम पाहिजे ती फिगर त्या ठरावामध्ये ठेवा आणि मग मंजुरी घ्या. असे चालत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आम्हाला दिड कोटी अपेक्षित आहे. ती रक्कम आपल्या सुचनेप्रमाणे त्याच्यात ठेवण्यात येत आहे. प्रशासनाला सिक्युरिटीसाठी वार्षिक दिड कोटी अपेक्षित आहे. त्याच्यासाठी वेगळी फिगर नाही. जास्तीची गरज पडली तर पूर्नविनियोजन केले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

कमीचे झाले तर?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

कमी पडली तर ते त्याच्यातून वजा राहतील. खर्च केला जाणार नाही. ती इतरत्र फंडाला उपयोग केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

त्यात नोंद करा की, संख्या दिलेली आहे पण फिगर दिलेला नाही आणि परत असे ठराव करायचे नाहीत. त्यांचे फिगर व्यवस्थित येउ द्या. ही विषयपत्रिका व्यवस्थित वाचा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांची शेवटची सुचना विचारात घेउन हा ठराव वाचायला मी विनंती करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी सुचना काय दिली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

जास्तीचा खर्च लागत असेल तर तो तुम्ही निदर्शनास आणावा. कमीचा खर्च होत असेल तर ते इतरत्र वर्ग करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचे बिल कसे बनते? जी तुमची अटेडन्स असेल त्याच्यावर तुमचे बिल बनते ना? आणि कमी असेल तर कमी बिल बनणार. तो ऑडीटर मंजुरी कसा देणार? तुम्ही सांगायला पाहिजे. ते जे म्हणतात, तुम्ही सगळे एक्सेप करा ना? तुम्ही त्यांना पटवून सांगा.

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. २८ च्या ठरावाचे वाचन सभागृहासमोर केले.)

**एस. ए. खान :-**

या महानगरपालिकेच्या विविध वास्तु व मालमत्तेचे संरक्षणार्थ हत्यारी व विनाहत्यारी सुरक्षा रक्षक पुरवठा करणेबाबत दि. १५/१२/२००७ व १७/१२/२००७ रोजीच्या दै. सन्मित्र व दै. सकाळ या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन इच्छुक ठेकेदाराकडुन बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. २०/१२/२००७ रोजी मुदतीत प्राप्त निविदाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अक्र | नाव | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. | विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | विना हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गुरुजी कन्स्ट्रक्शन | २०५/- | रु. ६१५०/- | १७२/- | रु. ५१६०/- |
| २ | निमाजीत एन्टरप्राईज | १९०/- | रु. ५७००/- | १५२/- | रु. ४५६०/- |
| ३ | मे. सैनिक इंटेलिजेन्सी एजन्सी ॲन्ड सेक्युरीटी प्रा. लि. | १८४/- | रु. ५५२०/- | १४८/- | रु. ४४४०/- |
| ४ | भारत सेक्युरीटी सर्विस | २१६/- | रु. ६४८०/- | १६८/- | रु. ५०४०/- |
| ५ | राज कन्स्ट्रक्शन | २००/- | रु. ६०००/- | १६३/- | रु. ४८९०/- |
| ६ | किशोर इंडस्ट्रिज | २२६/- | रु. ६७८०/- | १७५/- | रु. ५२५०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |
| ७ | सैनिक सिक्युरीटी सर्विस | १९८/- | रु. ५९४०/- | १५८/- | रु. ४७४०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |

वरील तपशिला प्रमाणे अ.क्र. १ ते ५ या निवीदा धारकाची तुलना करता अ.क्र. ३ चे निवीदा धारक मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी अटीशर्तीची पुर्तता केलेली असुन त्यांनी निविदा दरपत्रकात एका हत्यारी सुरक्षा रक्षकाचे दर प्रतिदिन आठ तासांसाठी रु. १८४/- (रु. ५५२०/- प्रति महिना ३० दिवस) व एका विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचे प्रतीदिन आठ तासांसाठी रु. १४८/- (रु. ४४४०/- प्रति महिना ३० दिवस) प्रमाणे नमुद असुन त्यात शासनाचे सर्वीस टॅक्स बाबत मंजुर दराचे धोरण ज्या प्रमाणे वेळोवेळी जाहीर होईल त्या प्रमाणात सदर मंजुर दरात सर्वीस टॅक्स अधिक करुन एकुण मासिक दर मंजुर करणेस मान्यता देण्यांत येत असुन त्याप्रमाणे मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा दिनांक ०१/०२/२००८ ते ३१/०१/२००९ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी मंजुर करण्यांत येत आहे. तसेच दि.०१/०१/२००८ ते ३१/०१/२००८ या एक महिन्याच्या कालावधीसाठी देण्यांत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत असुन मंजुर दराने ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. खतगांवकर साहेब, गुरुजी कन्स्ट्रक्शनकडून आपण काही वसुलीच्या नोटीसा काढल्या आहेत. त्या तुम्ही वसुल केल्या आहेत का? तुमच्या रेकॅार्डला आहेत का? डिपार्टमेन्टने दिले?

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नुकसान झालेली अमाउंट तुम्ही वसुल केली का? आपल्या मालमत्तांचे जे नुकसान झाले. त्याच्या वसुलीची तुम्ही नोटीस काढली आहे. तुमच्या डिपार्टमेन्टने तुम्हाला कळवले? आणि तो जो ठराव झाला आहे. त्या ठरावामध्ये तुम्ही ज्या सुचना केलेल्या आहेत. त्या ॲड करायला सांगा. त्याच्यामध्ये उल्लेख नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रशासन कार्यवाही करते.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते ठरावात पाहिजे. तुम्ही जे ड्रेसकोड वगैरे सांगितले तो उल्लेख त्यात कुठे आहे? त्या ठरावात तुमची सुचना घ्या. ती त्या ठरावात नाही.

**मा. सभापती :-**

सचिवांनी हा ठराव वाचून घ्यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २८ च्या ठरावाचे वाचन सभागृहासमोर केले.)

**नगरसचिव :-**

या महानगरपालिकेच्या विविध वास्तु व मालमत्तेचे संरक्षणार्थ हत्यारी व विनाहत्यारी सुरक्षा रक्षक पुरवठा करणेबाबत दि. १५/१२/२००७ व १७/१२/२००७ रोजीच्या दै. सन्मित्र व दै. सकाळ या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन इच्छुक ठेकेदाराकडुन बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. २०/१२/२००७ रोजी मुदतीत प्राप्त निविदाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अक्र | नाव | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. | विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | विना हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गुरुजी कन्स्ट्रक्शन | २०५/- | रु. ६१५०/- | १७२/- | रु. ५१६०/- |
| २ | निमाजीत एन्टरप्राईज | १९०/- | रु. ५७००/- | १५२/- | रु. ४५६०/- |
| ३ | मे. सैनिक इंटेलिजेन्सी एजन्सी ॲन्ड सेक्युरीटी प्रा. लि. | १८४/- | रु. ५५२०/- | १४८/- | रु. ४४४०/- |
| ४ | भारत सेक्युरीटी सर्विस | २१६/- | रु. ६४८०/- | १६८/- | रु. ५०४०/- |
| ५ | राज कन्स्ट्रक्शन | २००/- | रु. ६०००/- | १६३/- | रु. ४८९०/- |
| ६ | किशोर इंडस्ट्रिज | २२६/- | रु. ६७८०/- | १७५/- | रु. ५२५०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |
| ७ | सैनिक सिक्युरीटी सर्विस | १९८/- | रु. ५९४०/- | १५८/- | रु. ४७४०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |

वरील तपशिला प्रमाणे अ.क्र. १ ते ५ या निवीदा धारकाची तुलना करता अ.क्र. ३ चे निवीदा धारक मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी अटीशर्तीची पुर्तता केलेली असुन त्यांनी निविदा दरपत्रकात एका हत्यारी सुरक्षा रक्षकाचे दर प्रतिदिन आठ तासांसाठी रु. १८४/- (रु. ५५२०/- प्रति महिना ३० दिवस) व एका विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचे प्रतीदिन आठ तासांसाठी रु. १४८/- (रु. ४४४०/- प्रति महिना ३० दिवस) प्रमाणे नमुद असुन त्यात

शासनाचे सर्वीस टॅक्स बाबत मंजुर दराचे धोरण ज्या प्रमाणे वेळोवेळी जाहीर होईल त्या प्रमाणात सदर मंजुर दरात सर्वीस टॅक्स अधिक करुन एकुण मासिक दर मंजुर करणेस मान्यता देण्यांत येत असुन त्याप्रमाणे मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा दिनांक ०१/०२/२००८ ते ३१/०१/२००९ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी मंजुर करण्यांत येत आहे. तसेच दि.०१/०१/२००८ ते ३१/०१/२००८ या एक महिन्याच्या कालावधीसाठी देण्यांत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत असुन मंजुर दराने ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावाला ज्या सुचना केलेल्या आहेत त्यांचा अंतर्भूत कुठे आहेत? ते त्याच्यात पाहिजे. एवढी चर्चा करुन फायदा काय? असे लिहा की या ठरावाला केलेल्या सुचनांसहित हा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केल्या. त्या ॲग्रीमेंटमध्ये नमुद कराव्या.

**प्रकरण क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे व महत्वाच्या वास्तुंचे संरक्षणार्थ ठेका पद्धतीने हत्यारी व बिनहत्यारी सुरक्षारक्षक पुरवठा करणेबाबत.

**ठराव क्र. १९ :-**

या महानगरपालिकेच्या विविध वास्तु व मालमत्तेचे संरक्षणार्थ हत्यारी व विनाहत्यारी सुरक्षा रक्षक पुरवठा करणेबाबत दि. १५/१२/२००७ व १७/१२/२००७ रोजीच्या दै. सन्मित्र व दै. सकाळ या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन इच्छुक ठेकेदाराकडुन बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. २०/१२/२००७ रोजी मुदतीत प्राप्त निविदाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अक्र | नाव | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. | विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचा प्रति आठ तासाचा दर रु. | विना हत्यारी सुरक्षा रक्षकाचा एक महिन्याचा दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | गुरुजी कन्स्ट्रक्शन | २०५/- | रु. ६१५०/- | १७२/- | रु. ५१६०/- |
| २ | निमाजीत एन्टरप्राईज | १९०/- | रु. ५७००/- | १५२/- | रु. ४५६०/- |
| ३ | मे. सैनिक इंटेलिजेन्सी एजन्सी ॲन्ड सेक्युरीटी प्रा. लि. | १८४/- | रु. ५५२०/- | १४८/- | रु. ४४४०/- |
| ४ | भारत सेक्युरीटी सर्विस | २१६/- | रु. ६४८०/- | १६८/- | रु. ५०४०/- |
| ५ | राज कन्स्ट्रक्शन | २००/- | रु. ६०००/- | १६३/- | रु. ४८९०/- |
| ६ | किशोर इंडस्ट्रिज | २२६/- | रु. ६७८०/- | १७५/- | रु. ५२५०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |
| ७ | सैनिक सिक्युरीटी सर्विस | १९८/- | रु. ५९४०/- | १५८/- | रु. ४७४०/- (कागद पत्र पुर्ण नाहीत.) |

वरील तपशिला प्रमाणे अ.क्र. १ ते ५ या निवीदा धारकाची तुलना करता अ.क्र. ३ चे निवीदा धारक मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी अटीशर्तीची पुर्तता केलेली असुन त्यांनी निविदा दरपत्रकात एका हत्यारी सुरक्षा रक्षकाचे दर प्रतिदिन आठ तासांसाठी रु. १८४/- (रु. ५५२०/- प्रति महिना ३० दिवस) व एका विनाहत्यारी सुरक्षा रक्षकाचे प्रतीदिन आठ तासांसाठी रु. १४८/- (रु. ४४४०/- प्रति महिना ३० दिवस) प्रमाणे नमुद असुन त्यात शासनाचे सर्वीस टॅक्स बाबत मंजुर दराचे धोरण ज्या प्रमाणे वेळोवेळी जाहीर होईल त्या प्रमाणात सदर मंजुर दरात सर्वीस टॅक्स अधिक करुन एकुण मासिक दर मंजुर करणेस मान्यता देण्यांत येत असुन त्याप्रमाणे मे. सैनिक इन्टेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा दिनांक ०१/०२/२००८ ते ३१/०१/२००९ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी मंजुर करण्यांत येत आहे. तसेच दि.०१/०१/२००८ ते ३१/०१/२००८ या एक महिन्याच्या कालावधीसाठी देण्यांत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत असुन मंजुर दराने ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.** **अनुमोदन:- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, दूरध्वनी व भ्रमणध्वनी देयक अदा करणेकामी येणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतुद संपलेली असल्याने पुर्नविनीयोजनेव्दारे वाढीव तरतुद उपलब्ध करुन दण्याबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये कोणते फोन कोण वापरतो? त्या बिलापोटी त्याचे किती पैसे आले? म्हणजे प्रत्येक गोष्ट दिली पाहिजे ते देत नाही. वेळ जातो. हा मा. सभापतींचा फोन आहे. त्याचे पाच लाख फोनचे बिल आलेले आहे. कोणता डिपार्टमेंट किती फोन वापरतो हे माहिती पडू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

हे लँडलाईन आहे, रिलायन्स वगैरे सगळे पकडून आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सर्व सदस्यांना याबाबतची माहिती देउ इच्छितो.

**शरद पाटील :-**

आणखीन एक माहिती याच्या जोडीलाच द्या. जे अधिकारी आपण कार्यमुक्त केले. त्यांचे फोन परत घेतले आहेत का? आपण दोन अधिकारी इथून कार्यमुक्त केले. त्यांचे फोन आपण जमा केले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेचे जे फोन पदाधिकारी/अधिकाऱ्यांना देतात. त्या सुविधा पदाधिकारी/अधिकारी महापालिकेच्या त्या पदावर कायम असेपर्यंतच आहेत. महापालिकेसाठीच ही सुविधा आहे. पदाधिकारी किंवा अधिकारी त्या पदावरून रिक्त होतात किंवा ट्रान्सफर होतात. त्यांची सुविधा व्हॅकेट केली जाते आणि संबंधित जे दोन अधिकारी गेलेले आहेत. त्यांचे पगार राखून ठेवलेले आहेत. त्यांना तशी पत्र दिलेली आहेत. त्यांचे प्रस्तावसुद्धा प्राप्त झालेले आहेत. की ही रक्कम आमच्याकडून कपात करुन घ्या. आणि मा. आयुक्तांनी त्यांचा फोन आपल्याकडे जमा केलेला आहे आणि इतर पदाधिकारीसुद्धा वेळोवेळी त्यांचे पद संपुष्टात आल्यानंतर त्या सुविधा आपल्याकडे जमा करतात. आपल्याकडे मा. महासभेने, मा. स्थायी समितीने निश्चित केलेल्या तरतुदीच्या अधिन त्याचा मासिक खर्च केला जातो. त्याचे स्टँन्ड निश्चित केलेले आहेत. म्हणजे पदाधिकाऱ्यांनी फोनवर मासिक खर्च किती करावा? अधिकाऱ्यांनी किती करावा? त्या लिमिटपेक्षा एक रुपया जरी जास्त झाला...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आम्ही तेच म्हणतो की ते आम्हांला द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपण ती कार्यवाही करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला माहिती पडू द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तीच माहिती सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तेच लेखी दिले तर काय बिघडणार आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तुम्ही ते करण्यासाठी प्रशासन ठेवले आहे. प्रशासन ती कार्यवाही करते. तुम्हांला कोणाचाही विश्वास नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आमच्याकडून लेखी परमिशन घेता ना? हा विश्वासाचा प्रश्न नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपल्याकडे १२६ दूरध्वनी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

१५० असू द्या. तुम्हांला माहिती आहे का की एकही अधिकारी संध्याकाळी पाच वाजल्यानंतर कुठलाही फोन उचलत नाही. आम्ही याला कशाला मंजूरी द्यायची. सगळे फोन रद्द करा. गर्व्हमेंटचा एक जी.आर. आहे. तुम्हांला ही टेलिफोनची व्यवस्था देता येणार नाही. मी जी.आर. आणून देतो.

**मा. सभापती :-**

मा. महासभेमध्ये हा विषय तुम्हीच आणलेला आणि सर्वांना फोन द्यायला लावले.

**मिलन म्हात्रे :-**

मी आणलेला नाही. उगाच खोटे वक्तव्य करु नका.

**मा. सभापती :-**

आजपासून फोन बंद करायला लावू.

**मिलन म्हात्रे :-**

बंद करा. पाच वाजल्यानंतर अधिकारी फोन उचलत नाही. शनिवार रविवार फोन बंद असतात.

**मा. सभापती :-**

तुम्ही तक्रार करता फोन वाजतात, कोण फोन उचलत नाही. मग कशासाठी फोन हवेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मग तुम्ही त्यांच्यावर ॲक्शन घ्या.

**मा. सभापती :-**

कसली ॲक्शन घ्यायची? याच्यापुढे बजेटमध्ये नाही पाहिजे. आजपासून सर्व अधिकाऱ्यांचे फोन बंद करा. आपल्याला हा अठ्ठावीस लाखाचा लॉस नको.

**मिलन म्हात्रे :-**

या अगोदर आपण ही जी बिले पास केली नव्हती. या अगोदर सर्व अधिकारी आपले फोन वापरत होते.

**मा. सभापती :-**

हा विषय कोणी मंजूर केला?

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता तुम्ही मंजूरी दिल्यानंतर ते फोन लागतच नाहीत. स्विच ऑफ माणूस बाहेर असेल तर नॉट रिचेबल येतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मोबाईलची आणि लॅण्डलाईनची ॲप्रॉक्सीमेट बिलींग किती आहे ते सांगा.

**नयना म्हात्रे :-**

नगरपालिकेत अधिकाऱ्यांना जे फोन दिले ते बंद केले तर त्यांना खरोखर बरे वाटेल. म्हणजे आम्ही सुटलो असे होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब जरा अमाउंट सांगा की, भ्रमण ध्वनीचे किती आणि लॅण्डलाईनचे किती आहे? अंदाज सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मा. स्थायी समितीने धोरणात्मक निर्णय घेउन या सुविधा महापालिकेतील पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना याच्यात काही शेवटचे कर्मचारीसुद्धा आहेत ही सुविधा इजी कम्यूनिकेशन, कामामध्ये शिघ्रता आणि एकमेकांचा कॉन्टॅक्ट व्हावा या उद्देशाने दिलेली आहे. आणि ही एका आपल्या महापालिकेत आहे असे नाही. महाराष्ट्राच्या नगरपालिका आणि महानगरपालिका इतरत्र ठिकाणी या सुविधा चालू आहेत. आपण सर्वात शेवटी याच्यामध्ये आलेलो आहे. फार शेवटी आपण ही सुविधा आपल्या महापालिकेत लागू केलेली आहे. इतर महापालिकांची माहिती घेउन यामध्ये कोणी एकाने सॅक्शन केले किंवा नाही केले हा विषय नाही. पूर्ण मा. स्थायी समितीने याला मान्यता दिलेली कदाचित काही सदस्यांचा त्याला त्यावेळेस विरोधही असेल पण बहूमताने हा निर्णय झालेला होता.साधारणतः एप्रिल २००७ ते नोव्हेंबर २००७ महिन्याचे आकडे आम्ही काढलेले आहेत. एप्रिल २००७ मध्ये दूरध्वनीचे बिल आहे एक लाख तीन हजार चारशे नव्याण्णव आणि भ्रमणध्वनीचे बिल आहे एक लाख अठ्ठावीस हजार तीनशे सत्याण्णव. मे महिन्याचे लॅंडलाईन चे बिल एक लाख एक हजार सहाशे सत्याहत्तर आहे आणि मोबाईलचे एक लाख वीस हजार चारशे चाळीस बिल आहे. अशी जर पूर्ण माहिती आठ महिन्यांची काढली. एक लाख वीस हजार चारशे चाळीस जूनचे दूरध्वनीचे बिल एक्याण्णव हजार बासष्ट रुपये आहे. आणि मोबाईलचे एक लाख तेहतीस हजार आठशे अठ्ठ्याऐंशी. जुलैच्या दुरध्वनीचे बील ब्याऐंशी हजार दोनशे एकात्तर मोबाईलचे बिल एक लक्ष आठ हजार चारशे अठरा आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये दूरध्वनीचे बिल सत्याऐशी हजार चारशे सहाऐंशी आहे आणि मोबाईलचे बिल एक लक्ष आठ हजार सतरा रुपये आहे. पूर्वी एक लाख आठ हजार चारशे अठरा होता. तर असे आपण आठ महिन्याचे कॅल्क्यूलेशन केले तर एकूण दूरध्वनीचे बिल सात लाख एकशे चौदा रुपये आहे. आणि मोबाईलचे बिल नउ लाख साठ हजार चारशे एक आहे. आणि या वर्षामध्ये जे नवीन गरूडा फोन घेतलेले आहेत. त्यांचे आठ महिन्याचे बिल चौसष्ट हजार एकशे तेहतीस आहे. आपण नवीन फोनसाठी पाच लाखाची आर्थिक तरतुद ठेवलेली आहे. त्यामध्ये नोव्हेंबर अखेरपर्यंत फक्त सव्वीस हजार नउशे नव्वद खर्च झालेला आहे.

**शरद पाटील :-**

याच्यामध्ये खर्चाची किती तरतुद आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

या सर्व सुविधेसाठी आपल्या बजेटमध्ये वीस लाखाची तरतुद होती.

**शरद पाटील :-**

तरतुद वीस लाखाची आहे. पण अधिकाऱ्यांना फोन दिले. त्यांनी किती वापरायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

उपायुक्तांना दोन हजार पर्यंतची लिमिट आहे. पदाधिकाऱ्यांनासुद्धा दोन हजाराची लिमिट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही वसूली किती केली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

माझ्याकडून चौदा हजारांची वसूली झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तसे आम्हांला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हांला विश्वास नाही हा शब्द या प्लॅटफॉर्मला अपेक्षित नाही. इट इज व्हेरी रॉंग. म्हणजे आपण अविश्वासाचे काम करत नाही.

**मिलन म्हात्रे :-,**

आपण या सभेला बसलेले आहोत. तुम्ही जर आम्हांला लेखी फिगर दिली नाही तर आम्ही काय म्हणायचे? तुमचा आमच्यावर विश्वास नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या महापालिकेतून एक पैसा नियमबाह्य काढता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. पण ते काढले जातात.

**शरद पाटील :-**

साहेब तेवढे जे टाईप केलेले आहे त्याची झेरॉक्स द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रत्येक महिन्याला रिलायन्सकडून बिल येते. आपण जे लिमिट ठेवलेले आहे. त्याच्यापेक्षा एकही पैसा जास्तीचे कोणाचे बिल झाले तर ते त्याच्या पगारातून वसूल केले जातात.

**मिलन म्हात्रे :-**

हे तुम्ही बोलता. आम्ही बोलतो की, आम्हांला लेखी द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मी बोलतो म्हणजे ऑथोराईज बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे आम्हाला लेखी द्या. आम्हाला कळू द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्याला शंका असेल तर तुम्ही चेंक करु शकता. एखाद्या महिन्याचेसुध्दा लेजर मागवू शकता.

**शरद पाटील :-**

साहेब, आपली साडेतीनशे करोडची पालिका आहे. आपण एखादी झेरॉक्स दिली तर आपल्याला फरक पडणार आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एका महिन्याची झेरॉक्स मी आपल्याला देईन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्यावेळेला तुम्ही तरतुद मागवणार त्यावेळी मागची दिली तरी चालेल.

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक दिली तरी चालेल. मागच्या वेळेला असे पत्र होते की, अॅन्टी चेंबरला जे फोन आहेत. ते पदाधिकारी किंवा अधिकारी नसेल तर आपले कर्मचारी वापरतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक उदाहरण म्हणून मी तुम्हाला सांगतो. यामुळे तुमचा विश्वास वाढेल. मी जुलै २००७ चे मोबाईलचे बिल तुम्हाला सांगितलेल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जनरल. टोटल.

**मिलन म्हात्रे :-**

आपले जे नगरसेवक डिसक्वॉलीफाय झाले त्यांचे काय? त्यांचा फोन काढून घेतला की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, तुम्ही कुठला विषय कुठे घेउन जाता.

**मिलन म्हात्रे :-**

फोनचा विषय आहे. तुम्ही आयुक्तांचे सांगितले, अधिकाऱ्यांचे सांगितले. मग नगरसेवक डिसक्वालीफाय झाले त्यांचे काय केले? त्याचे पत्र मी रिलायन्सला देतो.

**शरद पाटील :-**

कोणत्या नगरसेवकांचे फोन आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

हा आमचा ग्रुपमध्ये ॲड आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते तुमचे पर्सनल बिल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या ग्रुपमध्ये आहे. याच्या कायम सुविधा आहेत हे मला माहित आहे. तुम्ही माझे पत्र रिलायन्स गॅलरीला दिलेले आहे. श्री. मिलन म्हात्रे नगरसेवक आहेत. ह्यांना ही सुविधा द्यावी. ती तुम्ही काढून घ्या.

**शरद पाटील :-**

म्हणजे जे नगरसेवक नाहीत त्यांचे बोलता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या ग्रुपमध्ये त्यांना सुविधा असेल तर रद्द केली जाईल.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, गेल्यावेळेला बऱ्याचशा कमिटीच्या अध्यक्षांना आपण फोन दिले होते. ते जमा केले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी एक मुद्दा सांगतो. आपल्याला एक रेकॉर्ड म्हणून सांगतो. जुलै २००७ चे मोबाईलचे बिल एक लाख आठ हजार चारशे अठरा आहे. त्याच्यामध्ये ज्या अपेक्षित रक्कमा आहेत. त्या देय रक्कमेपेक्षा जास्त झालेल्या आहेत. असे तीस हजार दोनशे सदुसष्ट रुपये आपण संबंधित जे वापरदार आहेत. त्यांच्याकडून वसुल केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मायनस तुमचे चौदा. फक्त सोळा हजार झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझे जुलैमध्ये नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

ही वार्षिक दिली की मासिक दिली?

**शरद पाटील :-**

साहेब, आत्ता जो विषय आहे की, अधिकारी फोन चालू ठेवत नाहीत. त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार? तुम्हाला रेड हॅन्ड पकडून देतो. त्यांच्यावर काय कार्यवाही करणार आहात?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ठरवू त्या वेळेला आपण बसू आणि सगळ्यांना फोन लावू या. ज्याचा फोन लागणार नाही त्याच कंटी फेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

लेटेस्ट बिलामध्ये श्री. खतगांवकर यांच्याकडे पंधरा हजार पाचशे ब्याऐंशी पॉईंट तीस पैसे होते.

**शरद पाटील :-**

साहेब, तुम्ही सागितलेतुम्ही खरेच भरले असतील. तुम्ही वसुली पण केली असेल. आम्ही जे विचारतो त्याचे उत्तर द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. अजित पाटील यांच्याकडे एक हजार नउशे पंचविस वसुल केले. श्री. पानपट्टे साहेबांकडे बारा हजार नउशे ब्याऐंशी पॉईंट सत्तर पैसे वसुल केले. सर्वांकडून वसुल केलेले आहेत.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, गेल्यावेळेला २००२ मध्ये आपले इलेक्शन झाले. त्यावेळेला बऱ्याचशा कमिटी स्थापन झालेल्या होत्या. त्यावेळेला आपण मा. सभापती व मा. उपसभापतींना फोन दिलेले. ते जमा केले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो.

**नयना म्हात्रे :-**

सगळे जमा केले?

**शरद पाटील :-**

सगळे केले का? श्री. परब साहेब, नक्की सगळे जमा केले? बघा एक बाकी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तो नंबर खाजगी केला.

**नयना म्हात्रे :-**

पण आपल्या पालिकेने त्यांना जे रिलायन्स फोन दिलेले ते सगळे जमा केले का?

**शरद पाटील :-**

साहेब, हा विषय एकच राहिला. जर हे फोन बंद असतील तर अधिका-यांवर तुम्ही काय कार्यवाही कराल ते सांगा.

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहब, कोई भी अधिकारी है। इनकी कोई लिमिटेशन होगी ना? साडेपाच के बाद भी अगर यह अपना वही फोन युज करते है, ऑफिशीयल काम के लिए या अन-ऑफिशियल काम के लिए तो उसके लिए क्या लिमिटेशन्स है?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

अधिकारीयोंको देड हजार से दो हजार तक मंथली लिमिट है।

**शानु गोहिल :-**

उसके उपर बिल आया तो क्या कार्यवाही होगी?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

उसके पगार से वसुल करते है।

**शानु गोहिल :-**

तो वह डिटेल्स आप हम लोगों को दिजिए।

**शरद पाटील :-**

हम लोग कब से वही बोल रहे है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मी तुम्हाला विनंती करतो की, कोणाला अशी काही शंका असेल तर तुम्ही सामान्य प्रशासन विभागाकडून यादी घेउ शकता.

**शानु गोहिल :-**

साहेब, तुम्ही आम्हाला ऑफिशिअली द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, ते फोन बंद करा आणि पुढच्या वर्षापासून तीस लाख रुपये वाचवा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्ही बंद करायला सांगत नाही. आम्ही एकच विचारतो. जर हे फोन बंद असतील तर त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

शक्यतो जे विभागप्रमुख आहेत त्यांना आम्ही सक्त सुचना दिलेल्या आहेत. वेळोवेळी सन्मा. सदस्यांनी आमच्याकडे ज्या तक्रारी केलेल्या आहेत. त्यांना नोटीसा काढलेल्या आहेत आणि १०० टक्के को-ऑर्डीनेशन ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करतो. असे कोणी जर मुद्दाम बंद केले तर त्याची नोंद घेउन आम्ही कार्यवाही करु.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता हे दुरध्वनीचेच आहे. माझ्या हातामध्ये दिवटे साहेबांचे पत्र आहे. साहेब, ह्या गोष्टीला तीन दिवस झाले ना? आपल्या डिपार्टमेन्टतर्फे आम्हाला हे सुधारीत अजून दिलेले नाही. हा आजचा तिसरा दिवस आहे. आम्ही जे काही ॲग्रेसीव्ह होउन इकडे बोलतो. ही श्री. दिवटे साहेब, उपायुक्त (वाहन) यांची सही आहे. आणि हे फोन नंबर बॉम्बेला लागतात. तुम्ही मला त्या दिवशी समजावले. मी समजून घेतले. तुम्ही सगळे लाईटली घेउ नका. तुम्ही आदेश दिले. तुमच्या डिपार्टमेन्टच्या अधिका-याला तुम्ही माझ्या समोर आदेश दिले. त्या अधिका-याने एक तासामध्ये सगळे मॉडीफाय करुन आणले पाहिजे होते. तिसरा दिवस आहे. अजूनपर्यंत शववाहिनी आणि फायरब्रिगेडचे हे दुरध्वनी आजही बॉम्बेला लागतात. तुमच्या उपायुक्तांना कळत नाही? त्यांनी सही कशी काय करुन दिली?

**शरद पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, याचा खरेच खुलासा करा. ते फोन कुठे लागतात? ते नंबर कसे दिले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

शववाहिनी आणि ॲम्बुलन्ससाठी जे नंबर दिलेले आहेत .........

**मिलन म्हात्रे :-**

दोन मारवाडी कुटूंब आणि एक गुजराथी कुटूंब आहे. तीन ठिकाणी बॉम्बेला फोन लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये हे गरुडाचे नंबर आहेत. तर त्यामध्ये आपण मोबाईलवरुन जर लावत असाल तर ०२२ लावून तो नंबर लावायचा आणि सहापासून जे नंबर सुरु आहेत, टाटाचे नंबर आहेत. तर ते दोन न लावता लावायचे. तर त्याच्यामुळे श्री. मिलन म्हात्रे साहेबांची ही गैरसोय झालेली आहे.

**मा. सभापती :-**

श्री. म्हात्रे साहेब, कल्पना घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचा आदेश उपायुक्त श्री. दिवटे साहेबांनी निर्गमित केला होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी सांगितले. पण तुम्ही मॉडीफाय करुन द्यायला नको का? आजचा हा तिसरा दिवस आहे. तुम्ही लगेच कळवले पाहिजे. त्या अधिकाऱ्याने तीन दिवस तुमचे काहीच मानले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, एक सुचना आहे. मी श्री. परब साहेबांना एक नविन यादी बनवायला सांगितले होते.

(सन्मा. सदस्या सौ. सुनिता पाटील यांनी प्रकरण क्र. २९ चा ठराव सभागृहासमोर मांडला)

**सुनिता पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेअंतर्गत विविध प्रशासकिय विभागात पदाधिकारी/ अधिकारी यांना त्यांचे कक्षात /कार्यालयात दुरध्वनींची स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे तर काही कक्षांत टेलिफोन ऑपरेटरकडून डायरेक्ट ९ नंबरची सेवा सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. मुख्यकार्यालयात टेलिफोन बोर्डवर एकुण ११ दुरध्वनीच्या लाईन आहेत. तसेच महानगरपालिकेचे सर्व विभाग, प्रभाग कार्यालये व पाण्याच्या टाक्या, अग्निशमन विभाग, रुग्णवाहीका, शववाहीनी इ. ठिकाणी दुरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे या सर्व दुरध्वनीची मासीक देयके तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांना भ्रमणध्वनीची मर्यादीत रकमेची सेवा उपलब्ध करुन देण्यांत आलेली असुन त्याचेही देयक "दुरध्वनी बील" या लेखाशिर्षा मधुन खर्ची टाकण्यांत येते. त्यामुळे सद्यस्थितीत म्हणजेच सन २००७-०८ या अर्थसंकल्पात "दुरध्वनी बील" या लेखाशिर्षात रु. २० लाखाची तरतुद ठेवण्यांत आली होती त्या तरतुदीतून सद्यस्थितीत रु.४०,३१२/- एवढी रक्कम शिल्लक आहे. मासीक सरासरी दुरध्वनीची देयके पहाता माहे डिसेंबर - २००७ ते मार्च — २००८ पर्यंतची दुरध्वनीची देयके प्रदान करणेस त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतुद रक्कम कमी पडणार असल्याने प्रती महिना अंदाजे रु.२,१३,०००/- प्रमाणे ३१/०३/२००८ पर्यंत रु.८,५०,०००/- ची वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे.

नमुना क्रमांक . १० नियम - ३० (३)

| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रु. | अद्यावत खर्च रु. | उपलब्ध शिल्लक रु. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रु. | अद्यावत खर्च रु. | शिल्लक रु. | प्रस्तावित आवश्यक रक्कम रु. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १. | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च<br>भांडवली खर्च (सा.प्र.)<br>१) नविन दुरध्वनी व्यवस्था | - | ५,००,०००/- | २६,०१०/- | ४,७३,९९०/- | भांडवली खर्च (सा.प्र.)<br>१) नविन दुरध्वनी व्यवस्था | - | ५,००,०००/- | २६,०१०/- | ४,७३,९९०/- | ४,५०,०००/- | नविन दुरध्वनी व्यवस्था लेखाशिर्षाखाली रु.५,००,०००/-एवढी तरतुद असून आजपर्यंत खर्च झालेली रक्कम पाहता ३१ मार्च २००८ पर्यंत होणारा खर्च गृहीत धरता नविन दुरध्वनी व्यवस्था, टायपिंग, झेरॉक्स सायक्लोस्टाईल मशिन दुरुस्ती/दुरुस्ती यंत्रणा व पोस्टेज स्टँम्प, रेव्हेन्यु स्टँम्प यालेखाशिर्षातून रु.८,५०,०००/- दुरध्वनी बिल या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |
| २. | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च<br>सामान्य प्रशासन भाग (९) टायपिंग, झेरॉक्स सायक्लोस्टाईल मशिन दुरुस्ती/ दुरुस्ती यंत्रणा | - | ४,००,०००/- | - | ४,००,०००/- | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च<br>भाग — ८ दुरध्वनी बिल | - | २०,००,०००/-<br>४,००,००० | १९,५९,६८८/-<br>- | ४०,३१२/-<br>४,००,०००/- | २,००,०००/- | |
| ३. | भाग (१०) पोस्टेज स्टँम्प, रेव्हेन्यु स्टँम्प इ. | - | ३,००,०००/- | - | ३,००,०००/- | | - | ३,००,०००/- | - | ३,००,०००/- | २,००,०००/- | |

तरी वरील विवरणपत्रातील नमुना क्र.१० मध्ये सादर केलेल्या पुर्नविनियोजन पत्रकातील तपशिलाप्रमाणे मंजुरी देण्यांत येत आहे. त्यानुसार लेखा विभागाचे मंजुर पुर्नविनियोजन पत्रकानुसार तरतुदी बदलण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर. ठराव वाचून कायम करण्यांत आला.

**नगरसचिव :-**

ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

दुरध्वनी व भ्रमणध्वनी देयक अदा करणेकामी येणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतुद संपलेली असल्याने पूर्नविनियोजनाद्वारे वाढीव तरतुद उपलब्ध करुन देण्याबाबत.

**ठराव क्र. २०:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेअंतर्गत विविध प्रशासकिय विभागात पदाधिकारी/ अधिकारी यांना त्यांचे कक्षात /कार्यालयात दुरध्वनींची स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे तर काही कक्षांत टेलिफोन ऑपरेटरकडून डायरेक्ट ९ नंबरची सेवा सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. मुख्यकार्यालयात टेलिफोन बोर्डवर एकुण ११ दुरध्वनीच्या लाईन आहेत. तसेच महानगरपालिकेचे सर्व विभाग, प्रभाग कार्यालये व पाण्याच्या टाक्या, अग्निशमन विभाग, रुग्णवाहीका, शववाहीनी इ. ठिकाणी दुरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे या सर्व दुरध्वनीची मासीक देयके तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांना भ्रमणध्वनीची मर्यादीत रकमेची सेवा उपलब्ध करुन देण्यांत आलेली असुन त्याचेही देयक "दुरध्वनी बील" या लेखाशिर्षा मधुन खर्ची टाकण्यांत येते. त्यामुळे सद्यस्थितीत म्हणजेच सन २००७-०८ या अर्थसंकल्पात "दुरध्वनी बील" या लेखाशिर्षात रु. २० लाखाची तरतुद ठेवण्यांत आली होती त्या तरतुदीतून सद्यस्थितीत रु.४०,३१२/- एवढी रक्कम शिल्लक आहे. मासीक सरासरी दुरध्वनीची देयके पहाता माहे डिसेंबर - २००७ ते मार्च – २००८ पर्यंतची दुरध्वनीची देयके प्रदान करणेस त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतुद रक्कम कमी पडणार असल्याने प्रती महिना अंदाजे रु.२,१३,०००/- प्रमाणे ३१/०३/२००८ पर्यंत रु.८,५०,०००/- ची वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे.

नमुना क्रमांक . १० नियम - ३० (३)

| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रु. | अद्यावत खर्च रु. | उपलब्ध शिल्लक रु. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रु. | अद्यावत खर्च रु. | शिल्लक रु. | प्रस्तावित आवश्यक रक्कम रु. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १. | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च भांडवली खर्च (सा.प्र.) १) नविन दुरध्वनी व्यवस्था | - | ५,००,०००/- | २६,०१०/- | ४,७३,९९०/- | भांडवली खर्च (सा.प्र.) १) नविन दुरध्वनी व्यवस्था | - | ५,००,०००/- | २६,०१०/- | ४,७३,९९०/- | ४,५०,०००/- | नविन दुरध्वनी व्यवस्था लेखाशिर्षाखाली रु.५,००,०००/-एवढी तरतुद असुन आजपर्यंत खर्च झालेली रक्कम पाहता ३१ मार्च २००८ पर्यंत होणारा खर्च गृहीत धरता नविन दुरध्वनी व्यवस्था, टायपिंग, झेरॉक्स सायक्लोस्टाईल मशिन दुरुस्ती/दुरुस्ती यंत्रणा व पोस्टेज स्टॅम्प, रेव्हेन्यु स्टॅम्प यालेखाशिर्षातुन रु.८,५०,०००/- दुरध्वनी बिल या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |
| २. | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च सामान्य प्रशासन भाग (९) टायपिंग, झेरॉक्स सायक्लोस्टाईल मशिन दुरुस्ती/ दुरुस्ती यंत्रणा | - | ४,००,०००/- | - | ४,००,०००/- | (अ) सामान्य प्रशासन व वसुली खर्च भाग – ८ दुरध्वनी बिल | - | २०,००,०००/- ४,००,००० | १९,५९,६८८/- - | ४०,३१२/- ४,००,०००/- | २,००,०००/- | |
| ३. | भाग (१०) पोस्टेज स्टँम्प, रेव्हेन्यु स्टँम्प इ. | - | ३,००,०००/- | - | ३,००,०००/- | | - | ३,००,०००/- | - | ३,००,०००/- | २,००,०००/- | |

तरी वरील विवरणपत्रातील नमुना क्र.१० मध्ये सादर केलेल्या पुर्नविनियोजन पत्रकातील तपशिलाप्रमाणे मंजुरी देण्यांत येत आहे. त्यानुसार लेखा विभागाचे मंजुर पुर्नविनियोजन पत्रकानुसार तरतुदी बदलण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

**सुचक :- श्रीम. सुनिता पाटील.** **अनुमोदन:- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३०, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ- प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका, इतर छपाई खर्च या लेखाशिर्षात पूर्नविनियोजनाद्वारे निधी वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ३० चा ठराव सभागृहासमोर मांडला)

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी महानगरपालिके मार्फत मोफत प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका पुरवठा केला जातो. सदर प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका शिक्षणमंडळाचे मागणीनुसार महानगरपालिकेचे भांडार विभागाजवळुन पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर छपाई या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५,००,०००/- ची तरतुद ठेवण्यात आली होती. परंतु शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये शासनाने चार चाचणी परिक्षा, सहामाई व वार्षिक परिक्षा घेण्याचे निश्चित केलेले आहे. तसेच मागील आर्थिक वर्षाचे बील सन २००७-०८ मध्ये प्रदान केलेले आहे त्यामुळे या आर्थिक वर्षा अखेर अंदाजपत्रकात ठेवण्यात आलेली लेखाशिर्षक शिक्षण - प्राथमिक / माध्यमिक शिक्षण भाग (३) प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर छपाई मधील तरतुद संपत असल्यामुळे लेखाशिर्ष ड-शिक्षण, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण भाग-३ मधील 'शाळेचे फर्निचर, शैक्षणिक उपकरणे, खेळणी खरेदी' अंतर्गत रू. ५,००,०००/- ची शिल्लक तरतुद माहे मार्च - ०८ अखेर पर्यंत खर्च होण्याची शक्यता नसल्याबाबत विभागाने दिलेल्या नाहरकत दाखल्याचे अनुषंगाने पुढील विवरण पत्र नमुना १० अंतर्गत नमुद तरतुदी प्रमाणे वाढीव तरतुद करण्यात आलेली आहे.

## नमुना क्र. १० नियम - ३० (३)

| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रू. | अद्यावत खर्च रू. | उपलब्ध शिल्लक रू. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रू. | अद्यावत खर्च रू. | शिल्लक रू. | प्रस्तावित आवश्यक रक्कम रू. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १. | ड - शिक्षण<br>प्राथमिक/माध्यमिक शिक्षण<br>भाग-३ शाळेचे फर्निचर शैक्षणिक उपकरणे खेळणी खरेदी करणे | - | ५,००,०००/- | - | ५,००,०००/- | ड - १ शिक्षण<br>प्राथमिक/माध्यमिक शिक्षण<br>भाग-३ प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका व इतर छपाई (२२१४) | - | ५,००,०००/- | ४,४३,४२० | ५६,७६० | ५,००,०००/- | शाळेचे फर्निचर शैक्षणिक उपकरणे, खेळणी खरेदी करणे या लेखाशिर्षाखाली रू. ५,००,०००/- एवढी तरतुद शिल्लक असून आजपर्यंत अद्याप खर्च झालेला नसुन ३१ मार्च २००८ पर्यंत खर्च होणार नाही त्यामुळे सदर लेखाशिर्षातुन रू. ५,००,०००/- एवढी रक्कम प्रश्नपत्रिका व इतर छपाई या लेखाशिर्षाखाली वर्ग होणेस. |

तरी वरील विवरणपत्रातील नमुना क्र. १० मध्ये सादर केलेल्या पुर्नविनियोजन पत्रकातील तपशिलाप्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार लेखा विभागाचे मंजुर पुर्नविनियोजन पत्रकानुसार तरतुदी बदलण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

**सुनिता पाटील / तुळशिदास म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. खतगांवकर साहेब, याच्यामध्ये सन २००७-०८ ला चार चाचणी परिक्षा, सहामाही त्या एक्स्ट्रा वाढवलेल्या परिक्षा आहेत का?

**गोविंद परब :-**

चाचणी परिक्षा वाढवल्या आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

चाचणी किती होत्या.

**गोविंद परब :-**

पूर्वी नव्हत्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पूर्वी फक्त सहामाही आणि वार्षिक परिक्षा व्हायच्या. आत्ता दोन चाचणी वाढल्या.

**प्रशांत पालांडे :-**

गेल्या वर्षीचे बॅलन्स राहिलेले किती पेमेन्ट ह्यावर्षी केले?

**गोविंद परब :-**

पावणे दोन लाख.

**प्रशांत पालांडे :-**

गेल्यावर्षीचे पावणे दोन लाख यावर्षी खर्च केले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला आत्ता पाच लाखाचे दर अपेक्षित आहेत.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यांत आला.

**प्रकरण क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, इतर छपाई खर्च या लेखाशिर्षात पूर्नविनियोजनाद्वारे निधी वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. २१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी महानगरपालिके मार्फत मोफत प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका पुरवठा केला जातो. सदर प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका शिक्षणमंडळाचे मागणीनुसार महानगरपालिकेचे भांडार विभागाजवळुन पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर छपाई या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५,००,०००/- ची तरतुद ठेवण्यात आली होती. परंतु शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये शासनाने चार चाचणी परिक्षा, सहामाई व वार्षिक परिक्षा घेण्याचे निश्चित केलेले आहे. तसेच मागील आर्थिक वर्षाचे बील सन २००७-०८ मध्ये प्रदान केलेले आहे त्यामुळे या आर्थिक वर्षा अखेर अंदाजपत्रकात ठेवण्यात आलेली लेखाशिर्षक शिक्षण - प्राथमिक / माध्यमिक शिक्षण भाग (३) प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर छपाई मधील तरतुद संपत असल्यामुळे लेखाशिर्ष ड-शिक्षण, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण भाग-३ मधील 'शाळेचे फर्निचर, शैक्षणिक उपकरणे, खेळणी खरेदी' अंतर्गत रू. ५,००,०००/- ची शिल्लक तरतुद माहे मार्च - ०८ अखेर पर्यंत खर्च होण्याची शक्यता नसल्याबाबत विभागाने दिलेल्या नाहरकत दाखल्याचे अनुषंगाने पुढील विवरण पत्र नमुना १० अंतर्गत नमुद तरतुदी प्रमाणे वाढीव तरतुद करण्यात आलेली आहे.

## नमुना क्र. १० नियम - ३० (३)

| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रू. | अद्यावत खर्च रू. | उपलब्ध शिल्लक रू. | प्रधान, गौण व तपशीलवार लेखाशिर्ष | कामे सेवा इत्यादी | मुळ निधी रू. | अद्यावत खर्च रू. | शिल्लक रू. | प्रस्तावित आवश्यक रक्कम रू. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १. | ड - शिक्षण<br>प्राथमिक/माध्यमिक शिक्षण<br>भाग-३ शाळेचे फर्निचर शैक्षणिक उपकरणे खेळणी खरेदी करणे | - | ५,००,०००/- | - | ५,००,०००/- | ड - १ शिक्षण<br>प्राथमिक/माध्यमिक शिक्षण<br>भाग-३ प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका व इतर छपाई (२२१४) | - | ५,००,०००/- | ४,४३,४२० | ५६,७६० | ५,००,०००/- | शाळेचे फर्निचर शैक्षणिक उपकरणे, खेळणी खरेदी करणे या लेखाशिर्षाखाली रू. ५,००,०००/- एवढी तरतुद शिल्लक असून आजपर्यंत अद्याप खर्च झालेला नसुन ३१ मार्च २००८ पर्यंत खर्च होणार नाही त्यामुळे सदर लेखाशिर्षातुन रू. ५,००,०००/- एवढी रक्कम प्रश्नपत्रिका व इतर छपाई या लेखाशिर्षाखाली वर्ग होणेस. |

तरी वरील विवरणपत्रातील नमुना क्र. १० मध्ये सादर केलेल्या पुर्नविनियोजन पत्रकातील तपशिलाप्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार लेखा विभागाचे मंजुर पुर्नविनियोजन पत्रकानुसार तरतुदी बदलण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदनः- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३१, महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांकरिता लागणाऱ्या औषध खरेदीसाठी मागविलेल्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे किती महिन्यांसाठी आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ते मांडू द्या. म्हणजे क्लिअर होईल.

**शानु गोहिल :-**

प्रकरण क्र. ३१, महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांकरिता लागणाऱ्या औषध खरेदीसाठी मागविलेल्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे एका वर्षाचे आहे की, तीन महिन्याचे याचा याच्यात उल्लेख नाही. ठरावामध्ये उल्लेख आहे?

**नयना म्हात्रे :-**

मुदतवाढ किती महिन्यांसाठी द्यायची?

**एस. एस. पानपट्टे :-**

हा मुदतवाढीचा विषय नाही. रेट फिक्स करुन सहा महिन्यांसाठी द्यायचे आहे.

**नयना म्हात्रे :-**

हे चुकीचे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

एक वर्षाचा असला पाहिजे.

**एस. एस. पानपट्टे :-**

हे वार्षिक टेंडर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्यांनी आरोग्य विभागाकडून वार्षिक निविदा मागविलेल्या होत्या. इलेक्शन लागल्यामुळे त्या निविदा अंतिम होउ शकल्या नाहीत. मध्ये लोकांनी निविदा भरल्या नाहीत. भरलेल्या निविदा सर्व कागदपत्रांसह नव्हत्या. त्याच्यामुळे ती प्रोसेस दोन-तीन वेळा लॅप्स झाली. पण तीच प्रोसेस आत्ता आलेली आहे. पण याच्यामध्ये तुम्हाला वार्षिक पुढच्या वर्षापर्यंत घ्यायची आहे की, याच वर्षासाठी आहे?

**प्रशांत पालांडे :-**

३१ मार्चपर्यंत घेतले पाहिजे.

**एस. एस. पानपट्टे :-**

३१ मार्च आणि पुढच्या मा. महासभेचा विषय होउन पुन्हा पावसाळा येईल. तोपर्यंत पुढची कार्यवाही होईपर्यंत जितके औषध लागेल त्याप्रमाणे आम्ही घेणार आहोत.

**प्रशांत पालांडे :-**

बजेटमध्ये दर वर्षाची तरतुद असते ना?

**एस. एस. पानपट्टे :-**

याला तरतुद आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हे दर ३१ मार्चपर्यंत आणि पुढचा ठेका फायनल होईपर्यंत असतील.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. पानपट्टे साहेब, आम्ही पहिल्यादांच स्थायी समितीमध्ये आहोत.

**एस. एस. पानपट्टे :-**

ते सगळे डिस्ट्रीब्युटर आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

२००८ म्हणजे कधी पर्यंत आहेत?

**एस. एस. पानपट्टे :-**

जुनपर्यंत लागणाऱ्या आवश्यक साधानांसाठी ते वार्षिक दर आहेत.

**मा. सभापती :-**

उसको मार्च तक करो।

**(सन्मा. सदस्या शानु गोहिल यांनी प्रकरण क्र. ३१ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)**

**शानु गोहील :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्राकरिता सन २००७-०८ साठी लागणाऱ्या औषधे व उपकरणे खरेदी करणेकरिता मा. महासभेने ठराव क्र. १७ दि. १४.०६.२००७ रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यास

अनुसरून दि. ०६.०९.२००७ रोजीच्या 'दै. लोकसत्ता', 'दै. सामना', 'दै. सकाळ' इत्यादी वृत्तपत्रांत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून दि. २१.०९.२००७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास प्रतिसाद मिळून विहीत मुदतीत १) मे. महाविर मेडिकल सप्लाय २) मे. साई सिध्दी डिस्ट्रीब्युटर्स ३) मे. रिध्दीका इन्टरप्रायझेस ४) मे. श्रीयश डिस्ट्रीब्युटर्स ५) मे. सागर एन्टरप्रायझेस ६) मे रामेश्वरम् एजन्सी ७) मे. शाह फार्मा या निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत. निविदांचा तांत्रिक तपशिल तपासला असता सर्व निविदाकारांनी निविदा अनामत रकमेचे धनाकर्ष व इतर आवश्यक ती कागदपत्रे निविदेसोबत जोडलेली आहेत.

आलेल्या निविदाचा सविस्तर तुलनात्मक अभ्यास करून निविदाकारांनी निविदेत दिलेले दर औषध उत्पादक कंपनी उत्पादित करीत असलेल्या औषधांची बाजारातील उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन व बाजारातील भाव तसेच दि. ११.१०.२००७ रोजी बोलविलेल्या वाटाघाटीनुसार आलेले नवीन दर सोबतच्या तक्त्यात जोडलेले आहे. शिफारस केलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. महाविर मेडिकल सप्लाय | - ११,१२,२६,२७,२८,५६,९१,१०४,१०६ |
| २) मे. साई सिध्दी डिस्ट्रीब्यटर्स | - ३,२२,२९,३९,४२,४३,५८,७३,१०० |
| ३) मे. रिद्दीका एन्टरप्रायझेस | - ९,१६,१८,१९,३२,५९,६४,६७,११० |
| ४) मे. श्रीयश मेडिकोज | - ३४,३५,३६,११९,१२० |
| ५) मे. सागर एन्टरप्रायझेस | - २,४,७,१०,१७,३१,३७,५३,५४ |
| ६) मे. श्री. रामेश्वरम् एजन्सी | - ५,६,८,२०,२१,३०,४४,१०१,११३ |
| ७) मे. शाह फार्मा | - १४,२३,२४,३३,३८,४७,५१,५७,७४,७५,७७,८६,८८,८९,९०,१०३,१०५,१२२ |

वरीलप्रमाणे निविदाकारांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निविदेस तसेच आवश्यकतेनुसार खरेदी करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये संपूर्ण गोडाउनचे तुम्ही अवलोकन केले. तर बरीचशी औषधे जी एक्सपायरी डेट झाली आहेत. ती गोडाउनला पडून आहेत. आणि त्याचे कोष्टक याच्यात दिलेले नाही की, मागच्या याच्यात आपण ही औषधे घेतली. त्याचें बॅलन्स शिट ऐवढे-ऐवढे आहे. त्यातली ही एक्सपायरी झालेली आहेत, ही कामाला येणारी आहेत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे प्रत्येक केसला लहान मुलापासून ते मोठ्या माणंसापर्यंत आपण जे टिटॅनिअसचे इंजेक्शन वापरतो.त्याचा उल्लेख या कुठल्याही कोष्टकामध्ये नाही. म्हणजे या कोष्टकाचा बाहेर म्हणजे त्या लाईनिंगमध्ये टिटॅनिअसचे इंजेक्शनच नाही. कुठलेही इन्फेक्शन असू द्या, खोकला, सर्दी, पडसं, ताप, किंवा कुठलेही ब्लडींग, मार लागला, काय झाले पहिले टिटॅनिअसचे इंजेक्शन लागते. एक रुपयाला ती सिरींज विकत येते. ती सिरींज जर आपल्या गर्व्हमेन्ट कोट्यातून येत नसेल तर आपण ती खाजगी मधून घेतली पाहिजे. त्याची तरतुद याच्यामध्ये नाही. ती करुन घ्यावी आणि तुम्ही रेबीजचे काय केले? रेबीजचे इंजेक्शन कोणते आहे?

**एस. एस. पानपट्टे :-**

रेबीज आपण डायरेक्ट कंपनीकडून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता त्याचा कोटा फार कमी आहे. लिस्ट माझ्याकडे आहे.

**एस. एस. पानपट्टे :-**

आपल्याकडे स्टॉक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती स्टॉक आहे ते सांगा.

**एस. एस. पानपट्टे :-**

प्रत्येक आरोग्य केंद्रवाईज आपल्याकडे स्टॉक आहे. टेंभ्याला ३८ बॅलन्स आहे. भाईंदर वेस्टला ३३ आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तारीख सांगा. तुम्ही हे लास्ट किती घेतले? कारण टेंभ्याला मी काढले तेव्हा दि. १२/१२/२००७ ला १०० आहे. श्री. पानपट्टे साहेब, तारीख सांगा.

**एस. एस. पानपट्टे :-**

सात तारीख आहे.

**मिलन म्हात्रे :-**

०७/०१ आहे का?

**एस. एस. पानपट्टे :-**

होय. टेंभा हॉस्पीटलला ३८ आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता १२/१२ ला आपल्याकडे टेंभाला १०० होते. ती आत्ता ३८ आहेत. म्हणजे संपण्याचा प्रकार बघा केवढा मोठा आहे. म्हणजे त्याचा फ्लो आपला जास्त आहे. आपला वापर जास्त आहे. हा माझा सांगण्याचा दृष्टीकोन. म्हणजे ती रिक्वायरमेट तुम्ही याच्यात ठेवले आहे का?

**एस. एस. पानपट्टे :-**

साहेब, त्याची रिक्वायरमेन्ट वेगळी असते. त्याला आपण वेगळे टेंडर काढलेले आहे. डायरेक्ट डी.डी. करुन शासनाकडून मागवून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये घेतलेल नाही का?

**एस. एस. पानपट्टे :-**

याच्यामध्ये घेतलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तो विषय का आणला नाही?

**एस. एस. पानपट्टे :-**

तो विषय मा. आयुक्त साहेबांकडे पेन्डीग आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रेबीजचे इंजेक्शन कोणी टेंडरने देत नाही. ॲडवान्स डी.डी. घेतल्याशिवाय इंजेक्शन देत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, रेबीजचे इंजेक्शन बाहेरपण डॉक्टरकडे मिळते.

**एस. एस. पानपट्टे :-**

त्याचे रेट्स फार वेगळे आहेत. त्याचे रेट्स अवास्तव आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये मेडीकलमध्ये असे आहे. रेबीजचे जे इंजेक्शन आहे. एक तर कॉन्टीटी असते. आणि तुम्ही डायरेक्ट कंपनीकडून मागवले तर ३५० रुपयाचें इंजेक्शन महापालिकेला २७० रुपयामध्ये मिळते. पण त्याच्यामध्ये अंडरकेटींग नाही म्हणून ते डायरेक्ट डी.डी. द्यावा लागतो.

**मिलन म्हात्रे :-**

मी ही चर्चा का करतो, तर साहेब, मागच्या वेळेला आपल्याकडे सर्व इंजेक्शन संपली. डॉक्टर्स नाही म्हणून सांगायला लागले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण मागवले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

लोक आमच्याकडे यायला लागले.

**एस. एस. पानपट्टे :-**

साहेब, तेव्हा कोणी निविदा भरत नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, जरा ऐकून तर घ्या. आम्हाला जे प्रसंग घडतात ते बोलतो. तुमचा डेड स्टॉक झाला किंवा स्टॉक संपला म्हणून हा प्रसंग सुरु झाला. माझा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, ज्यावेळेला आपल्याकडे दिडशेची रिक्वायरमेन्ट आहे. त्यावेळेला समजा तुमचे दिडशे संपत आले. तर तुमच्याकडे पाचशे ते हजार इंजेक्शन ॲडवान्समध्ये पाहिजेत.

**एस. एस. पानपट्टे :-**

आपल्याकडे आजही शिल्लक आहेत. आपण लगेच मागवतो.

**मिलन म्हात्रे :-**

ही आत्ताची परिस्थिती आहे. ते कधीही संपते.

**एस. एस. पानपट्टे :-**

आत्ता आपल्याकडे आठशे शिल्लक आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे कमी राहिले की, आपण लगेच कार्यवाही करायची.

**मिलन म्हात्रे :-**

आणि त्या टिटॅनिअसच्या इंजेक्शनचे काय? टिटॅनिअसचे ते हाफकीन करतात. पुढे काय? प्रायव्हेट मिळते. आम्ही विकत आणले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टिटॅनिअसचे इंजेक्शन डायरेक्ट कंपनीकडून घेतात. त्याला फ्रिजर आहे, हे आहे ते सर्व आहे. तुम्ही रिटेलमध्ये घ्यायला गेले तर तेवढी क्वान्टीटी मिळणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे असे आहे की, तुम्ही टिटॅनिअसच्या इंजेक्शनची तरतुद या कोष्टकात करुन ठेवा. वार्षिक करुन ठेवा. काय अडचण आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मेडीकलमध्ये जी एक महत्वाची गोष्ट आहे. आपण जो स्टॉक घेतो. त्यावेळी तुम्ही लिस्ट चेक करुन घेता का? कारण प्रत्येक वेळी एक्सापयर वस्तु येतात आणि आपल्याला नंतर लवकर रिप्लेसमेन्ट होत नाही. ते रिप्लेसमेन्टसाठी गेले. कंपनीकडे पाठवले. कंपनीकडे गेले. ते जमा-खर्च सिस्टम तुमच्यामध्ये नाही.

**एस. एस. पानपट्टे :-**

ज्यची एक्सापयरी लवकर आली आहे ते आपण लवकर युज करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

युज करण्यापेक्षा त्याला घेता कशाला? याच्यामध्ये अट टाका की, आम्ही सहा महिन्यानंतरची एक्सापायरी घेणार.

**शरद पाटील :-**

घेतानाच नवीन स्टॉक घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही घेतानाच सहा महिन्याच्या पुढचा स्टॉक घ्या.

**एस. ए. पानपट्टे :-**

प्रत्येक औषधाची एक्सपायरी वेगळी असते. ॲन्टी बायोटीकल कमी असते. व्हिटॅमिनला जास्त असते. प्रत्येक ड्रग्जवाईस एक्सपायरी वेगळी असते. घेताना मॅक्झीमम एक्सपायरी डेट कशी राहील ते आपण चेक करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्या इकडे हार्टची औषधे आहेत. तुमची औषधे आहेत, एटेनेरॉल.

**मिलन म्हात्रे :-**

ते नगरसेवक आहेत. त्यांचा स्वतःचा उद्योग व्यवसाय आहे. मी पण गप्प बसलो आहे. तुम्ही जरा त्यांच्याकडून ऐकून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्याकडे हार्टची औषधे आहेत. तुमच्याकडे फिजिशियन डॉक्टर नाही. तुम्ही जे कोणी हार्टचे पेशन्ट आले. त्यांना बाहेर डायग्नोसिस केले असेल. त्यांना औषध देत असाल. तर आत्ता हार्टची औषधे खरेदी करताना तुमच्याकडे डायगोनोसिस नाही, फिजिशियन नाही. एम.बी.बी.एस. डॉक्टर आहे. तो डायगोनोसिस कसा करणार? अशी औषधे खरेदी करताना तुम्ही विचार करा. म्हणजे फिजिशियन जे वापरतो. जनरल प्रॅक्टीकल एखाद्याल सांगेल की, आज ब्लडप्रेशर वाढले म्हणून एटेनेरॉल घे. पण उद्या तोच सांगेल की, फिजिशियनकडे जा. अशा औषधांचा साठा जास्त करु नका. ते एक्सपायरीमध्ये गेल्यानंतर त्याला तीन महिन्यानंतर रिप्लेसमेन्ट आमच्या कंपनीमध्ये देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही डे टू डे निडचे मॅक्झीमम करा.

**एस. एस. पानपट्टे :-**

स्पेशलाईज ड्रग्ज कंपन्या आहेत. त्यांच्याकडून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

वाटल्यास लिस्ट तुम्ही त्यांच्याकडून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, यांना मीच सांगितले की, तुम्ही डायरेक्ट कंपनीकडून मागवा. डॉक्टर साहेब, मी तुम्हाला सुचना केली होती. आपले जे आरोग्य केंद्र आहे. त्यामध्ये जे बोर्ड पाहिजे की, ही औषधे इथे उपलब्ध आहेत. श्वान, कुत्र्यांची औषधे उपलब्ध आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

याला स्क्रुटीनाईज बोर्ड लावा आणि त्याच्यावर लिहा की, आत्यावश्यक औषधांचा साठा उपलब्ध आहे.

**एस. ए. खान :-**

औषधे अशी खरेदी करायची की, ज्याची एक्सपायरी दोन वर्षानंतर होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एक वर्षाचा जो स्टॉक आहे तो तुमच्या स्टॉकीस्ट बसतो त्याच्या पाठीमागे पाहिजे. आणि खाली जो दवाखाना आहे. तिकडे डिस्प्लेला पाहिजे की, आमच्याकडे रेबीजचे इंजेक्शन उपलब्ध आहे. समजा शनिवार आहे. लोक शनिवार-रविवार वाट बघतात. जर नसेल तर ते प्रायव्हेट डॉक्टरकडे जाउन औषधे घेउ शकतात. तुम्ही डिस्प्लेला लिहा.

टिटॅनिअसचे आहे, रेबीजचे आहे असे लिहा. फक्त महत्वाची. वॉर्ड ऑफिसच्या बाहेर डिस्प्लेला बार्ड ठेवा त्याला चॉकने लिहा.

**एस. ए. खान :-**

यापुढे औषधांची एक्स्पायरी डेट लांबची पाहिजे. जवळची घेउ नका. म्हणजे दोन महिन्याचे होणार आहेत अशी घेउ नका. कमीत कमी दोन वर्षाचे घ्या. म्हणजे आपल्याला वापरता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्या स्टॉकमध्ये कॉम्प्युटर आहे की नाही? त्यामध्ये बिल फिडींग करताना एक्सपायरी डेटला तीन महिने आधी ते फिट करा. तीन महिन्यानंतर ती औषणे तुमच्या स्टॉकमधून निघायला नको. म्हणजे तुम्हाला प्रभाग समिती क्र. २ मध्ये द्यायचे असेल. तर तुम्ही बिल बनवताना नियर एक्सपायरी लिहा. म्हणजे ते जाणारच नाही.

**मा. सभापती (एस. ए. खान ) :-**

सदरचा ठराव वाचून कायम करण्यांत यावा.

**नगरसचिव :-**

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्राकरीता लागणाऱ्या औषध खरेदीसाठी मागविलेल्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. २२ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्राकरिता सन २००७-०८ साठी लागणाऱ्या औषधे व उपकरणे खरेदी करणेकरिता मा. महासभेने ठराव क्र. १७ दि. १४.०६.२००७ रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यास अनुसरून दि. ०६.०९.२००७ रोजीच्या 'दै. लोकसत्ता', 'दै. सामना', 'दै. सकाळ' इत्यादी वृत्तपत्रांत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून दि. २१.०९.२००७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास प्रतिसाद मिळून विहीत मुदतीत १) मे. महाविर मेडिकल सप्लाय २) मे. साई सिध्दी डिस्ट्रीब्युटर्स ३) मे. रिध्दीका इन्टरप्रायझेस ४) मे. श्रीयश डिस्ट्रीब्युटर्स ५) मे. सागर एन्टरप्रायझेस ६) मे रामेश्वरम् एजन्सी ७) मे. शाह फार्मा या निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत. निविदांचा तांत्रिक तपशिल तपासला असता सर्व निविदाकारांनी निविदा अनामत रकमेचे धनाकर्ष व इतर आवश्यक ती कागदपत्रे निविदेसोबत जोडलेली आहेत.

आलेल्या निविदाचा सविस्तर तुलनात्मक अभ्यास करून निविदाकारांनी निविदेत दिलेले दर औषध उत्पादक कंपनी उत्पादित करीत असलेल्या औषधांची बाजारातील उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन व बाजारातील भाव तसेच दि. ११.१०.२००७ रोजी बोलविलेल्या वाटाघाटीनुसार आलेले नवीन दर सोबतच्या तक्त्यात जोडलेले आहे. शिफारस केलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. महाविर मेडिकल सप्लाय | - ११,१२,२६,२७,२८,५६,९१,१०४,१०६ |
| २) मे. साई सिध्दी डिस्ट्रीब्यटर्स | - ३,२२,२९,३९,४२,४३,५८,७३,१०० |
| ३) मे. रिद्दीका एन्टरप्रायझेस | - ९,१६,१८,१९,३२,५९,६४,६७,११० |
| ४) मे. श्रीयश मेडिकोज | - ३४,३५,३६,११९,१२० |
| ५) मे. सागर एन्टरप्रायझेस | - २,४,७,१०,१७,३१,३७,५३,५४ |
| ६) मे. श्री. रामेश्वरम् एजन्सी | - ५,६,८,२०,२१,३०,४४,१०१,११३ |
| ७) मे. शाह फार्मा | - १४,२३,२४,३३,३८,४७,५१,५७,७४,७५,७७,८६,८८,८९,९०,१०३,१०५,१२२ |

वरीलप्रमाणे निविदाकारांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निविदेस तसेच आवश्यकतेनुसार खरेदी करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदनः- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३२, विकास आराखड्यातील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागांना कुंपणभिंत घालणे, माती भराव करणे कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**तुळशिदास म्हात्रे :-**

या विषयात पुर्तता नसल्यामुळे हा विषय पुढे ढकलण्यांत यावा.

**एस. ए. खान :-**

आपल्या ताब्यात आलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही परत रेफर करा. पण मा. सभापतींचे काही डायरेक्शन होउ द्या. आत्ता याच्यामध्ये आपण प्लॉट घेतले. त्याच्यात काही पैसे मिळाले. त्याचा गोषवारा इकडे दिला आहे का? की, आरक्षणामध्ये आम्ही ऐवढे जमा केले., एवढा खर्च होणार आहे. आणि ह्या आरक्षणामध्ये बऱ्याचशा ठिकाणी मातीचे लॅन्ड फिलींग झालेले आहे. मग त्याच्या खर्चाला आम्ही मंजुरी का द्यायची? प्लॉटची पोझिशन तुम्ही स्वतः जाउन बघितली का? मी स्वतः त्या प्लॉटवर जाउन आलो. मातीचा भराव ऑलरेडी झालेला आहे आणि त्याचा खर्च आपण करायला बघतो. एक तर अधिकारी फिरत नाहीत किंवा जाणूनबुजून असे ठराव आणतात आणि श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही मग असे बोलता की, हे असे होत नाही आणि तसे होत नाही.

**तुळशिदास म्हात्रे :-**

तुम्हाला दोनशे रुपये गाडीने माती मिळते.

**मिलन म्हात्रे :-**

ते दोनशे रुपये तरी का घाला? साहेब, ज्या मातीत सगळी लॅन्ड फिलींग झाली. तर तुमचा विषयच आला नाही पाहिजे. तुम्ही असे रुलिंग द्या की, ह्या विषयामध्ये जे जमा-खर्च, बाकी प्रत्यक्ष झालेले काम त्या प्लॉटवर क्युबीक फुटामध्ये जर मातीचा भराव झालेला असेल तर मातीचा भराव वगळून फक्त लांबी-रुंदीचे बांधकाम, ते किती ब्रासचे आहे त्याचा विषय आला पाहिजे. बांधकाम असेल ब्रासचा खर्च या मातीचा भराव असेल तर क्युबीकचा द्या. एका प्लॉटमध्ये अर्धे झाले अर्धे बाकी आहे. तर अर्ध्या लॅन्ड फिलींगचा खर्च करुन घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आत्ता विषय पुढे घेतलाच आहे. पण पुढे विषय आणताना त्यामध्ये किती क्षेत्रफळ जागा होती? त्यापैकी किती मिळाली? त्यापोटी किती पैसे मिळाले? आपण आत्ता भिंत बांधली. आणि अजून अर्धे क्षेत्र येणे बाकी आहे. त्यावेळी ती भिंत तोडावी लागेल काय? जर तोडायची असेल तर आत्ता बांधायची गरज काय? तारेचे कुंपण बांधा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे तुमचे आरक्षण असे आहे. आणि आत्ता तुमच्या भिंतीचे बांधकाम असे येणार आहे. तर हे तुम्हाला नंतर तोडायचे आहे. त्यापेक्षा सरळ आउटसाईड जे लेआउट आहे. त्याच्याच भिंतीचा विचार केला पाहिजे. तुम्हाला हे प्लानिंग सांगतो. तुम्ही आत्ता आतमध्ये भिंत बांधणार आणि मी तुम्हाला परत तोडावीच लागणार. कारण हे आरक्षण चौरस असे आहे. प्लस तुम्ही जो आरक्षणाचा विषय आणला आहे. त्याच्यावर अतिक्रमण किती झाले आहे? तुमच्या अधिकाऱ्यांनी हे दिले की, एक एकरचे आरक्षण आहे. चाळीस गुंठ्यांचा एक एकर होतो. त्याच्यामध्ये २० गुंठ्यामध्ये अतिक्रमण झालेले आहे. आजच्या तारखेला २० गुंठे बाकी आहेत. त्याच्यामध्ये १० गुंठ्यामध्ये मातीचा भराव आहे आणि १० गुंठ्यामध्ये पाणी आहे. अशी काहीतरी डिटेल कोष्टक पाहिजे. म्हणजे आम्हाला नेमके किती क्युबीक फुटामध्ये माती टाकायची .......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा एक विषय नाही. अशी ७० आरक्षणे आपल्या ताब्यात आलेली आहेत. शेवटी पैसा, देउन माती भराव असाच टाकायचा असेल आणि मग तिकडे अतिक्रमण होउन झोपडपट्टीला बांधणार असे नाही झाले पाहिजे. सत्तर आलेले आहेत. अजून सत्तर येतील. टोटल ३८६ आरक्षणे आहेत. समजा १५ टक्के अतिक्रमण झाले असेल. बाकीचे येणार आहेत. पण याची माती भराव व भिंतीमध्ये पहिल्यांदाच एकदा आपण शिस्त लावली. तर पुढे अडचणीचा विषय होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ह्याचे तुम्ही रुलिंग देउन हा प्रस्ताव जो परत पाठवाल तो पुढच्या मिटींगमध्ये व्यवस्थित कोष्टकवाईज येउ द्या. आत्ता आपण गटार सफाईचे जे टेंडर देतो. त्याची लांबी रुंदी किती आहे? त्या गटाराची लेन्थ किती आहे? त्याचे आपण किलोमीटर वाईज टेंडर देतो. मग आपल्याला हे बांधकाम द्यायचे आहे. त्याच्यामध्ये ह्या प्लॉटला हे रिझर्व्हेशन आहे. याच्यामध्ये एवढे बांधकाम आहे. एवढी क्युबीक फुट माती आहे. आत्ताच्या तारखेला इथे एवढे आहे आणि एवढे नाही. म्हणजे व्यवस्थित ॲक्च्युअल पोझीशन त्यांना त्याच्यात रिफ्लेक्ट करु द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अजून पुष्कळ आरक्षणे येणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार आझाद नगरमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त झोपडपट्ट्या आहेंत. तिकडे तुम्ही काय लॅन्ड फिलींग करणार?

**तुळशिदास म्हात्रे :-**

हा ठराव करायचा नाही.

**शानु गोहिल :-**

पुढच्या मिटींगला घ्या.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ३२ सविस्तर माहितीसह दुसऱ्या सभेमध्ये घ्यावा.

**प्रकरण क्र. ३२ :-**

विकास आराखड्यातील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागांना कुंपणभिंत घालणे, माती भराव करणे कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशान्वये तहकुब करण्यांत आला.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३३, मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**शानु गोहिल :-**

मा. सभापतींच्या परवानगीने. प्रकरण क्र. ३३, मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. स्थायी समिती सभने तसेच मा. महासभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली असून सदर कामाच्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील प्रमाणे निविदा सादर केलेल्या आहेत. वरीलपैकी ठेकेदाराने सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निविदा ह्या वाजवी आहेत कमी दराच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये जे प्रत्येक हायलाईट केलेले आहे ते अंदाजपत्रकीय दराने म्हणजे काय त्याचे आम्हाला काय कळत नाही. समजा याच्यामध्ये अंदाजित रक्कम १५ टक्के, १२ टक्के दिलेली आहे. १२,५४,०३४/- ही अमाउंट वर दिलेली आहे. याच्यामध्ये अंदाजपत्रकीय दर म्हणजे काय? ती फिगर कुठे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती शेवटच्या रकान्यात आहे.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. खतगांवकर साहेब, वर १५ टक्के, १३ टक्के आणि १० टक्के आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

१५ टक्के, १३ टक्केच्या वर काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

अंदाजित रक्कम. ती कामाची रक्कम आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तीच रक्कम. त्या कामाची अंदाजित रक्कम ती आहे. अंदाजपत्रकीय दराने म्हणजे रु. १२,५४,०३४/- ने काम करणे आणि १० टक्के जास्त म्हणजे त्याच्यावर होणारी १० टक्के ॲड करुन रक्कम असा त्याचा अर्थ होतो.

**तुळशिदास म्हात्रे :-**

तुम्ही त्याचे काय करणार? म्हणजे खडी टाकून करणार की काय?

**प्रशांत पालांडे :-**

अंदाजित रक्कम १२ लाख कशावरुन काढली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एस्टीमेटने काढलेली असते. डी.एस.आर. रेटने काढलेली असते. कामाचे क्षेत्रफळ, त्याचे दर, वेगवेगळे आयटम .........

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे त्या अमाउंटचा बजेटशी काय संबंध नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बजेटचा संबंध नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे आपण कधी बनवले? आणि याचा जो अंदाजपत्रकीय दर दिला, मा. आयुक्तांच्या शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे. बरोबर. याची तारीख काय? मला साधारण तारीख द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

२१/०९ ला मान्यता दिली.

**मिलन म्हात्रे :-**

२१/०९/२००७?

**शिवाजी बारकुंड :-**

म्हणजे तेव्हा आयुक्तांचे अधिकार होते.

**मा. सभापती :-**

ठराव क्र. ३३ वाचन करुन मंजुर करण्यात येतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ज्या ज्या प्रभागातील निविदा केलेली आहे. शहर अभियंत्यांना अशी सुचना करा. ज्या प्रभागामील काम आहे. किमान त्या नगरसेवकाला तुम्ही पत्राने कळवावे. आज तुमच्या प्रभागातील ही निविदा, हे गटार सॅक्शंन झालेले आहे. आणि हे काम या महिन्यामध्ये सुरु होणार आहे. याची आपण नोंद घ्यावी. कारण, साहेब, नगरसेवकांना हवेच असते की, काम व्हावे. ते काम झालेले आहे. निविदा झालेली आहे. पण हे त्यांनाच माहित नाही की, कधी सुरु होणार. मग गटनेत्याकडे जा, याच्याकडे जा, त्याच्याकडे जा. मग जे चारही वॉर्ड आहेत. त्यासंबंधितांना तुम्ही कळवा की, तुमचे हे क्षेत्र आहे. इकडून गटार बांधण्याचे काम सुरु करणार. उद्या पत्र गेले पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. बारकुंड साहेब, याच्यामध्ये पाच नंबरला जनता नगरचे लिहलेले आहे ते बघा. जनता नगर झोपडपट्टीमध्ये सी. सी. रस्ते करणे, याच्यावर माझा पत्रव्यवहार आहे. आणि दुसरी गोष्ट, जनता नगरमध्ये ७५ व ७६ असे दोन वॉर्ड येतात. तर हे काम कोणत्या वॉर्डमध्ये करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक किती आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आठ, जनता नगर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते एस्टीमेट तयार केले असेल ना? त्या जागेचा उल्लेख केला असेल ना? ज्याच्यामध्ये येईल त्याला पत्र करायचे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जनता नगर संपूर्ण वॉर्ड आहे. पण त्याच्यामध्ये डिव्हायडेशन झालेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

७५ व ७६ मध्ये डिव्हायडेशन झालेले आहे. मग दोघांना देउ.

**शरद पाटील :-**

विषय असा आहे. आत्ता बी.पी. रोड बोलतात तर बी.पी. रोडमध्ये ५-६ वॉर्ड येतात. तर सहा नगरसेवकांना तुम्ही देणार का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एखादे काम तीन-चार वॉर्डाला सब्जेक्ट होत असेल तर संबंधीत सर्व सदस्यांना कळवले जाईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सर्व सदस्यांना कळवा.

**मिलन म्हात्रे :-**

तसे पत्र द्या की, तुमच्या वॉर्डमध्ये दोन लाखाचे काम आहे. बरापैकी दोन. इथे माझ्याकडे जय अंबे झोपडपट्टी दिले आहे. भाईंदरला २५ जयअंबे आहेत. त्या कुठच्या आहेत? जय अंबे एक, दोन, टॉकीजच्या मागची? लोकशन काही नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता हे पूर्वीचा सर्व्हे झालेला आहे. नवीन इलेक्शन झाले. सगळे वॉर्ड बदललेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ठिकाण तर तिकडेच आहे ना. आम्ही तुम्हाल वॉर्ड नंबर सांगत नाही की, प्रभाग नंबर सांगत नाही. भाईंदर पश्चिम इकडे चार जय अंबे आहेत. त्यातल्या कुठल्या हे काहीच दिलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुमची सुचना लक्षात आलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जनता नगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ हा जसा उल्लेख केला. आपली जी मतदार यादी आहे. त्या मतदार यादीमध्ये बिल्डींगचे फेस पकडलेले आहेत. त्या फेसमध्ये जर जनता नगर दुसरा वॉर्ड येत असेल तर .......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जनता नगर वॉर्ड त्याच्यामध्ये येतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील साहेबांनी फार सुंदर सांगितलेले आहे. एखादे काम एकाच वॉर्डमध्ये समाविष्ट होत असेल तर त्या सदस्यांना बोलवायचे. एखादे काम दोन वॉर्डमध्ये असेल तर त्या सदस्यांना बोलवायचे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पूर्वी जनता नगर वॉर्ड माझ्याकडे होता आणि त्या दृष्टीने मी तो पत्रव्यवहार केलेला होता. आत्ता जनता नगर अर्धा माझ्याकडे आहे आणि अर्धा दुसरीकडे आहे. त्यामुळे ते काम दोन्ही वॉर्डामध्ये झाले पाहीजे.

**शरद पाटील :-**

माझी एक सुचना त्याच्यात घ्या. तुम्ही डांबरीकरण, पृष्ठीकरण केल्यानंतर तो रस्ता तीन महिन्यामध्ये चटई सारखा गुंडाळला जातो. तर त्याची नोंद घ्या. त्या ठेकेदाराला ॲग्रीमेन्टमध्ये तसे लिहून द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पूर्नपृष्ठीकरण करताना जे खड्डे पडलेले आहेत. त्याची खड्डा बुजविण्याची जी पध्दत आहे. त्याच्यावर फक्त खडी टाकतात.

**तुळशिदास म्हात्रे :-**

या शब्दाचा अर्थ तो होतो. तो खोदून करायचा असतो.

**मिलन म्हात्रे :-**

पुर्नपृष्ठीकरण म्हणजे चादरी टाकणे.

**शरद पाटील :-**

ह्या विषयाबद्दल मला आत्ता आणखीन एक विषय विचारायचा आहे. आज या शहरामध्ये एम.टी.एन.एल., रिलायन्स, आपले पाण्यासाठी जे खड्डे खोदून इंटरनल रस्ते खराब केले आहेत. ते आत्ता हे टेंडर पास झाल्यानंतरच आपण करणार? आपण त्यांच्याकडून पैसे घेतो. मग त्याच्यासाठी अशी काही खास तरतुद आहे की नाही?

**एस. ए. खान :-**

अशी तरतुद करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

स्टेशनच्या मेन रोडला केबल टाकलेल्याला आज सहा महिने झाले. पावसाच्या अगोदर केबल पडली होती. अजून त्याचे डांबरीकरण नाही.

**शरद पाटील :-**

त्यांना आपण परमिशन देतो. त्यांच्याकडून पैसे घेतो आणि ते करायचे असेल तर कधी कधी नगरसेवक निधीतून करावे लागते. ते नगरसेवक निधीतून का करावे? साहेब, त्याचा खुलासा करावा की, ते कधी करणार? काय करणार? आज आमच्या इथे सगळे रस्ते खराब झालें.

**तुळशिदास म्हात्रे :-**

मी गोल्डन नेस्टला सांगितले होते तिकडे कमीत कमी व्हिझीट करा.

**शिवाजी बारकुंड :-**

रिलायन्स एनर्जी, एम.टी.एन.एल., पाणी पुरवठा विभाग यांच्याकडून आपण पैसे घेतो. अद्यापपर्यंत आपण त्यांच्याकडून पैसे घ्यायचो. परवानगी घ्यायचो आणि नंतर पॅचवर्कचे टेंडर काढून त्याला वेळ जायचा.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाची परवानगी घ्यायची आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

एम.टी.एन.एल. वाले, रिलायन्सवाले रस्ता खोदायला महापालिकेची परवानगी घेतात.

**मिलन म्हात्रे :-**

खोदण्याकरीता नाही. आमच्या इकडे पॅचवर्कचे चालले आहे. मला असे वाटते की, तुम्ही पॅचवर्क करायला त्यांची परवानगी घेता.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण त्यांच्याकडून पैसे घेतो. त्याच्यानंतर प्रोसेस व्हायला वेळ लागतो. आपण आत्ता मा. स्थायी समितीपुढे एक असे प्रपोजल आणू. जे रिलायन्स एनर्जी, एम.टी.एन.एल. आणि पाणी पुरवठा यांना परवानगी देते वेळेसच, एक वार्षिक दर मंजुर करुन घेउ या. त्यांनी खोदले, केबल टाकली की, दुसऱ्या दिवसापासून त्याचे काम चालू करायचे.

**एस. ए. खान :-**

प्रत्येक प्रभाग समितीला कळवायचे.

**शानु गोहिल :-**

रिलायन्सवालो के अलावा अपने महानगरपालिका का जो कनेक्शन हम लोग देते है। वो खड्डा खोदते है। वह भी ठिक नही करते है। उसके बाद मे आप क्या करेंगे?

**शिवाजी बारकुंड :-**

उसके लिए हम लोग पैसे लेते है।

**शानु गोहिल :-**

पैसा लेते है। लेकीन उसका भरणी करते नही है। लेव्हल तो करते ही नही है।

**शिवाजी बारकुंड :-**

रिलायन्स एनर्जी, एम.टी.एन.एल. और कॉर्पोरेशन का वॉटर सप्लाय इन तिन्होने एन ॲन्युअल रेट सॅन्क्शन करेंगे। उन्होने रोड खोद दिया, उसका पैसा भरा। उनका काम चार दिन मे खत्म हुआ तो पाचवे दिन से अपना काम चालू होना चाहिए।

**मिलन म्हात्रे :-**

तुमची ही सुचना बरोबर आहे. पण समजा आपण एखादे रस्त्याचे काम घेणार आहोत. तुमचे काम झाले, डांबर पडला. डांबराची काळी उतरत नाही. इतक्यात तुमचीच माणसे तिकडे जाउन खणतात.

**एस. ए. खान :-**

हे चुकीचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामुळे आपला पैसा फुकट जातो. नगरीकांना त्रास होतो. तुमच्या डिपार्टमेन्टचे सब-ऑर्डीनेट को-ऑर्डीनेशन नाही. तुमचा एखादा रोड करायचा आहे. त्याच्यामध्ये तुमच्या डिपार्टमेन्टचे टेलिफोनचे काम आहे का? पाण्याचे काम आहे का? रिलायन्सवाल्यांचे काम आहे का? हे सगळे बघा. एकदा जे काही खणायचे ते करुन टाका. ते फायनल झाले की, मग रोड बनवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यामध्ये माझे एक मत राहील की, शक्यतो ही दुरुस्ती आणि रस्ते खोदकाम पावसाळ्यात करु नये. पावसाळा सोडून वर्षभर करावे. तुम्ही पावसाळ्यात केले तर तुमच्या हाती काहीच लागणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पावसाळ्यात करत नाहीत. ते आम्हाला जी.आर. चे उदाहरण देतात. ३१ मे नंतर डांबरीकरण करायचे नाही. असा जी.आर. दाखवतात. राज्य शासनाचा जी.आर. दाखवतात आणि तिकडे हायवेला डांबरीकरण चालले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता जसा विषय निघाला रिलायन्स किंवा पाणी विभाग. एकतर आपण वार्षिक टेंडर देतो. ते प्रभागवाईज आपण जसा सफाई ठेका देतो, म्हणजे प्रभाग समितीवाईज वार्षिक ठेका द्या. तुम्ही हे जे टेंभ्याचे ७५९ दिले आहे. ती आपण टेंभ्याची ताब्यात घेतलेली जागा आहे की, कुठली आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

टेंभ्याची जागा आपल्या ताब्यात आलेली आहे. त्या जागेचें कंपाउंड वॉलचे काम आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या जागेचे कंपाउंड तुम्ही बांधणार आहात. त्याच्यात तारेचे कुंपण आहे की भिंत आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

सिव्हील वर्क आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण किती?

**मिलन म्हात्रे :-**

मग ते आर.सी.सी. मध्ये का घेतले नाही? थोडे जास्त झाले असते तरी लॉंगटाईम एकदाच खर्च झाला असता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते कुठून बांधणार?

**शिवाजी बारकुंड :-**

ती जागा आपल्या ताब्यात मिळालेली आहे. त्या जागेला कंपाउंड वॉल बांधायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नंतर आपण जेव्हा हॉस्पीटल बांधणार आहोत. तेव्हा त्या भिंतीला पाडण्याची वेळ येणार नाही ना?

**शरद पाटील :-**

माझी एक सुचना ह्याच्यात लिहून घ्या. आपण जे पुर्नपृष्ठीकरण करणार आहोत. तर त्या एम.टी.एन.एल., रिलायन्सवाल्यांना त्याचे पत्र द्या की, तुमचे काही खोदकाम असेल ते करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हा जो टेंभा हॉस्पीटलचा विषय दिला. हा एकच सर्व्हे नंबर आहे. तीन नाही. तुम्ही हे तीन दिले आहेत. पण आपल्याकडे जी जागा आहे ती माझ्या माहितीनुसार ७५९ ची आहे. तो सर्व्हे नंबर कुठचा आहे ते जरा व्यवस्थित सांगा. तो एकच सर्व्हे नंबर आहे. आपण तीन सर्व्हे नंबर कोट केले म्हणजे बाकीच्या सर्व्हे नंबरपण आपण कंपाउंड वॉल बांधतो असे होते. जी जागा आपल्या ताब्यात आहे. तेवढाच एक सर्व्हे नंबर टाका. मा. आयुक्तांनी जी जागा ताब्यात घेतली. त्या जागेचाच सर्व्हे नंबर टाका बाकीचे दोन डिलीट करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जे टेंभा हॉस्पीटल बांधणार आहोत. याचे धोरण अजून ठरलेले नाही. तुम्ही ते प्रायव्हेटायझेशन मध्ये करणार? बी.ओ.टी. मध्ये करणार की, तुम्ही स्वतः डेव्हलप करणार आहात?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पूर्ण दवाखाना आपण बांधणे शक्य नाही ते चालवणेसुध्दा शक्य नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग मी म्हणतो हा पैसा आपल्याला खर्चायची गरज काय? आपण जर ते बी.ओ.टी. मध्ये देणार आहोत ......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कंपाउंड वॉलमुळे जागा सेफ होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग त्या कॉन्ट्रॅक्टरला सांगा की, तुम्ही बांधा. साहेब, आपले २१ लाख रु. वाचतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२१ लाख ही मोठी रक्कम नाही.

**मा. सभापती :-**

आपल्या नगरपालिकेचे हॉस्पीटल मी असताना करणार आहे हे मी सांगतो. मी बाहेर बी.ओ.टी. वर कोणाला देणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे एक धोरण ठरवा.

**मिलन म्हात्रे :-**

धोरण काय ठरवा? उच्च न्यायालयाची ऑर्डर वाचा. त्याच्यात मी पिटीशन दिलेले आहे. महापालिकेला उच्च न्यायालयाने क्लीअर कट आदेश दिलेले आहेत की, तुमच्या कायद्यात जी तरतुद आहे त्यानुसार हे लोकांकरीता महापालिकेचे हॉस्पीटल असेल. बी.ओ.टी. म्हणजे प्रायव्हेट तत्वावर द्यायचेनाही. आणि जी सुविधा चालू आहे, मागे सभागृहात पोस्टमार्टमचे झाले. ॲडजेस्टींग ॲक्टीव्हीटीज ज्या आहेत त्या बंद करायच्या नाहीत. असे त्या हायकोर्टाच्या ऑर्डरमध्ये आहे. आत्ता तुम्ही हा जो विषय आणला आहे. हा फार लेट झाला. १५ मे २००७ ला कट ऑफ डेट होती. हे काम १५ मे ला झाले पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

मी गेल्या महिन्यात आपल्या इंजिनिअरला बोलावले आणि सांगितले की, मला प्लॅन तयार करुन द्या.आपण कोणीतरी डोनर घेउ आणि टाटा-बिर्ला कंपन्यांची नावे देउ.

**मिलन म्हात्रे :-**

जे कोणी डोनर येतील त्यांनी वॉर्ड घ्यावे. मशिनरी आणून लावावी. आणि साहेब, या विषयावर माझी अशी विनंती आहे की, आपले पोस्टमार्टम रुम आणि शवागृहासाठी मी माझा नगरसेवक निधीपण दिलेला आहे. त्याची तरतुद आपल्या पुढच्या मिटींगमध्ये त्यांना तो विषय घ्यायला सांगा. आणि ते काम पहिले सुरु करा. जागा आपल्या ताब्यात मिळालेली आहे. आणि स्टार्ट करण्यापुरता निधी तुमच्याकडचा आहे. माझ्याकडचा पुढच्या वर्षी मी पण देउन टाकीन.

**शानु गोहील :-**

भाईंदर पूर्व नारायण स्मृती से बंदरवाडी शिवसेना शाखा का जो ऑफीस है। वहा तक का रोड का प्रस्ताव आपने लिया है। तो उसके आगे चौपाटी तक जाने के लिए क्यों नही लिया? क्योकी जेसलपार्क को बनकर कमसे कम अठरा-उन्नीस साल होने को आए है। और सतरा साल से वो रोड वापस बना नही है। और आप खुद वहॉ पर रहते है। आपको रोड की परिस्थिती मालुम है। गॅमन इंडिया का काम भी था। उस समय आपने रोड काफी खराब हो गये। उसके बाद अभी तक सिर्फ पॅचवर्कही हुआ है।

**शिवाजी बारकुंड :-**

यह सब प्रोसेस पहिले हो गया है। अग बजेट आते वक्त उसके उपर डिस्क्शन होगा।

**शानु गोहील :-**

इसिलिए आपके कान मे बात डाल रही हू। क्यो की आपभी वही रहते है। श्री. विजय पाटील साहब भी वही रहते है। आप सबको मालुम है। वहॉ की परिस्थिती क्या है वो आपको अच्छी तरह से मालूम है। तुम्ही ते काम आणा. मी पत्रसुध्दा टाकले आहे.

**प्रकरण क्र. ३३ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. २३ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It kravayaacyaa KalaIla kamaaMnaa maa.sqaayaI saimatI saBaonao tsaoca maa.mahasaBaonao p`SaasakIya va Aaiqa-k maanyata idlaolaI AsaUna sadr kamaacyaa jaahIr inaivada saucanaonaUsaar KalaIla p`maaNao inaivada saadr koolyaa Aahot.

| A.Ë. | kamaacao naaMvaÀzokodaracao naaMva | AMdaijat r@kma |
|---|---|---|
| 1 | Baa[-Mdr ³pU.´ naarayaNa smaRtI to baMdrvaaDI iSavasaonaa SaaKopya-MMt rs%yaacao puna-: pRYzIkrNa krNao.<br>1´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>**3´ mao.EaljaI kMnsT/@Sana**<br>4´ mao.AsfalT [MiDyaa kapao-roSana | $.12¸54¸034À¹<br><br>15.00‰ jaast dranao<br>13.00‰ jaast dranao<br>**AMdajap~kIya dranao**<br>10.00‰ jaast dranao |
| 2 | Baa[-Mdr ³pU.´ p`SaaMt ha^Tola to gaaoDdova naa@yaapya-Mt rs%yaacao puna-:pRYzIkrNa krNao.<br>1´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>**3´ mao.ekta kMnsT/@Sana**<br>4´ mao.lailat enTrp`ayajaosa | $.44¸11¸118À¹<br><br>8.00‰ jaast dranao<br>7.00‰ jaast dranao<br>**AMdajap~kIya dranao**<br>5.00‰ jaast dranao |
| 3 | Baa[-Mdr ³p.´ ToMBaa yaoqao isaTI savho-Ë.759¸ 760 to 771 yaa jaagaosa kuMpna iBaMt baaMQaNao.<br>1´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>3´ mao.ekta kMnsT/@Sana<br>**4´ mao.lailat enTrp`ayajaosa** | $.21¸26¸268À¹<br><br>4.00‰ jaast dranao<br>8.50‰ jaast dranao<br>5.00‰ jaast dranao<br>**AMdajap~kIya dranao** |
| 4 | Baa[-Mdr ³p.´ gaNaoSa dovala nagar¸ ËaMtI nagar AaiNa jaya AMbao JaaopDp+I AMtga-t sTIT laa[-T paola laavaNao.<br>1´ mao.haya laa[-T kMnsalTMT<br>2´ mao.$pona [lao@T/Iklsa<br>**3´ mao.jao.kumaar A^ND kMpnal ³[MiDyaa´** | $.17¸16¸476À¹<br><br>2.00‰ jaast dranao<br>4.00‰ jaast dranao |

| | | |
|---|---|---|
| | **p`a.ila.**<br>4´ mao.caaOhana [lao@T/Iklsa | **AMdajap~kIya dranao**<br>3.00‰ jaast dranao |
| 5 | ra.ma.Ë.8 varIla janatanagar JaaopDp+ImaQaIla saI.saI. rsto¸ gaTaro baaMQaNao va haf ca^nalsa du$stI krNao.<br>1´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>2´ mao.ekta kMnsT/@Sana<br>3´ mao.A^nayaDa enTrp`ayajaosa<br>**3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa** | $.18¸88¸600À¹<br><br>13.00‰ jaast dranao<br>11.00‰ jaast dranao<br>7.50‰ jaast dranao<br>**AMdajap~kIya dranao** |

varIla pOkI zokodaranaI saadr kolaolyaa savaa-t kmaI dracyaa inaivada hyaa vaajavaI Aahot. kmaI dracyaa inaivadaMnaa mauMba[-p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73 ³k´ nausaar maanyata doNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदनः- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३४ :- महानगरपालिकेच्या सन २००७-०८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील ''वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे'' या लेखाशिर्षक अंतर्गत तरतुदीचे पुर्नःविनियोजन करणे (मा. स्थायी समिती सभा दि. ०६/१२/२००७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३)

**एस. ए. खान :-**

महानगरपालिकेच्या सन २००७-०८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील ''वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे'' या लेखाशिर्षक अंतर्गत तरतुदीचे पुर्नःविनियोजन करायचे आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या जनसंपर्क विभागामार्फत जो तक्ता दिला आहे. त्याच्यामध्ये १३ नंबर, हे समाज विकास कोणाच्या अंडरमध्ये आहे? समाज विकास हे कोणते डिपार्टमेन्ट आहे?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

महिला बालकल्याण विभाग.

**मिलन म्हात्रे :-**

मग समाज विकास कसे लिहता? समाज विकास नाही लिहले पाहिजे. आपल्या इथे समाज विकास हे नाहीच. लेखाशिर्षामध्ये पण त्याची तशी नोंद नाही.

**नरेंद्र चव्हाण :-**

श्री. असोदेकर आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा की, त्या डिपार्टमेन्टचे नाव काय? जसे सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, पाणी पुरवठा, बरोबर आहे. आम्हाला कळते की, हे डिपार्टमेन्ट काय आहेत. समाज विकास म्हणजे काय प्रकार आहे? हे त्याच्यात आले

पाहिजे. त्या कोष्टकामध्ये त्यांना व्यवस्थित दुरुस्ती करायला सांगा. म्हणजे आपल्या त्या डिपार्टमेन्टमध्ये त्या कोष्टकावर काही लक्ष नाही. वाटेल तसे पाठवून दिले.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ३४ मंजुर करण्यांत येतो. ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

महानगरपालिकेच्या सन २००७-०८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील ''वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे'' या लेखाशिर्षक अंतर्गत तरतुदीचे पुर्नःविनियोजन करणे (मा. स्थायी समिती सभा दि. ०६/१२/२००७ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३)

**ठराव क्र. २४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामांच्या जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येतात. तसेच वेळोवेळी नागरीकांना जाहिर अहवानाच्या सुचना प्रसिध्द करण्यात येतात. सदरहू कामे सन २००७-०८ मधील मंजुर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील ''(फ) संकीर्ण (१७) जाहिर निवेदन व सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे'' या लेखाशिर्षका अंतर्गत रु. १२.०० लक्ष एवढी तरतुद आहे. परंतु, आतापर्यंत या लेखाशिर्षका अंतर्गत रु. ११,९९,९६९/- एवढा खर्च झालेला आहे. या वर्षातील उर्वरीत कालावधीत अजून रु. १५.०० लक्ष एवढा खर्च होण्याचा अंदाज आहे.

तरी सदरहू लेखाशिर्षका अंतर्गत वाढीव खर्चाची तरतुद करणेकरीता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ३० अन्वये नमुना क्र. १० मध्ये पुर्नविनियोजनाचा तक्ता सादर केलेला आहे. त्या अनुषंगे, कर वसुली खर्च / सर्वेक्षण तसेच एक टक्का रिबेट खर्च या लेखाशिर्षका अंतर्गातील तरतुद रक्कम रु. १५.०० लक्ष ही ''फ संकीर्ण (१७) जाहिर निवेदन व सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे या लेखाशिर्षकात पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे लेखाशिर्षका अंतर्गत पुर्नविनियोजन करणे करीता ''मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची 'ड' मधील प्रकरण ७ नुसार'' मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.** **अनुमोदनः- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत शास्त्रोक्त पद्धतीने फवारणी कामी दिलेल्या कंत्राटदारास मुदतवाढ देणेबाबत. (आरोग्य साफसफाई विभाग)

**एस. ए. खान :-**

हे तीन महिन्यांसाठी आहे ना?

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता एक तर तो तीन महिन्यांचा कालावधी नक्की करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आपण आत्ता जी टिपणी दिलेली आहे. हिंदी पेपर नवभारत आहे. उस पेपर मे एक भी ॲडर्व्हटाईज नही। लेकीन ज्यादा हिंदी भाषिक नवभारत टाईम्स पढते है। आम्ही नवभारत, नवभारत टाईम्स असे हिंदी पेपर वाचतो. त्याच्यामध्ये एक ॲड नाही. कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर सर्वांची त्याच्यात ॲड येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नवभारत टाईम्सच्या संपादकाने आपल्या रेग्युलेशनमध्ये मागणी केली नव्हती. आत्ता ती मागणी केलेली आहे आणि त्या लिस्टमध्ये ते ॲड केलेले आहे. याच्या पुढच्या जाहिराती नवभारत टाईम्सलासुध्दा येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नवभारत व नवभारत टाईम्स दोन्ही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या स्थायी समितीने याला सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. ती कुठच्या ग्राउंडवर दिली हे माहिती नाही. आज परिस्थिती अशी आहे, प्रत्येंकाच्या घरामध्ये, इथे सगळे बसलेले आहेत. मच्छर पक्ष बघून चावत नाहीत. शहरामध्ये भरपूर मच्छर आहेत. मी तर बोलतो हा विषय आपण आणलाच नाही पाहिजे. हे आरोग्याचे उपायुक्त कोण आहेत? श्री. पानपट्टे साहेब तुम्ही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. पानपट्टे साहेब, तुम्हाला डासांचे काही पडलेले नाही. तुम्हाला मी त्यावेळेला पण बोलली होती.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या इकडे कुठेही आपण सार्वजनिक ठिकाणी उभे राहिलो. तर मच्छर चावतात. मच्छराने जेवढे आजार आहेत, मलेरिया पासून सगळे, याचा कोणीही रिव्ह्यू देत नाही. टेंडर कोणी घ्यावे? कितीला द्यावे? त्याच्यामध्ये कोणी काय करावे त्याच्याशी मला काही देणे-घेणे नाही. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असताना डायरेक्ट बायर इंडिया तर्फे मच्छर मारण्याची एक मोहिम आखली होती. त्यावेळेला नागरीक येउन आम्हाला सांगायचे की, साहेब आत्ता मच्छर चावत नाहीत. या शहराचे नागरीक, आपले मतदार आपल्याकडून काही मागत नाहीत. इलेक्शनला जे काही मागत असतील ते सोडून द्या. त्याच्यानंतर कोणीही काही मागत नाहीत. तुमच्याकडून स्वच्छ पाणी मागतात. तुमच्याकडून दररोजची साफसफाई असेल ती मागतात. मच्छर निर्मुलन आणि दिवाबत्ती. या चार गोष्टी जा सोडल्या तर इकडचा जो करदाता नागरिक आहे तो तुमच्याकडून जास्त काही मागत नाही. आज परिस्थिती अशी आहे की, त्या गाड्या आल्या आहेत. पण त्या गाड्यांमधले औषधाचे प्रमाण कोणी बघितले का? नाही. ५०० लीटरच्या टाकीमध्ये सफेद दिसण्याकरिता काहीतरी अर्धा-पाव लीटर औषध टाकले जाते. त्याचा कुठेही काही इफेक्ट होत नाही. माझ्याकडे साफसफाई झाली, परवा गाडी येउन गेली. मी स्वतः उभा राहीलो. त्या गाडीचा मुकादम रजिस्टर घेउन उभा आहे. जिकडे पाणी साचते. घाण जिकडे डास तयार होतात, त्याला मी स्वतः नेउन गल्ली-कुचे दाखवले. आणि म्हंटले इथे फवारणी कर. साहेब, आज संध्याकाळी सात वाजता तुम्ही माझ्या इकडे यायचे. माझ्या राहत्या घरी आत्ता गेलात तरी आजही मच्छर चावतील. तीन दिवसांपूर्वी फवारणी झाली. मच्छर वाढले, कमी झाले नाहीत. हे कुठेतरी कंट्रोल करण्याकरीता ..... मागच्या सहा महिन्यांपूर्वी मा. स्थायी समितीने जी मंजुरी दिली. ती कुठल्या ग्राउंडवर दिली. हा ठराव पास करत असताना पात्रता काय बघितली. ते आम्हाला पाहिजे. त्या दिवशी आम्ही मा. आमदारांबरोबर त्यांच्या बंगल्यावर बसलो, तुम्हीही होते. सर्व मच्छर भरलेला. मी म्हणतो ठराव पास करायची घाई करु नका. तुमचे मिरारोड सुध्दा सेफ नाही. आमच्या भाईंदरपेक्षा जास्तीत जास्त मच्छर तिकडे आहे. तुम्ही कधी नाझरेथ आगर झोपडपट्टीला वगैरे गेलात का? तिकडे अडीचशे लोकांची वसाहत गेल्या शंभर वर्षापासून आहे. त्या एरियामध्ये तुम्ही जर गेले तर शरीरातील जेवढी उघडी भोकं आहेत. सगळीकडे मच्छर जाते, डोळे, नाक, कान सगळे. कारमध्ये जर बसले चुकून दरवाजा किंवा काच उघडी असेल तर गाडीमध्ये गचागच मच्छर भरते. ती माणसे नाहीत का? तिकडे लहान मुले नाहीत का? तिथे कधी तुमची गाडी गेली का? अख्ख्या भाईंदरचा जो नाला वेस्टमधून जातो. तिकडे आज वाटल्यास भेट द्या, एक दिवस ग्रीन कोर्ट क्लबला जाउ नका. माझ्या बरोबर चला मी तुम्हांला दाखवतो. आज त्या ठिकाणी आपल्या इकडचे लोक जॉगींग वॉकिंगला जातात. मच्छर एवढे आहेत की चालता चालता तुमच्या नाका तोंडामध्ये जाते. आज आपण डास निर्मुलनाचा विषय घेतला आहे. हे निर्मुलन कुठेही होत नाही. तुम्ही हे तीन महिन्याचे देता. मी तर म्हणतो की, आज संध्याकाळी तुम्ही त्या ठेकेदाराला बोलवा. त्या ठेक्याची काय अमांउंट आहे ती लिहून घ्या. त्यानुसार स्टॅम्प पेपरवर त्याचा व्यवस्थित अंडरटेकिंग बॉंड लिहून घ्या. आमच्या नगरसेवकांना येउन तो स्पष्ट सांगतो की, साहब कल हो जाएगा, अभी होगा, अभी आदमी भेज देता हूँ। औषध मारतात. औषधाचा काही परिणाम नाही. साहेब मी सात वर्षापासून नगरसेवक आहे. श्री. शिवमूर्ती नाईक साहेब असतांना. श्री. दफ्दरदार म्हणून बायर इंडियाचे एक अधिकारी यायचे. प्रत्येक औषधाचे डेमो त्यांनी आम्हांला करुन दाखवले आहेत. आपल्या सफाई कामगारांना फायर बिग्रेडच्या हॉलमध्ये ५०-५० च्या बॅचने आणि टिमने त्यांनी डेमो दिला आहे की पंप कसा पकडायचा? फवारणी कशी करायची? तुमची गन किती मोठी पाहिजे? ह्या डेमोला मी हजर असायचो. आणि ते शिकवायचे सुद्धा आणि औषधांचे प्रमाण काय टाकायचे?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब तुम्ही सर्व ठिकाणी असता, बरोबर आहे. माझ्या बरोबर कोण येते? मी तुम्हांला बोरिवलीला नेतो, कांदिवलीला नेतो, मालाडला नेतो, गोरेगावला नेतो. कुठे मच्छर नसेल? तुम्हांला जशी इथे भाईंदरला चावतात तसेच मच्छर चावले नाहीत तर तुम्ही बोलाल तेवढे पैसे मी हरायला तयार आहे. या थंडीमध्ये मच्छरांचे प्रमाण जास्त असते. मी काल मुंबईला सुद्धा गेलो. हॉस्पिटलला बाहेर मच्छर चावत असते.

**शानु गोहिल :-**

मा. सभापती साहब, आप बोल रहे है वो ठिक है। बांद्रा तक मच्छर है।

**मिलन म्हात्रे :-**

मुंबईला पण डेंग्यूच्या केसेस आहेत. म्हणून तुम्ही सुधारायचे नाही का?

**मा. सभापती :-**

दस साल से मैं इस विषय पर झगडा कर रहा हूँ।

**मिलन म्हात्रे :-**

पण तुम्ही सुधरावा ना.

**शानु गोहिल :-**

उनके बोलने का मतलब है की जब श्री. शिवमूर्ती नाईक साहब थे और उससे पहले भी जब औषध फवारणी और धुआ फवारणी होती थी। तब इतने मच्छर कंट्रोल हो गए थे।

**मा. सभापती :-**

त्यावेळी मी सभापती होतो. त्याच्यावर किती चर्चा झाली.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. शिवमूर्ती नाईक साहेब असताना आजच्या २००२ ला मिरा भाईंदरचे जे क्षेत्रफळ होते. त्याच्यामध्ये ओपन लँण्ड जास्त होत्या. आत्ता उलट ओपन लँण्ड कमी झाल्या. बिल्डिंग वाढल्या. त्यावेळेची जी स्टँगनेंट वॉटरची जी संख्या होती ती कमी होती आत्ता कमी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांनी म्हटल्याप्रमाणे ग्रामीण भागामध्ये मच्छर नव्हते. आम्ही ग्रामीण भागातील लोक आहोत. इथे एक मच्छर राहायचा नाही. लोक शेतावर झोपायचे. तिथेसुद्धा मच्छर आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब आम्ही मान्य करतो मच्छर आहेत. पण ते मच्छर होउ नये म्हणून आपण औषध फवारणी करणार आणि जिकडे मच्छर निर्मितीस कारण होते. त्याच्यावर कार्यवाही करायला सांगितले तर आपण करायला तयार नाही. त्यावेळेला मी शेणाचा विषय काढला. माझ्या वॉर्डामध्ये का कारवाई केली नाही? त्यांना जरा विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅगनेंट वॉटर जिथे जमा होते ते डिटेक्ट होते. तिकडे औषधच मारत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मच्छरचे जे ब्रीडींग प्लेस असतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्याच्यावर कार्यवाही करा म्हणून सांगितलेले. मा. आयुक्त साहेबांनी ह्यांना बोलावून सांगितले की, त्याच्यामुळे आरोग्यास धोका आहे. मच्छरांचे प्रमाण वाढते आहे. तुम्ही कार्यवाही करा. पण यांनी का केली नाही त्याचे उत्तर द्यावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

औषध फवारणी सोबतच शहरात जितके सेफ्टी टँक आहेत, प्रायव्हेट सहा...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब सेफ्टी टँक नाही. सेफ्टी टँकमध्ये लारव्हा जमत नाही. आम्ही आमच्या वॉर्डमध्ये जेवढी मोकळी जागा होती. पोद्दार हायस्कूलच्या पाठिमागे, हे मा. सभापती बसले आहेत, फार मोठे पाण्याचे तळे होते. आम्ही हळू हळू आपला गारबेज टाकून ते मिटवून टाकले. आज संपवले. आज तिकडे तुमचे मनुष्यबळ कमी लागते, औषध कमी लागते. आणि माणसांचा कायमचा त्रास गेला. तुमची जी काही छोटी छोटी डबकी आहेत ती तुम्ही बुजवू शकत नाही का? शहरात गाव दुनियाचे रॅबिट पडलेले असते. आपल्या महापालिकेच्या आस्थापनेवरचे ट्रक ती रॅबीट टाकून बुजवत नाहीत. त्यामुळे ती फॅक्टरी आहे. आज जर टेंभा हॉस्पिटलच्या पाठीमागे गेलात. जिकडे तिकडे गवत आहे. भरपूर मच्छर आहे. पूर्वी आपण गवत कापायचे. ते मोकळे करायचे. त्याच्यामध्ये आपण ग्रॅन्यूअल टाकायचे. ते प्रकार हल्ली दिसतच नाहीत. मुंबईला मच्छर आहेत आहे म्हणून आमच्या शहरात. तिकडे शंभर आहेत म्हणून आमच्याकडे दोनशे चालेल, याला काही अर्थ नाही. मुंबईलासुद्धा डेंग्यू आहेत. म्हणून आपल्या शहरामध्ये डेंग्यू असले पाहिजे का ?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. पानपट्टे साहेब, तुम्ही पहिल्यांदा माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. त्याच्यावर कार्यवाही का केली नाही? आणि का करत नाही?

**सभांजी पानपट्टे :-**

खाजगी शेती आहे. तिकडे गोवऱ्या करतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

गोवऱ्या वगैरे नाही. तुम्ही जाउन बघितले का की गोवऱ्या करतात की, काय करतात? तुम्ही काहीतरी उत्तर देउ नका. चांगले पसरुन ते शेण सुकवुन विक्री करतात. शेतकऱ्यांनी खत म्हणुन शेण टाकलेले नाही. तुम्ही त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करा. नाहीतर त्या शेणाच्या गाड्या मी पालिकेमध्ये आणुन टाकेन आणि त्याच्यामध्ये तुम्हाला बसवेन. या स्टँडिंगमध्ये आम्ही सभासद बोलतो तर त्यांच्यावर तुम्ही कार्यवाही करायची नाही का?

**सभांजी पानपट्टे :-**

त्याला काही प्रोसेस असतात की नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रोसेस करा. पण किती दिवस आठ दिवस, पंधरा दिवस आज मच्छरांच्या वेळेस सर्व नगरसेवक बोलतात.

**सभांजी पानपट्टे :-**

त्या लोकांना सूनावणी करीता बोलावले आहे. सुनावणी झाल्यांनतर जो काही निर्णय घेईल...

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नागरिकांना मला उत्तर द्यावे लागते.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. पानपट्टे साहेब, त्यांनी ते व्यवसाय करण्याकरीता थांबवले आहे का? शेणखत परवानगी आहे का? नसेल तर तुम्ही ते जप्त करा. शेतकऱ्यांना कशाला बोलवायचे? उद्या मी इकडे रस्त्यावर मांस विकेन मग ते विदाउट परमिशन विक्री करतांना आढळले तर तुम्ही ते जप्त करायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते विक्रीसाठी करतात. आणि ते माझ्या वॉर्डमधील नाही ते बाहेरचे आहेत. बाहेरच्या तबेल्यातले शेण आणुन तिकडे पसरुन सुकवतात. आणि ४ - ५ ठिकाणी हा व्यवसाय चालु आहे संध्याकाळच्या वेळेला एक दिवस माझ्या वॉर्डमध्ये येउन बघा. आणि एक अख्खी रात्र माझ्या वॉर्डमध्ये राहा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, मॅडमनी जे सांगितले आहे त्याच्यावर तुम्ही ॲक्शन घ्या. तुम्ही डिले का करता?

**सभांजी पानपट्टे :-**

ठेकेदाराला फवारणी करायला सांगितलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तो किती धुर फवारण करेल?

**सभांजी पानपट्टे :-**

ते आदिवासी क्षेत्र आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही आदिवासींच्या नावाखाली फार करता. त्या दिवशी स्टॅन्ड पोस्टचा विषय काढला तर आदिवासी आदिवासींना तर अजुन पर्यंत पाईपलाईंन गेलेलीच नाही. आदिवासी अजुनपर्यंत पाण्यापासुन वंचितच आहे. तिकडे तुम्ही पाइपलाईन का टाकली नाही? तो विषय श्री. बारकुंड यांना विचारा. अजुन पर्यंत त्यांची पाईपलाईन टाकण्यासाठी हालचाल झालेली नाही. आदिवासींचे नाव आले की, विषय संपला आदिवासींच्या नावाखाली नगरसेवक नाव आले की, विषय संपला आदिवासींच्या नावाखाली नगरसेवक गप्प बसतात. गेल्या दहा वर्षापासुन मी आदिवासींचे प्रतिनिधीत्व करते. मला माहिती आहे की, कोण आदिवासी आहे. आणि कोण आदिवासी नाही

**सभांजी पानपट्टे :-**

याच्यावर लवकरच कार्यवाही करण्यांत येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डेट सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

वन विभागाला आणुन द्या. नाहीतरी आपण विकत घेतो. सुभाषचंद्र बोस मैदानात आणुन टाका. ते शेण जप्त करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझ्या वॉर्डमध्ये कितीही डास फवारणी केली तरी काही फरक पडत नाही असे माझे म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

श्री. पानपट्टे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे दोन दिवसांत कार्यवही करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे सगळे लाइटली घेउ नका. श्री. पानपट्टे साहेब आणि श्री. खतगांवकर साहेब, भिंवडीला हत्तीरोगाचे काही रुग्ण आढळलेले आहेत. जो डास प्राण्यांना डुकराला वगैरे चावतो. तो डास माणसाला चावल्यावर त्याचे हत्तीरोगामध्ये रुपांतर होते. टी.व्ही वर काय ॲड आलेली ते तुम्ही बघितले का? तो रोग भिवंडीला सुरु झाला आहे. त्यांचे प्रिकॉशन तुम्ही घ्याल का?

**श्री. संभाजी पानपट्टे :-**

फेब्रुवारीच्या मा. महासभेत हा विषय घेणार आहे. प्रत्येक वॉर्डवाईज फॉगिंग मशिन देणार.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडे वस्त्याच्या वस्त्यांमध्ये याची लागण झाली आहे. वाटल्यास तुम्ही भिवंडीच्या आरोग्य अधिकाऱ्यांशी को-आर्डीनेशन करा. तिकडे काय आहे ते विचारा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही वॉर्डवाईज गाडया देणार आहेत. पण औषधच चांगले नसेल तर गाडया देउन करणार काय?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब प्रत्येक ठिकाणी औषध फवारणी होते पण त्या औषधामध्ये दम नाही, एवढाच विषय आहे.

**शानू गोहिल :-**

श्री. पानपट्टे साहेब औषध फवारणी आणि धुआ फवारणी आठवडयात किती वेळा होते?

**मा. सभापती :-**

आपले चार प्रभाग होणार आहेत. चार प्रभागामध्ये चारही ठिकाणी मच्छरवर औषध मारणार. चारही गाड्या जातील. आत्ता दोन गाड्या असल्याने व सर्व ठिकाणी पोहचत नसल्या कारणाने मच्छर जास्त झालेल्या आहेत तरी येणाऱ्या मार्चमध्ये चारही प्रभागांना गाडया देण्यांत येतील.

**नयना म्हात्रे :-**

पण त्या चार प्रभाग समित्या बनायच्या कधी?

**मिलन म्हात्रे :-**

मार्चला दोन महिने बाकी आहेत. आपण उद्याचे बोला. औषधाचे प्रमाण काय आहे?

**मा. सभापती :-**

औषधाचे प्रमाण सांगितलेले आहे. माझी त्यांच्याशी चर्चा झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्या ठेकेदाराला सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. आत्ता आपण सेकंन्ड देतो. आमची सभागृहाला अशी सुचना आहे...

**एस. ए. खान :-**

बायर कंपनीचेच औषध वापरले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही या ठरावाचे वाचन केले. या ठेकेदाराकडून तुम्ही अंडरटेकिंग घ्या. त्याचे मूळ ॲग्रीमेंट संपले. त्याला सहा महिन्याचे दिले. आत्ता नवीन अंडरटेकिंग घ्या. तुम्ही त्याच्यावर कार्यवाही काय करणार? तुमचा त्यावेळेला जो स्टॅम्प पेपर वापरला तो वर्षाकरिता होता. त्यानंतर तुम्ही सहा महिन्यांकरिता दिले.

**मा. सभापती :-**

अंडरटेकिंग घेउन त्याचे तीन महिने वाढीव करावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब त्यांना कार्यवाही करायला सांगा.

**एस. ए. खान :-**

महापालिका क्षेत्रात एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत किटकनाशक व धूरफवारणी होणे गरजेचे आहे. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सध्या कार्यरत असलेले निविदाकार मे. लक्षता ट्रेडींग कार्पोरेशन यांना मुदत संपल्यापासून त्याच मंजुर दरात आगामी तीन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात येत आहे. फवारणी कामी वापरण्यात येणारे स्प्रे पंपचे मेंटनन्स व देखभाल दुरूस्ती निविदाकाराने करण्यात यावे, व कामाचा नविन करारनामा करण्यात यावा.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब प्रत्येक प्रस्तावामध्ये तुमची अमाउंट काहीच नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तीन महिने पूर्ण झाल्यानंतर परत असे बोलू नये की, परत तीन महिन्याची मुदत वाढवून द्या.

**मा. सभापती :-**

देणार नाही. नवीन निविदा मागवू.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब याला काल मर्यादा पाहिजे. अमाउंट वगैरे काहीच नाही. उपायुक्त असे प्रस्ताव आणतात कसे?

**शानु गोहिल :-**

याच्यामध्ये रक्कम मेंशन केली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तीन महिन्यांकरिता डास निर्मुलनाला किती खर्च होईल? बजेटमध्ये काय तरतुद आहे? बजेटमध्ये किती तरतुद आहे ते मागच्या वेळेला बरोबर दिलेले आहे. तुमचे मागचे प्रस्ताव आहेत. त्याच्यात बजेटची तरतुद बरोबर आहे. या प्रस्तावात बजेटची तरतुद नाही असे कसे? तुमच्या बजेटमध्ये आत्ताची तरतुद काय? श्री. कांबळे साहेब तुम्ही हा प्रस्ताव मंजूरीला आणला आहे. बजेटची पोझीशन काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही जी मुदतवाढ देतो. त्या हेडला बजेटची तरतुद आहे ना?

**राजकूमार कांबळे :-**

आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती?

**राजकूमार कांबळे :-**

वीस लाख.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यापैकी इथे किती लागणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्व विभाग प्रमुखांनी नोंद घ्यावी. कोणताही प्रस्ताव देत असताना लेखाशिर्षक, असलेली तरतुद, अपेक्षित खर्च हे सर्व टाकूनच विषय लिहावा.

**मा. सभापती :-**

ठराव क्र. ३५ वाचून कायम करण्यांत यावा.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. एस. स. खान साहेब याच्यात परिस्थिती निराळी आहे. सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब, साठ लाखाचा खर्च आहे, वीस लाखाची तरतुद आहे आणि चाळीस लाखाचे रिॲप्रोप्रिएशन करुन घ्यावे लागणार आहे, आत्ता ठराव पास करता. त्या ठरावामध्ये त्याचे रिफ्लेक्शन कुठे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रिॲप्रोप्रिएशनचे ते आणतील.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात ते का नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यात फक्त मुदतवाढ आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मुदतवाढ म्हणजे त्याला खर्च आहे. मुदतवाढ म्हणजे आज संध्याकाळपासून त्याचे काम सुरु होणार.

**राजकूमार कांबळे :-**

वीस लाख शिल्लक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साठ लाख रुपये खर्च आहे. वीस लाख आहेत. कामाचा अंदाजित खर्च साठ लाख आहे. आत्ता तुमच्याकडे तुमच्या ह्या लेखाशिर्षालाच वीस आहेत. म्हणजे तुम्हांला चाळीसचे रिॲप्रोप्रिएशन करुन घ्यायला लागेल. ते या ठरावात गोषवाऱ्यामध्ये पाहिजे की नाही? असे काही गोषवारे आणतात आणि तुम्ही पटापट ठराव वाचत सुटता. श्री. खतगांवकर साहेब, त्यांना थोडे विश्लेषण करु द्या. तुम्ही कशात तरतुद करणार, काय करणार हे जरा माईकवर बोला. आत्ता ती वीस लाखाची रक्कम पण आम्हांला माहिती नाही.

**राजकूमार कांबळे :-**

वीस लाखाची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात कुठे आहे? तुमच्या गोषवाऱ्यामध्ये काहीच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रकरण क्र. ३५ च्या विषयाला आत्ता मुदतवाढ दिलेली आहे. त्याच्या आर्थिक तरतुदी बाबतचा जो पुर्नविनियोजनाचा विषय आहे. तो विभागाने येणाऱ्या सभेत आणावा.

**प्रकरण क्र. ३५ :-**

एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत शास्त्रोक्त पद्धतीने फवारणी कामी दिलेल्या कंत्राटदारास मुदतवाढ देणेबाबत. (आरोग्य साफसफाई विभाग.)

**ठराव क्र. २५ :-**

महापालिका क्षेत्रात एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत किटकनाशक व धूरफवारणी होणे गरजेचे आहे. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सध्या कार्यरत असलेले निविदाकार मे. लक्षता ट्रेडींग कार्पोरेशन यांना मुदत संपल्यापासून त्याच मंजुर दरात आगामी तीन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात येत आहे. फवारणी कामी वापरण्यात येणारे स्प्रे पंपचे मेंटनन्स व देखभाल दुरूस्ती निविदाकाराने करण्यात यावे, व कामाचा नविन करारनामा करण्यात यावा.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, ३७, ३८ अवलोकन आहेत.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्तांचे अवलोकन मंजूर करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब त्याच्यामध्ये उंदरांची औषधे आहेत. आपण ही जी औषधे इकडे घेतलेली आहेत, फिनाईल वगैरे याचे वाटप..

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रकरण क्र. ३६, ३७, ३८ हे मा. आयुक्त साहेबांनी केलेले कार्यवाहीचे अवलोकन आहे. पावसाळ्यामध्ये वस्तीमध्ये जे पाणी साचत होते. त्याठिकाणी आपण मोटारीचे सांगितले होते. दुसरे उंदीर नाशक, किटकनाशकाची मागणी केली होती.

**शरद पाटील :-**

त्या उंदिरनाशकावर बोलायचे आहे. आपण हे उंदीरनाशक आणतो. कुठचे उंदीर मारतो ते तरी आम्हांला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

उंदीर मारतात म्हणजे औषध टाकावे लागते.

**शरद पाटील :-**

औषध कुठे टाकतात ते सांगा. तुमच्या माहितीसाठी सांगतो. मी औषध मागितले होते. तर मला त्यांनी इंन्स्ट्रक्शनचा चार्ट आणून दाखवला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते विषारी असते. हातात देणे योग्य नाही. कुठे टाकायचे ते सांगा.

**शरद पाटील :-**

हातात द्यायचे नाही, टाकायचे नाही मग ते कशाला आणायचे?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

कोणी मागणी करत असेल तर तुम्ही देउन टाका.

**राजकूमार कांबळे :-**

आपण तक्रारीप्रमाणे देतो.

**शरद पाटील :-**

जर तक्रारीप्रमाणेच करायचे असेल तर मग ते आणूच नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते औषध फार टॉक्झीकन्ट आहे. कोणाच्या हातात दिले आणि...

**शरद पाटील :-**

साहेब, या जबाबदाऱ्या सगळ्या नागरिकांनी घ्यायच्या का? जर उंदीर आहे आणि आपण नाशक आणतो तर उंदीरनाशक टाकायला पाहिजे की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. कांबळे सन्मा. सदस्यांची तक्रार अशी आहे. जे कोण तक्रार करतात, मागणी करतात तिथे तुम्ही डायरेक्ट औषध देउ शकत नसाल तर कार्यवाही करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ३७ मध्ये जी औषधे दिलेली आहेत. कुठल्या कामासाठी वापरतात हे जरा सांगा. कारण आम्हांलापण माहिती नाही. तुम्ही जे नाव दिलेले आहे, मेरॉथॅालिऑन ५टक्के हे काय आहे?

**राजकूमार कांबळे :-**

ज्याठिकाणी कार्यक्रम वगैरे असतात तिथे आपण जी पावडर मारतो. ती पावडर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फिनाईल वगैरे भरपूर पडलेले आहे. शाळेचे बाथरुम धुत नाही कारण तो सफाई कामगार इकडे फिनाईल घ्यायला येतच नाही.

**शरद पाटील :-**

श्री. कांबळे साहेब उंदीर मारा. आत्ता उंदीर माणसाला घाबरत नाही. तर माणूस उंदराला घाबरायला लागला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब हे जे फिनाईल वगैरे आहेत ते तुम्ही समोरुन द्या कुठल्याही शाळेमध्ये नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. राजकूमार कांबळे तुम्ही हे जे उंदराचे औषध घेता तर सब्जेक्टेड एरियामध्ये त्याची कार्यवाही व्हावी आणि सन्मा. सदस्यांना त्याची माहिती व्हावी. सर्व शाळेचे बाथरूम आहेत, शाळा आहेत, त्याठिकाणी फिनाईलचा वापर व्हायला पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

श्री. कांबळे साहेब, उंदराचे औषध किती दिवसांनी मारायला पाहिजे?

**शरद पाटील :-**

श्री. कांबळे साहेब आपण उंदराचे औषध मारतो का ते मला सांगा. आपल्या एरियात येतात आणि मला पॅम्प्लेट वाचायला दिले आणि साहेब ही जबाबदारी तुमची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब प्रकरण क्र. ३७ चा जो उंदीर मारण्याचा विषय आहे. त्याच्यामध्ये आपल्याकडे आत्ता नगरभवनच्या गोडाउनला झिंक फॉस्फाईड नावाचे लाल डब्याचे औषध आहे ते एवढे चांगले आहे की, औषध टाकल्यावर पाच मिनिटात उंदीर मरायला लागतात. आम्ही आमच्या इकडे सगळे केले आहे. आम्ही स्वतः करतो. त्याच्यात पिठ, तेल आपण आणायला लागते. आपण पाच ते दहा किलो पिठ आणले. त्याच्यात दिड ते दोन डब्बा औषध टाकले....

**नयना म्हात्रे :-**

ते औषध जर आमच्या गावात टाकले तर कोंबड्या मरतील आणि पब्लीक शिव्या देईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.):-**

म्हणुन हातात देत नाही. जनावरे मरतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तसे नाही. एखाद्या ठिकाणी टाकायचे त्याला पध्दत आहे. विषयाला कुठेतरी बगल देउ नका. पुर्वी ग्रामपंचायत गटारामध्ये औषध मारायची त्यावेळेला ते औषध पिउन कोबंड्या मरायच्या. आमच्या घरीसुध्दा कोंबड्या होत्या पण ज्यावेळेला ग्रामपंचायत औषध मारायची तेव्हा तीन दिवस आम्ही कोंबड्या सोडत नव्हतो.

**मा. सभापती :-**

मी ठराव क्र. ३५ वर बोलतो. आपले मागच्या सभेत असे झालेले होते की, औषध मारण्यासाठी ज्या गाड्या ठेवलेल्या आहेत त्याच्या ड्रायव्हरचा पगार आणि मेन्टेनन्सचा खर्च ते लोक करणार आहेत.

**नयना म्हात्रे :-**

साहेब,ते लोक म्हणजे कोण?

**मा. सभापती :-**

कॉन्ट्रॅक्टर आणि त्याच्यातुन हे पैसे बाद करुन बाकीचे पैसे चुकवावे.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता मला सांगा. तुम्ही जी गाडी प्रोव्हाइड केली. त्या गाडीमध्ये फ्युअल देणार ती गाडी दिवसभर चालणार मग त्या गाडीमध्ये हजार पाचशेचे जे काही पेट्रोल किंवा डिझेल पडेल, त्याचा भुर्दंड तुम्हाला कशासाठी? त्याच्यामध्ये पंपसेट चालु करुन त्याचा फवारा कमीत कमी शंभर मीटर पर्यंत आहे. इथे मच्छर मारण्याकरीता मॅन्युअली खांद्यावर पंप घेउन माणसे फिरायची ते बंद झालेले आहे. म्हणजे ती माणसे, त्यांचे पगार, त्यांचे जे मुनष्यबळ लागणार आहे ते कमी झाले. आज ती गाडी फिरते पुर्वी मॅन्युअली काम करायचे त्याला बारा तास लागायचे. त्या ठिकाणी जर आत्ता गाडी फिरायला लागली तर ते बारा तासचे काम चार तासात होते. मग तुम्ही फ्युअल चार्जेस का लावत नाही? एक तर तुम्ही एवढी लाखाची गाडी फुकट दिली. फ्युअल चार्चेस आणि ड्रायव्हरचा खर्च करावा.

**मा. सभापती :-**

आपण त्या गाड्या जमा करुन नवीन टेंडर निघेल. चार प्रभागाच्या चार विभागाला माणसांनी करायचे की, या गाड्यांप्रमाणे करायचे तो विषय आपण घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

पण आत्ताचे काय? तुम्ही आत्ता ठराव करता. साहेब,तुमचे मागचे रुलिंग निट वाचा. अगोदरचे घाईघाईने देउ नका.

**मा. सभापती :-**

मागच्या रुलिंगप्रमाणे हे असणार ३५ क्रमांकाला लागु नसणार.

**मिलन म्हात्रे :-**

मी आत्ता प्रकरण ३७ वर बोलतो. ३५ चे अवलोकन आले आहे. त्याच्यामध्ये हे औषध आजच्या तारखेला आणलेले आहे का? खरेदी झालेली आहे का? आणि ते कुठल्या गोडाउनला आहे?

**राजकुमार कांबळे :-**

भाईंदर पुर्वेला आणि भाईंदर पश्चिमला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती किती परसेंटेजमध्ये आहे?

**राजकुमार कांबळे :-**

काळे फिनाईल ३,३९० लीटर शिल्लक आहे. सफेद फिनाईल ८४० लीटर

**मिलन म्हात्रे :-**

कारण मला आठवते डॉ. बावस्कर असतांना त्यांनी त्यांच्या बर्थ डे चे केक आणले होते. ते केक कामाचे नाहीत. ते केक फुकट गेले आणि मी जे औषध सांगतो. ते तुम्ही का आणले नाही? आपल्याकडे नगरभवनच्या गोडाउनला वन विभागाकडे आहे. मग तुमच्याकडे का नाही? झिक फॉस्फेड तुम्ही का आणले नाही? त्याला काय अडचण आहे? एवढे चांगले औषध आहे. इफेक्ट होता आणि उंदीर पटापट मरतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.):-**

ही कार्यवाही झालेली आहे पुढच्या वेळेस त्याची नोंद घेउन केक न आणता औषध आणा.

**मिलन म्हात्रे :-**

मा आयुक्तांनी सुध्दा त्याच्यावर काहीच केले नाही. पुर्वी डॉ. बावस्कर असतांना लाखो रुपये खर्च करुन केक आणले ते केक एक्स्पायर होउन आपल्याला फेकावे लागले. ते पैसे फुकट गेले. हे सगळे परत रिपीट झाले आहे. म्हणजे आत्ता यांनी आणायचे आणि हा मुद्दा मी काढला नसता तर हे सगळे पास झाले असते. आज एखाद्या औषधाचा चांगला रिझल्ट जर एका डिपार्टमेंटला मिळलो तर अधिका-यांची ते जाउन का बघितले नाही? आम्हाला डाउट आहे. त्याच्यामध्ये जे औषध आहे......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.):-**

आम्ही त्यांची नोंद घेतली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला माहिती आहे. पण जे औषध आणले आहे त्याचे काय करणार? तुम्ही ते रिटर्न करुन दुसरे घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.):-**

वापरलेले आहे. थोडे राहिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती राहिले आहे? आमच्या विभागात तर कधी दिसले नाही.

**राजकुमार कांबळे :-**

आपण मागणी प्रमाणे देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. खतगांवकर साहेब, म्हणजे हे मागणी करणार तेव्हा फिनाइल किंवा नेप्टॉलीबॉल देणार. ही पध्दत काय झालेले आहे, समजा मोदी पटेल रोडला आरोग्य केंद्र आहे. तिकडच्या सफाई कामगाराला ही आवासपण नाही की, तिकडे जाउन फिनाईला आणायचे. आणि हे त्याला फिनाईल देत नाहीत. म्हणुन एक सुचना अशी करा की, प्रत्येक विभागामध्ये आपल्या ज्या - ज्या शाळा आहेत किंवा समाजमंदिर आहेत. त्यांना काही गोष्टी तुम्ही पुरवा आणि त्यांच्याकडुन सही घेउन या आम्ही तिकडे गेलो की, फिनाईल देते नही है। उधर मिलता नही है। असे सांगतात.

**शरद पाटील :-**

याचा अर्थ फिनाईल देत नव्हते. उडत होते मग तुम्ही काय करत होते.

**मिलन म्हात्रे :-**

ते आणतच नाहीत. कॉन्टीटीमध्ये घेतलेच जात नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक डिलीवरी चलान बनवुन घ्या. आणि संबधीत नगरसेवकांना पण सांगा की एवढा कोटा आम्ही तुमच्या या समाजमंदीरांला दिलेला आहे या शाळेमध्ये एवढा कोटा दिलेला आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त मु. (सो.):-**

सर्व प्रभाग अधिका-यांनी याची नोंद घ्यावी. त्यांच्या वस्तीत ज्या क्षेत्रामध्ये शाळा आहेत किंवा त्या शाळेचे जे सार्वजनीक संडास आहेत. त्याच्यासाठी आपल्या अधिपत्याखालील कर्मचारी, निरिक्षक यांना सुचना देवून आरोग्याच्या स्टोअरमध्ये आहे. ते ते साहित्य उपलब्ध करुन जनतेच्या वापरासाठी घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, कोणी घ्यायला येत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग अधिका-यांवर आमचा असा आक्षेप आहे. माझ्या तीन वॉर्डची एक चौकी आम्ही बनवली आहे. प्रभाग अधिका-यांनी कधी येउन बघितले का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांकर साहेब, प्रभाग अधिकारी काहीच काम करत नाहीत. ज्याप्रमाणे बांधकाम डिपार्टमेंटमध्ये प्रत्येक इंजिनीअरला एक रजिस्टर दिले जाते की, संपुर्ण दिवसामध्ये तुम्ही काय काम करता. आणि ते रजिस्टर श्री. बारकुंड साहेब चेक करतात. त्याप्रमाणे तुम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना रजिस्टर द्या अख्खा दिवस प्रभाग अधिकारी केबिनमध्ये बसलेला असतो. काहीच काम करत नाही.

**ज्योत्स्न हसनाळे :-**

प्रभाग अधिकारी प्रभागात फिरतच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये प्रभाग अधिकाऱ्यांनी भेट घेतल्यावर त्या तारखेला त्याच्यावर नगरसेवकाची सही पण झाली पाहिजे त्यांनी आमच्याकडे यावे. आत्ता मेन रोडला झाकणे तुटलेली आहेत. मोठे ॲक्सीडन्ट होण्याची शक्यता आहे. प्रभाग अधिकाऱ्यांचे लक्ष नाही? काशिमिरा रोडला झाकणे तुटली आहेत. कोण बघणार? आत्ता आमच्याकडे गोडाउनला आमचे लक्ष आहे म्हणुन ठिक आहे. आज त्या बाजुला प्रभाग अधिकारी बसतात. त्याच्याखाली तुमचे वैद्यकीय, मेडीकलचे गोडाउन आहे माझी अशी सुचना आहे की, त्या गोडाउनला तुम्ही एक स्टॉक रजिस्टरचा तक्ता बनवा. उभे राहिल्यावर कळले पाहिजे की, या गोडाउनला काय काय औषधे आहेत. माझ्याकडे मी तसे केले आहे. पण प्रभाग अधिकाऱ्यांची आमच्याकडे कधीही भेट झालेली नाही. बोलावुन सुध्दा येत नाहीत.

**ज्योत्स्न हसनाळे :-**

साहेब, तुम्ही आजच्या आज प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश काढा की, त्यांनी तात्काळ जाउन नगरसेवकांची भेट घ्यावी. त्यांच्या असलेल्या समस्या ...

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त मु. (सो.):-**

याची नोंद घेउन सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना याचे आदेश देण्यांत येतील.

**मिलन म्हात्रे :-**

आज वन विभागाचे सगळे कर्मचारी घरी बसलेले आहेत. बगिचाला पाणी मारायला कर्मचारी नाहीत. कोणाचे लक्ष आहे का?

**मा. सभापती :-**

ज्या गटारांची झाकणे कमी असतील त्या प्रभागांच्या अधिकाऱ्यांनी किंवा बांधकामाच्या अधिकाऱ्यांनी ही झाकणे लावुन घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

लोखंडी झाकणे चोरीला गेली आहेत. खड्डे उघडे पडले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्यांना सांगा की, त्यांची कामे काय आहेत. ऑफिसमध्ये आल्यानंतर ते काय काम करतात?

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता प्रभाग समिती ॲक्टीवेट नाही. काम काहीच नाही. तिकडे बसुन राहिलेले आहेत. दुसरा उद्योग काय आहे ते मला सांगा, आत्ता सभा असतात तर समजु शकतो की, सगळे मेन्टेन करणे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ३६, ३७ व ३८ मंजुर करत आहेत.

**प्रकरण क्र. ३६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे पेट्रोल/ डिझेल इंधनावर चालणारे विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्यांने देणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. २६ :-**

महापालिका क्षेत्रात सखल भागामध्ये पावसाळ्या दरम्यान साचणाऱ्या पाण्याचा उपसा करणे कामी भाड्याने सक्शन पंप घेणेबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ३७ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे - उंदीरनाशक / किटक नाशके खरेदी करणे.( आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. २७ :-**

महापालिका आरोग्य विभगासाठी उंदीर नाशक / किटक नाशके पुरवठा करणे कामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ३८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे - दुर्गंधीनाशक/ किटकनाशके खरेदी करणे. (आरोग्य साफसफाई विभाग )

**ठराव क्र. २८ :-**

महापालिका आरोग्य विभागासाठी दुर्गंधी नाशक/किटक नाशके पुरवठा करणेकामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली याबद्दल धन्यवाद देउन आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०२.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**